**१.१३** अशोक लेलॅन्ड कंपनीच्या मुद्याबाबत असीस्टंट कमिशनर ऑफ कमर्शिअल टॅक्सेस फास्ट ट्रॅक असेसमेंट सर्कल III चेन्नई यांना पत्र लिहिले आहे. We have written a letter to the A.C. of Commercial Taxes, Fast Track Assessment circle III Chennai asking them to confirm this. त्यावर समितीने सुचना केली की, शासनाने व्यापाऱ्यांना कसलीही सवलत न देता आदेश निर्गमित करावेत. याबाबतीत व्यापाऱ्यांचे काही दावे असतील तर त्यांनी ते कोर्टात सिध्द करावे. याबाबत विक्रीकर आयुक्तांनी खुलासा केला की, हे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. परवा यासंदर्भात स्पष्ट नोटीस विक्रेत्यांना दिल्या आहेत. त्याबाबतीत त्यांचे काही म्हणणे असेल तर त्यांनी शासनाकडे येऊन ते स्पष्ट करावे. तसेच याबाबत सचिवांनी अशी माहिती दिली की, कागदपत्रे आणून दाखविण्याची जबाबदारी डिलरची आहे.

**१.१४** समितीने अशी विचारणा केली की, बाटा इंडिया लिमिटेड कंपनीचा अहमदाबादवरुन अहवाल आला आहे का ? याबाबत विक्रीकर आयुक्तांनी खुलासा केला की, अद्यापपर्यंत अहवाल आला नाही. अहवालाबाबत पाठपुरावा सुरु असून त्यांना स्मरणपत्र पाठविण्यात आले आहे. सन २००१ च्या बाबतीत क्रॉस चेकच्या मुद्यासंदर्भात पत्र पाठविले होते, परंतु अद्याप त्याचे उत्तर आले नाही. बाटा इंडिया कंपनीकडून पडताळणी

झाली नाही. त्यावर समितीने विचारणा केली की, त्या कंपनीला स्मरण करुन देणे आवश्यक आहे. याबाबत विक्रीकर आयुक्तांनी संबंधितांना स्मरणपत्र पाठविण्यात येईल असे सांगितले.

**१.१५** समितीने अशी विचारणा केली आहे की, अपोलो टायर्स कंपनीच्या बाबतीत काय स्थिती आहे ? याबाबत विभागीय सचिवांनी खुलासा केला की, अहमदाबाद आणि बडोदा या दोन ठिकाणी माल गेलेला आहे. त्यावर समितीने विचारणा केली की, बडोद्याचा माल तपासला नाही काय ? त्यावर सचिवांनी खुलासा केला की, पडताळणी न केल्यामुळे रकमेत फरक वाढला आहे. महालेखाकारांनी असे मत व्यक्त केले की, On vertification, it is found that there is discrepancy in the recording of stock transfer. यावर विक्रीकर आयुक्तांनी खुलासा केला की, the S.T.R.A. has pointed out that the goods were transferred to branch at Ahmedabad at Rs. 4647.06 lakhs but the branch has accounted for goods of Rs. 4125.06 lakhs only. According to S.T.R.A, there is short accounting of Rs. 522.00 lakhs. The goods transferred from Pune are in fact transfer to two places in Gujarat, i.e. Ahmedabad and Baroda. The total taken by A.G., that is, Rs. 4647.06 lakhs includes transfer to Ahmedabad and Baroda also. It appears that the transfer to Ahmedabad does not seem to have been considered by S.T.R.A. त्यावर महालेखाकारांनी मत व्यक्त केले की, We would like to go through these papers. यावर समितीने विभागास असे सांगितले की, त्यांनी महालेखाकार यांना कागदपत्रे सादर करावी, त्यास विक्रीकर आयुक्तांनी सहमती दर्शविली.

**१.१६** विक्रीकर आयुक्त यांनी असा खुलासा केला की, त्यांनी शाखा हस्तांतरणाची कागदपत्रे दाखविण्यात आली आहेत. इकडे पडताळणी करण्यात आली परंतु त्यांच्या बाजूने पडताळणी करण्यात आली नाही. त्यांचे असे म्हणणे आहे की, कागदपत्रे चुकीची आहेत. If verification was not correct from their side, then you are correct. आपल्याला सर्व प्रकरणांचे अभिलेखे मिळालेले आहेत.

**१.१७** समितीने अशी विचारणा केली की, मे.ग्रिव्हज लि.या कंपनीसंदर्भात कमर्शियल टॅक्स ऑफिसर चेन्नई यांच्याकडून "फ" नमुन्याच्या तसेच त्यावर भरणा केलेल्या विक्रीकराबाबतचा अहवाला प्राप्त झाला आहे काय ? याबाबत विभागाने असा खुलासा केला की, कमर्शियल टॅक्स ऑफिसर चेन्नई यांच्याकडून अद्याप अहवाल प्राप्त झालेला नाही. पाठपुरावा चालू आहे.

**१.१८** महालेखाकारांनी असे मत व्यक्त केले की, We are only concerned with the remarks of the Assessing Officer. त्यावर सचिवांनी खुलासा केला की, We will insist the Assessing Officer for his remarks on this point. अशोक लेलॅन्ड कंपनीबाबतची कागदपत्रे ए.जी. कार्यालयाला पाठविण्यात आली नव्हती काय ? अशी समितीने विचारणा केली असता, विक्रीकर आयुक्त यांनी

असा खुलासा केला की, अशोक लेलॅन्ड कंपनीचा प्रश्न हा चेन्नई या शहरातील आहे. सन १९९९ ते २००१ चे मुल्यनिर्धारण ८४७ कोटी रुपयांचे आहे. 'एफ' फार्म पुष्टी करण्यासाठी पाठविले होते. the confirmation from Assistant Commissioner of Sales Tax, Chennai has been received. समितीने अशी विचारणा केली की, Have you shown these Forms to the A.G.? महालेखाकार यांनी असे सांगितले की, we have not received anything from them. यावर विक्रीकर आयुक्त यांनी खुलासा केला की, the Assistant Commissioner of Sales Tax, Chennai has confirmed that 'F' Forms were issued by them. समितीने अशी विचारणा केली की, whatever they have confirmed and informed you, you should have sent those copies to the A. G. कारण ए.जी. कार्यालयाचा आक्षेप आहे की त्यांच्याकडे ती कागदपत्रे पाठविली नाहीत. त्यावर विक्रीकर आयुक्तांनी खुलासा केला की, आम्ही ती कागदपत्रे दिनांक ४ डिसेंबर २००९ रोजी ए.जी. कार्यालयास पाठविली आहेत. केलॉग्स इंडिया लिमिटेड बाबतची वस्तुस्थिती काय आहे? अशी समितीने विचारणा केली असता, याबाबत महालेखाकार यांनी असे अभिप्राय दिले की, We want documentary evidence from the Department in the Kellog's case.

**१.१९** मे.क्रॉप्टन ग्रीव्हज प्रा.लि.या कंपनीबाबत चेन्नई व कोची येथील निर्धारणा अधिकारी यांचे अहवाल प्राप्त झाले आहेत काय ? नसल्यास त्यांची कारणे काय आहेत ? याबाबत विभागाने असा खुलासा केला की, विक्रीकर उपआयुक्त (सिटी) फास्ट ट्रॅक निर्धारणा सर्कल ३ व सहाय्यक विक्रीकर आयुक्त वाणिज्य कर स्पेशल सर्कल यांचे अहवाल प्राप्त झाले आहेत. हस्तांतरणेबाबत कोणतीही तफावत आढळली नाही.

**१.२०** अभय योजनेबाबत माहिती समितीसमोर विशद करावी. बरेच व्यापारी हे अभय योजनेची वाट पाहत आहेत. अभय योजना आणून शासनाचे नुकसान झाले असे समितीचे मत आहे. शासनाने लावलेला कर योग्य असेल तर कोणीतीही योजना आणून शासनाचे नुकसान होऊ नये असे समितीने विभागाच्या निदर्शनास आणून दिले असता, विभागीय सचिवांनी असा खुलासा केला की, सन २००४ नंतर कोणतीही अभय योजना शासनाने आणलेली नाही किंवा आणण्याचा विचार केलेला नाही त्यामुळे व्यापाऱ्यांनी कर भरणे आवश्यक आहे. सन २००४ मध्ये शासनाने अभय योजना आणली होती त्यावेळी २५ कोटी रुपयांचे उत्पन्न शासनास मिळाले होते आणि ७५ कोटी रुपयांचे नुकसान झाले होते. असे समितीने सचिवांच्या निदर्शनास आणून दिले असता याबाबत सचिवांनी खुलासा केला की, अभय योजनेचा गेल्या सहा वर्षात कोठलाही प्रयोग केलेला नाही. त्यावर समितीने आणखी अशी विचारणा केली की, एखादी चांगली लाभदायक योजना आणली तर त्यास हरकत नाही परंतु निव्वळ लोकांना मदत करण्यासाठी योजना आणणे हे संयुक्तिक वाटत नाही. तसेच यामुळे जे व्यापारी नियमित कर भरत असतात त्यांच्यावर एकप्रकारे अन्याय होतो. याबाबत विक्रीकर आयुक्त यांनी

खुलासा केला की, सन १९९९ मध्ये अभय योजनेत ५०८७३ अर्ज आले होते. त्यामध्ये ८२.२० कोटी रुपये गोळा झाले. ही योजना लागू केली नसती तर २९९.२० कोटी रुपये शासनास येणे होते.

**१.२१** अभय योजनेचा लाभ व्यापाऱ्यांना न दिल्यामुळे जवळपास ३०० कोटी रुपयांपैकी फक्त १०० कोटी रुपये शासनाच्या तिजोरीत जमा झाले. हे खरे आहे काय अशी समितीने विचारणा केली असता, त्यावर विक्रीकर आयुक्त यांनी खुलासा केला की, ३०० कोटी रुपयांपैकी १०० कोटी रुपये शासनाला मिळाले. ही विवादास्पद रक्कम होती. दुसरी योजना सन २००४ मध्ये आली. त्यास चांगला प्रतिसाद मिळाला. त्यावेळी २,६९,००० अर्ज आले होते. त्यानुसार आपल्याकडे रुपये ४५१ कोटी जमा झाले, तर रुपये ७९१ कोटी सोडून दिले म्हणजे प्रत्यक्षात १/३ रक्कम जमा झालेली आहे. असे सचिवांनी सांगितले असता, यात विक्रीकर विभागाची चूक आहे. यात शासनाचे जवळ जवळ एक हजार कोटी रुपयांचे नुकसान झाले आहे. असे सांगितले असता, विभागीय सचिवांनी असा खुलासा केला की, ही संकल्पना आम्ही राबविणार नाही. म्हणून ही योजना आता घेतलेली नाही. त्यावर समितीने अशी विचारणा केली की, अभय योजना आता बंद आहे. पण वसुलीचे प्रमाण वाढले आहे काय ? याबाबत विक्रीकर आयुक्तांनी असा खुलासा केला की, गत पाच वर्षाचे आकडे पाहिले तर वसुलीचे प्रमाण वाढल्याचे दिसून येते, गत पाच वर्षात ३५० कोटी रुपयांची वसुली करण्यात आली आहे. सन २००९-२०१० मध्ये ६०० कोटी रुपयाच्या वर वसुली झाली आहे.

**१.२२** समितीने असा अभिप्राय नोंदविला की, अभय योजनेला आमचा विरोध नाही. या योजनेतून शासनाला ८५ टक्के निधी मिळाला पाहिजे. १०-१५ टक्के निधी गेला तर त्यास समितीचा विरोध नाही. परंतु यामध्ये उलट चित्र दिसत आहे. १० ते १५ टक्के निधी शासनाकडे जमा झालेला आहे व ८५ टक्के निधी जमा झालेला नाही. ही बाब विचारात घेता शासनाने अभय योजनेची सुधारित पध्दतीने अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने शासनाने पुर्नविचार करण्याचे दृष्टीने या योजनेच्या फल निष्पत्तीबाबत आढावा घेणे उचित होईल असे समितीला वाटते.

**१.२३** विक्रीकर आयुक्तांनी डिसेंबर, १९८५ मध्ये निर्देशित केलेले, व्यापाऱ्यांनी सादर करावयाचे प्रत्येक महिन्यातील किंवा तिमाहीतील रुपये १ लाखावरील हस्तांतरण व पाठविलेल्या मालाचे नमुना "फ" सहीत ३१ तपशील अभिलेख्यावर मे.प्रिमिअर फिल्टर प्रा.लि., ऑटोमोटीव्ह (इं), मे.साधना ब्रदर्स, मे.किर्लोस्कर इलेक्ट्रिक व पृथ्वी कंटेनर्स वरील संबंधित कंपन्यांनी उपलब्ध करुन दिले होते काय ? असल्यास, संबंधित कंपन्यांवर काय कारवाई केली आहे. याबाबत विभागाने असा खुलासा केला की, दिनांक ११/५/२००२ पर्यंत नमुना "फ" सादर करणे अनिवार्य नव्हता त्यामुळे पर्यायी पुरावे तपासण्यात आले आहेत. १३ पैकी १२ प्रकरणात मालाचे जावक पुरावे अभिलेखावर ठेवण्यात आले आहेत. मे.के.पॅक या प्रकरणांत व्यापाऱ्यास पुरावे सादर न करता आल्यामुळे दुरुस्ती आदेश पारित करुन रु. १८.३२ लाख मागणी काढण्यात आली आहे. या व्यापाऱ्यांनी रु. ४.८६ लक्ष अभययोजनेत भरलेले आहेत व उर्वरित रक्कम अभय योजनेअंतर्गत सूट देण्यात आली आहे.

**परिच्छेद क्र. 2.2.8**

**१.२४** सदर परिच्छेदात महालेखापरिक्षकांनी नमूद केलेल्या अभिप्रायातील आठ विभागातील ३२ व्यापाऱ्यांच्या १९९८-९९ आणि २००१-२००२ मधील करातून सूट दिलेल्या रुपये ३५५.३४ कोटी किंमतीच्या हस्तांतरित मालाच्या निर्धारणातील नमुना फ घोषणापत्रात हस्तांतरकर्ता/हस्तांतरक यांची नावे, त्यांचा वैध तारखेसहीत नोंदणी प्रमाणपत्र क्रमांक, बिल क्रमांक व दिनांक, रेल्वे पावती क्रमांक, मालाचा तपशील व परिणाम, माल पाठविल्याचा व पोहचल्याचा तपशील इत्यादी दिलेला नव्हता. ही अपुरी आणि अवैध घोषणापत्रे स्वीकारल्यामुळे रुपये ३४.७३ कोटी दंड व रुपये ९.३४ कोटी व्याजासहित रुपये ७८.७९ कोटी महसुलाची वसुली होऊ शकलेली नाही. तेव्हा विभागाने यासंबंधी कोणती कारवाई केली आहे. सचिवांनी असा खुलासा केला की, 'फ' नमुना दिल्यानंतर कोणत्याही प्रकारचा कर द्यावा लागत नाही. कारण व्यापाऱ्याने दुसऱ्या राज्यात कर भरला असेल तर त्याला तो महाराष्ट्रात भरावा लागणार नाही. यात एकमेकांचे दस्तावेज तपासणे गरजेचे आहे. दुसऱ्या राज्यामध्ये विक्रीकर भरल्यामुळे तो आपल्या राज्यात लागू नाही असे विभागाचे म्हणणे आहे, 'फ' नमुना प्रपत्र भरले असेल तर व्यापाऱ्याला विक्रिकर लागू नाही व्यापाऱ्याने खरोखरच विक्रिकर भरला आहे किंवा नाही याची तपासणी करण्याची आपल्या विभागाची जबाबदारी आहे. तशी तपासणी होत नसेल तर व्यापारी आपल्याला फसवू शकेल. असे समितीने सचिवांच्या निदर्शनास आणून दिले असता, त्याबाबत विक्रीकर आयुक्तांनी असे सांगितले की, व्यापारी संबंधित राज्याचा 'फ' फॉर्म देतात. त्यानुसार आपण कार्यवाही करतो. तसेच याबाबत सचिवांनी असा खुलासा केला की, 'फ' फॉर्म हा कोणत्याही राज्याचा प्रतिनिधी देत नाही. हा फॉर्म संबंधित राज्याकडूनच मिळतो.

**१.२५** यासंबंधीत महालेखाकार यांनी असे अभिप्राय दिले की, Whenever there is inter-state sale, Lorry Receipts, Invoice No.and dates is to be verified. However, in this case, it is allowed on the basis fo 'F' Form. The 'F' Form kept on record are insignificant in nature. They say that the proof was verified and returned to the dealer. There should be some corroborative evidence.

**१.२६** याबाबत विक्रीकर आयुक्तांनी खुलासा केला की, मे.एफ.डी.सी.लि.च्या संबंधी असे सांगू इच्छितो की, आता आमच्याकडे सगळे लॉरी रिसिट उपलब्ध आहेत. नस्ती सुटसुटीत ठेवण्याच्या दृष्टीने वाहतुकीचे पुरावे तपासून परत करण्यात आले आहेत. हा सगळा अभिलेखे आम्ही मागवून घेतला होता.

**१.२७** याबाबत विक्रीकर आयुक्तांनी पुढे असाही खुलासा केला की, फॉर्म देण्यापूर्वी मागचा पुरावा देणे आवश्यक आहे. समितीने अशी विचारणा केली की, आपण संपूर्ण कागदपत्र लेखापरिक्षणाच्या वेळी उपलब्ध करुन का दिले नाही ? त्यावर सचिवांनी खुलासा केला की, पुष्कळ कागद असल्यामुळे सगळे अभिलेखे तपासणीसाठी ठेवले जात नाही. समितीने आणखी अशी विचारणा केली की, यासंबंधी जबाबदारी

निश्चित करुन संबंधितांवर कारवाई केली पाहिजे. तसेच When A.G. does the audit, he asks for the Transport Receipt. Since at the time of the audit you have not shown the relevant documents, the A.G. has put his remarks. Therefore, in the next reconciliation meeting, you should show all the relevant documents to the A.G. so that this issue can be solved. याबाबत सचिवांनी असा खुलासा केला की, आज तो प्रश्न आम्ही सोडविला आहे. यासंबंधी कार्यशाळा घेतली होती. व्हॅटसंबंधी कोणकोणते अभिलेखे ठेवले पाहिजेत या सगळ्यांची यादी तयार करणार आहोत.

**१.२८** त्यावर समितीने अशी विचारणा केली की, आठ विभागातील ३२ व्यापा-यांच्या १९९८-१९९९ आणि २००१-२००२ मधील करातून सूट दिलेल्या रु.३५५.३४ कोटी किंमतीच्या हस्तांतरित मालाच्या निर्धारणातील नमूना फ घोषणापत्रात हस्तांतरकर्ता /हस्तांतरक यांची नावे, त्यांचा वैध तारखेसहीत नोंदणी प्रमाणपत्र क्रमांक, बिल क्रमांक व दिनांक, रेल्वे पावती क्रमांक, मालाचा तपशील व परिमाण, माल पाठविल्याचा व पोहोचल्याचा तपशील इत्यादी दिलेला नव्हता. ही अपुरी व अवैध घोषणापत्रे स्वीकारल्यामुळे रु.३४.७३ कोटी दंड व रु.९.३४ कोटी व्याजासहित रु. ७८.७९ कोटी महसुलाची वसुली होऊ शकली नाही." या संबंधी खुलासा करण्यात यावा असे समितीने सांगितले असता, सचिवांनी असा खुलासा केला की, एकूण ३२ प्रकरणापैकी १९ प्रकरणामध्यें वाहतुकीचे पुरावे अभिलेख्यावर ठेवलेले आहेत तसेच एफ फार्म देखील उपलब्ध आहेत. ९ प्रकरणांमध्ये हस्तांतरणाचे दावे माल वाहतुकीच्या जावक पुराव्याच्या तपासणीच्या आधारे मान्य करण्यात आलेले आहे. त्याचबरोबर प्रकरण क्रमाक ६,९, २८ या ३ प्रकरणामध्ये क्रॉस चेक मेमो पाठविण्यात आले आहेत. त्याचे उत्तर अजून आलेले नाही. प्रकरण क्रमांक २७ मध्ये संबंधित व्यक्ती अपीलात गेली असून हे प्रकरण अंतिम सुनावणीमध्ये आहे.

**१.२९** उर्वरित तीन प्रकरणांमध्ये आपण कोणत्या निष्कर्षाप्रत आला आहात ? अशी समितीने विचारणा केली असता, सचिवांनी खुलासा केला की, क्रॉस चेक मेमो पाठविण्यात आले आहेत परंतु त्याचे उत्तर आलेले नाही. दुस-या राज्याकडून उत्तरे यावयाची आहेत. वेळेवर उत्तर पाठविणे त्यांच्यावर बंधनकारक नाही. या बाबतीत आपण त्यांच्या वरिष्ठ अधिका-यांना कळविले असल्याचे विक्रीकर आयुक्ताने सांगितले. त्यावर समितीने असे अभिप्राय दिले की, लोकलेखा समितीच्या माननीय समिती प्रमुखांच्या देश पातळीवर होणा-या बैठकीत हा मुद्दा उपस्थित करता येईल. वर्षानुवर्षे ही माहिती जर इतर राज्याकडून येत नसेल तर ती बाब गंभीर आहे. समितीने अशी विचारणा केली की, एखादे राज्य माहिती देण्यामध्ये सहकार्य करीत नसेल तर अशा प्रकरणी आपण काय करता? सचिवांनी खुलासा केला की, उत्तरेकडील राज्यांकडून माहिती येण्यास विलंब होतो. त्यामानाने दक्षिणेकडील राज्यांकडून याबाबत उत्तम सहकार्य मिळते. या संदर्भात समितीला एक

पत्र द्यावे त्या संदर्भात समिती महालेखाकारांना कळविल त्याचबरोबर दिल्लीला सुध्दा कळविण्यात येईल. परंतु विक्रीकर विभागाकडून अद्याप पत्र प्राप्त झाले नाही.

**१.३०** व्यापा-यांचे दावे मंजूर करीत असतांना आपण खात्री करुन घेताना त्यासाठी वाहतुकीचे पुरावे आणि एफ फार्म पाहिले जाते. त्यामध्ये दोन तीन विभाग आहेत . काही प्रकरणी मुल्यनिर्धारण अधिकाऱ्याने पुरावे पडताळणी केल्यानंतर ते परत केले होते परंतु यासबंधी मुद्दा काढला गेल्यानंतर ते पुरावे पुन्हा मागवून घेण्यात आले होते असेही विक्रीकर आयुक्तांनी समितीला सांगितले.

**परिच्छेद क्रमांक २.३.५**

**१.३१** उक्त परिच्छेदाबाबत अधिक माहिती घेताना समितीने अशी विचारणा केली की, अपीले निकाली काढण्यासबंधीचे हे प्रकरण असून मे.ट्रीडंट स्टील लि, सोमेश स्टील कंपनी,विक्रांत फार्मा, देवयानी ट्रेडींग, नारंग इंटरनॅशनल हॉटेल, भारत हेवी इलेक्ट्रीकल्स, भोपाळ शुगर इन्डस्ट्रीज, दवे पेन्टस इत्यादी कंपन्या त्यामध्ये आहेत. त्यापैकी सात आठ कंपन्या मोठया आहेत. अपीले निकाली काढण्यामध्ये दिरंगाई होण्याची कारणे काय आहेत ? काही प्रकरणामध्ये तर तीन कोटी, आठ कोटी रुपये अडकलेले आहेत तेव्हा या बाबत खुलासा करण्यात यावा. त्यावर विक्रीकर आयुक्तांनी असा खुलासा केला की, काही अपीले विभागीय अधिकाऱ्यांकडे तर काही अपील न्यायाधिकरणाकडे असतात. एक अपील आपल्याकडे प्रलंबित आहे आणि एक अपीलन्यायाधिकरणाकडे प्रलंबित आहे. बाकीच्या प्रकरणामध्ये वसुली सुरु आहे.

**१.३२** समितीने अशी विचारणा केली की, What action has been taken regarding case of M/s Trident Steel Ltd.? विभागाने असा खुलासा केला की, The said Company M/s Trident Steel Ltd has gone in liquidation. We have registered our claim of Rs. 3.67 crores. त्यावर पुन्हा समितीने विचारणा केली की, What action have you taken for recovery? विभागाने खुलासा केला की, मे.ट्रीडंट स्टील कंपनीच्या प्रकरणात ३ कोटी ६७ लाख रुपये गुंतले असून न्यायाधिकरणाकडून अपील परत पाठविण्यात आले आहे आणि आता उच्च न्यायालयात दावा दाखल करण्यात आला आहे. त्याचबरोबर सोमेश स्टील यांच्या प्रकरणात ८ कोटी ३ लाख रुपये गुंतले असून त्यांचे अपील फेटाळण्यात आले आहे. न्यायाधिकरणाकडून त्यांचे प्रकरण आपल्याकंडे आले आहे आणि आता वसुलीसाठी प्रलंबित आहे.

**१.३३** यामध्ये एकूण आठ अपीले असून त्यापैकी एक अपील आपल्याकडे आणि एक न्यायाधिकरणाकडे प्रलंबित आहे. उरलेल्या सहा अपीलामध्ये अपील अधिकाऱ्याने स्वत: पडताळणी केलेली आहे. काही कंपनीच्या बाबतीत विक्रीकर निरीक्षकांनी भेट दिली होती परंतु त्यावेळी ही कंपनी बंद असल्याचे दिसून आले म्हणून त्यांनी त्या जागेवर नोटीस चिकटवली होती. वास्तविक एखादी कंपनी जर बंद पडली असेल व त्यांना नोटीस द्यावयाची असेल तर वर्तमानपत्रात जाहिरात दिली पाहिजे. समितीने अशी विचारणा

केली की, Do you have seperate department or wing for recovery? यावर सचिवांनी खुलासा केला की, पूर्वी तशी पध्दत नव्हती परंतु आता त्यामध्ये सुधारणा करण्यात आली आहे.

**१.३४** समितीने अशी विचारणा केली की, वर्तमानपत्रात जाहिरात दिली पाहिजे. वेळेवर जर पैसे वसूल झाले नाही व जागेचा लिलाव करावयाचा असेल तर ते काम कोणी करावयाचे ? योग्य पध्दत पाळली जात नसल्यामुळे दहा दहा वर्षे प्रकरणे प्रलंबित राहतात. यामध्ये सुधारणा होणे गरजेचे आहे. विक्रीकर आयुक्तांनी खुलासा केला की, व्हॅट आल्यानंतर त्यामध्ये सुधारणा झाली आहे.

**१.३५** समितीने अशी विचारणा केली की, पैसे वसूल करण्यासाठी वर्षानुवर्षे प्रकरणे प्रलंबित राहतात तेव्हा पैसे लवकर वसूल करण्यासाठी कोण कारवाई करणार आहे ? अनेक वर्षे प्रकरण प्रलंबित राहते आणि दरम्यानच्या काळात अधिकारी बदलून जातात त्यामुळे कोणावरही कारवाई होत नाही बँका किंवा इतर वित्तीय संस्थांकडे पैसे वसूल करण्यासाठी स्वतंत्र विभाग असतो त्याप्रमाणे आपल्या विभागात सुध्दा स्वतंत्र विभाग असला पाहिजे. आज वर्षानुवर्षे् प्रकरणे प्रलंबित राहतात त्याकडे कोणाचेही लक्ष नसते. ही प्रकरणे धूळ खात पडतात आणि त्यामध्ये कोटयावधी रुपये अडकून पडतात पैशाची वसुली वेळेवर होणे आवश्यक आहे. सचिवांनी खुलासा केला की, आठ प्रकरणे आहेत.

**१.३६** समितीने पुन्हा विचारणा केली की, या व्यतिरिक्त आणखी काही प्रकरणे असू शकतील. What serious thinking and action have you taken for this recovery ? In future, what action you are going to take? You submit a report about your action plan to this Committee. सचिवांनी खुलासा केला की, यामध्ये जर काही अधिकारी दोषी असतील तर त्यांच्याविरुध्द निश्चित कारवाई करु. तथापि संबंधितांविरुध्द कारवाई केल्याची माहिती अद्याप समितीला प्राप्त झाली नाही. दोन महिन्यात अहवाल सादर करण्याचे विभागाने आश्वासित केले आहेत.

**१.३७** अर्जदार गैरहजर राहिला असेल वा सहकार्य करीत नसेल तर त्याला दंड केला जात नाही. त्यामुळे प्रकरण पुढे जात नाही तेव्हा यासबंधी सुधारणा करणे आवश्यक आहे. याबाबत खुलासा करताना सचिवांनी असे नमूद केले की, सध्याच्या पध्दतीत कोणती सुधारणा करता येईल, नियमात कोणती सुधारणा करता येईल अशी समितीने विचारणा केली असता, यासबंधी विक्रीकर आयुक्तांनी अशी माहिती दिली की, मुंबई विक्रीकर कायदा १९५९ साली अस्तित्वात आला. कायदा अस्तित्वात आल्यानंतर विक्रीकर विभागामध्ये प्रमुख पदी विक्रीकर आयुक्त यांची विक्रीकर खात्याचा प्रमुख म्हणून नियुक्ती करण्यात आली. कायदा राबविण्यासाठी अप्पर विक्रीकर आयुक्त, विक्रीकर सह आयुक्त, विक्रीकर उप आयुक्त, सहाय्यक विक्रीकर आयुक्त, व विक्रीकर अधिकारी यांची पण नियुक्ती आयुक्तांचे कनिष्ठ अधिकारी म्हणून करण्यात आली. विक्रीकर आयुक्त हे काही मुद्यांचे प्रत्यायोजन कनिष्ठ अधिकाऱ्यांना करतात. जसे की, निर्धारणा, अपीलइत्यादी व त्याप्रमाणे अधिकारी कामे करतात.

**१.३८** विक्रीकर विभागामार्फत वेगवेगळया करारासंबंधी वेगवेगळे कायदे राबविले जातात. त्यामध्ये मुंबई विक्रीकर कायदा, केंद्रीय विक्रीकर कायदा, मोटार स्पिरीट कायदा, व्यवसायकर, कार्यकंत्राट कर कायदा, ऐषारामकर कायदा इत्यादी कायद्यांची अंमलबजावणी होते. या सर्व कायद्यांचे सरसकट मिळून वार्षिक

उत्पन्न मागच्या वर्षी (०९-१०) रु. ३६,९३६/- कोटी झाले. हे महसूली उत्पन्न राज्य सरकारच्या एकूण महसुलाच्या सर्वसाधारण ६२% एवढे आहे.

**१.३९** कायदा राबविताना त्यात वेळोवेळी वेगवेगळया योजनेनुसार कायदा राबविण्यात येतो. जसे की, Single point first stage tax, मुल्यवर्धितकर प्रणाली, इत्यादी,. कायदे राबविताना त्यामध्ये आवश्यकतेनुसार वेळोवेळी बदल पण करण्यात येतात. हे बदल न्यायालयाच्या निवाडयानुसार अथवा राज्य सरकारच्या निकड बघता अथवा जनतेच्या अडचणी विचारात घेवून बदलविण्यात येतात. विक्रीकर कायद्याप्रमाणे विक्रीकर नियम, विक्रीकर अधिनियम, अधिसूचना, व आयुक्तांनी वेळोवेळी काढलेले परिपत्रके हा पण कायद्याचाच भाग होतो. जुन्या पध्दतीप्रमाणे विक्रीकर प्रणाली सुमारे ४५ वर्षे राबविली. १ एप्रिल, २००५ पासून मुल्यवर्धितकर प्रणाली सुरु झाली असून त्या योजनेमध्ये विक्रीच्या प्रत्येक स्तरावर कर लावण्यात येवून मागच्या कराची वजावट देण्याची तरतूद केली आहे. ही योजना आंतरराष्ट्रीय वापरात महत्वाची मानली जाते व १३० राष्ट्रांनी ती स्विकारली आहे. मुंबई स्थित विक्रीकर कार्यालय हे मुख्यालय असून उप नगरातील कार्यालये, ठाणे, पुणे व नागपूर येथील कार्यालये ही क्षेत्रिय कार्यालये आहेत. सर्वसाधारण प्रत्येक जिल्ह्याच्या मुख्यालयी विक्रीकर विभाग कार्यरत आहे.

**१.४०** पूर्वी विक्रीकर कायद्यात भौगोलिक रचनेप्रमाणे काम करण्यात येत होते. परंतू सद्या मुल्यवर्धित विक्रीकर कायद्यात Functional Branch प्रमाणे उदा. व्यवसायकर लेखा परिक्षण शाखा, परतावा लेखा परिक्षण शाखा, विवरण शाखा इत्यादी शाखेमार्फत मुल्यवर्धितकर राबविण्यात येतो. मुल्यवर्धितकर प्रणालीत विक्रीकर कायद्याच्याच कार्यकंत्राट कायदा, वस्तुवापराचा कायदा व मोटार स्पिरीट कर कायदा हा भाग झाला. मोठ्या करदात्यांच्या कराबद्दल काळजी घेण्याकरीता व त्यावरील नियंत्रणाची देखरेख करण्याकरीता एक वेगळी शाखा तयार करण्यात आलेली आहे.

**१.४१** सर्वसाधारणपणे ९०% पेक्षा जास्त महसुल हा व्यापाऱ्याच्या विवरणपत्रासोबत जमा होतो. राहिलेला कर निर्धारणेनुसार अथवा व्यापाऱ्याचा पाठपुरावा केल्यानंतर सरकारी खात्यात जमा होतो. तसेच कर चुकविणाऱ्यांवर अंमलबजावणी शाखेमार्फत देखरेख करण्यात येवून अशा व्यापाऱ्यांवर धाडी टाकण्याचे काम विक्रीकर विभागामार्फत केले जाते. याप्रमाणे सर्व प्रकारे कर गोळा करण्याचे काम विक्रीकर खात्यातील कर्मचारी व अधिकारी वर्ग आपआपल्या स्तरावर भूमिका बजावत असतात.

**१.४२** अधिकाऱ्यांना प्रवृत्त करण्याकरीता विक्रीकर आयुक्त वेळोवेळी अधिकाऱ्यांच्या बैठकांचे आयोजन करुन विक्रीकर अधिकारी व कर्मचारी यांना मार्गदर्शन करुन त्यांची कार्यक्षमता वाढविण्याबद्दल प्रयत्न करतात. सध्यातील युगात इलेक्ट्रॉनिक पध्दतीचा वापर होत असल्यामुळे विक्रीकर विभागाने कर भरण्याकरीता e-return, e-payment, e-registration इत्यादी गोष्टी सुरु केल्या व त्यामुळे विक्रीकर भरणाऱ्या व्यापाऱ्यांना कर भरण्यास सुलभता निर्माण झाली व व्यापाऱ्याला कार्यालयात न येता विवरणपत्रक (Return) व कर (Tax) भरणे सोईस्कर व सोपे झाले. भारतातील, महाराष्ट्र राज्य ही e-return system च्या बाबतीत प्रथम क्रमांकाचे राज्य ठरलेले आहे.

एकूण विक्रीकर अपीलाची संख्या किती आहे व किती दिवसापासून प्रलंबित आहे यासबंधी पंधरा दिवसात माहिती देण्याचे सचिवांनी आश्वासित केले होते सदर आश्वासित माहितीचा समावेश **परिशिष्ठ "अ" मध्ये विवरणपत्र क्र.१, २ व ३** मध्ये करण्यात आला आहे.

**१.४३** समितीने अशी विचारणा केली की, सबंधित व्यापा-याला नोटीस दिली जाते ती योग्य प्रकारे दिली जात नाही त्या व्यक्तीला कोर्टात जाण्यास संधी मिळावी या दृष्टीने अधिका-याकडून वा कर्मचा-याकडून जाणुनबुजून त्यात चूक केली जाते. अशा प्रकरणामध्ये अधिका-यांचा सुध्दा सहभाग असतो, असे प्रकार होऊ नयेत म्हणून कोणती दक्षता घेतली जाते. याविषयी खुलासा करताना सचिवांनी असे सांगितले की, काही ठिकाणी असे दिसून आले आहे की, एका ठिकाणी सुरु असलेला उद्योग बंद करुन तो दुसरीकडे सुरु केला जातो आणि नोटीस मात्र अगोदरच्या जागेवर चिकटवली जाते तेव्हा बँका वा इतर वित्तीय संस्था ज्याप्रमाणे वर्तमानपत्रात जाहिराती देतात त्याप्रमाणे या विभागाने देखील वर्तमानपत्रात जाहिरात देण्याची पध्दत सुरु करणे आवश्यक आहे.

**१.४४** समितीने अशी विचारणा केली की, मे.ट्रीडंट स्टील लि., वरळी या कंपनीच्या बाबत मा.न्यायाधिकरण यांचेकडून अपीलपरत पाठविल्यानंतर सदर प्रकरणात १५ महिन्यानंतर स्मरणपत्र पाठविले आणि मे.सोमेश स्टील मॅन्युल अपीलप्रकरणी २५ महिन्यानंतर सुनावणीची नोटीस काढली. अशा प्रकारे दीड ते दोन वर्षांचा कालावधी नोटीस व स्मरणपत्रासाठी लागत असेल तर विभागाचे प्रमुख म्हणून संबंधितांवर काय कारवाई करणार ? तसेच तीन तीन वर्षापर्यंत भेटच दिलेली नाही. यावरुन वसुलीबाबत विभाग गंभीर दिसत नाही. समितीने असे नमूद केले की, ओएनजीसीमध्ये श्री. नलावडे नावाचे विक्रीकर सहाय्यक आयुक्त आहेत, त्यांनी वारंवार आदेश निर्गमित केले आणि कारवाई मात्र खालच्या अधिकाऱ्यांवर केली जाते. त्यावर सचिवांनी खुलासा केला की, आम्ही वरिष्ठ अधिकारी, जो प्रत्यक्ष जबाबदार असतो त्यांच्यावरच कारवाई करतो. जे संबंधित अधिकारी असतील आणि त्यांनी दिरंगाई केली आणि नोटीस बजावलेली नसेल त्यांच्याविरुध्द आम्ही निश्चितच कारवाई करतो. या प्रकरणात सुध्दा जे अधिकारी जबाबदार असतील त्यांच्यावर कारवाई करुन समितीला दोन महिन्यात अहवाल सादर करण्यात येईल. त्याचबरोबर अशी जेवढी प्रकरणे असतील त्या सर्व प्रकरणांची माहिती गोळा करुन समितीला त्यांची सद्य:स्थिती दोन महिन्यात कळविण्यात येईल. असे समितीला आश्वासित करण्यात आले होते. त्यानुसार समितीला आश्वासित केलेली माहिती **परिशिष्ट 'अ' मध्ये विवरणपत्र क्र. ४** समाविष्ट करण्यात आलेली आहे.

**१.४५** विभागाने दिलेल्या उपरोक्त माहितीवरुन असे दिसून येते की, सन १९८९ ते २०१० पर्यंत महाराष्ट्र विक्रीकर न्यायाधिकरणाकडे ३८८३ अपीलप्रलंबित आहे. प्रलंबित अपिलाची विभागवार यादी तपासली असता १ एप्रिल, २०१० पर्यंत ४११७ अपीलआहे. उपायुक्ताकडे १११२१-५० अपीलप्रलंबित आहे. विक्रीकर विभागाकडे असलेल्या अपिलांची संख्या विचारात घेता फारच कमी अपीलनिकाली

काढण्यात आले आहेत. यामध्ये गतीमानता येणे आवश्यक आहे. याबाबत जे अधिकारी जबाबदार असतील त्यांच्यावर कारवाई करुन दोन महिन्यात समितीला अहवाल सादर करण्याचे विभागीय सचिवांनी समितीला आश्वासित केले होते. यासंदर्भात कोणतीही माहिती समितीस विक्रीकर विभागाकडून प्राप्त झालेली नाही. त्यामुळे सदर माहिती समितीला सादर करण्यात यावी असे निदेश समितीने साक्षीचेवेळी सचिवांनी दिले,

**१.४६** याच संदर्भात समितीने अशी विचारणा केली की, निर्धारणा अधिकाऱ्यांनी योग्य प्रकारे नोटीस न देणे, तसेच करदात्यास मागणीपत्र आणि निर्धारणा आदेश प्राप्त न झाल्यामुळे विलंब झालेल्या प्रकरणी जबाबदारी कोणवर निश्चित करण्यात आली आहे ? यावर विभागाने असा खुलासा केला की, दिनांक २५.०८.०३ रोजी एकतर्फी निर्धारणा आदेश पारित करण्यात आला होता. निर्धारणा आदेशाविरुध्द दाखल केलेल्या अपिलाचा दिनांक २२.०३.०४ च्या निर्णयानुसार व्यापाऱ्यास नव्याने पुस्तके दाखविण्याची संधी देण्यात आली. त्यानुसार दि. १०.११.०४ रोजी कलम ३३(५) अन्वये निर्धारणा आदेश पारित करण्यात आला, म्हणजेच ७ महिन्यात अपीलआदेश निकालात काढण्यात आले. निर्धारणा आदेश व मागणीपत्र नोंदणीकृत डाकेने भोपाळ येथे पाठविण्यात आली आहे. त्यामुळे निर्धारणा आदेश पारित करण्यासाठी विलंब झालेला नाही.

**१.४७** मे.विक्रांत फार्मा या प्रकरणातील अपिलाची सद्यःस्थिती काय आहे ? अशी समितीने विचारणा केली असता, विभागाने असा खुलासा केला की, दि. २१.०२.०५ व ०६.०३.०६ रोजी अपीलनिकालात काढण्यात आले आहेत अपीलआदेशानुसार अनुक्रमे रु. १४.८४ व रु. २१.३५ लक्ष कर दायित्व निश्चित करण्यात आले आहे. वसुलीची कार्यवाही चालु आहे.

**१.४८** मे.नारंग इंटरनॅशनल हॉटेल लि. या प्रकरणी न्यायाधिकरणाच्या निर्णय प्राधिकाऱ्यांना कळविण्यास १२ महिन्यांचा विलंब होण्याची कारणे काय आहेत ? यावर विभागाने असा खुलासा केला की, दि. ०६.११.०१ चा न्यायाधिकरणाचा न्याय निर्णय विक्रीकर सह आयुक्त (विधी) यांना दि. २२.०४.०२ रोजी प्राप्त झाला आहे. न्याय निर्णय प्राप्त झाल्यानंतर विक्रीकर सह आयुक्त (विधी) यांना न्याय निर्णय स्विकारावा किंवा त्याविरोधात हायकोर्टात संदर्भ अर्ज दाखल करावा याबाबत शेरे लिहीण्यासाठी ९० दिवसाचा कालावधी आवश्यक असतो. विक्रीकर सह आयुक्त यांना न्यायाधिकरणाच्या निर्णय प्राधिकाऱ्यांना कळविण्यास १२ महिने नव्हे तर ४ महिने प्रशासकीय कारणात्सव विलंब झाला आहे.

**१.४९** मे.भारत हेवी इलेक्ट्रिकल्स लि.या प्रकरणी व्यापाऱ्याने दाखल केलेल्या द्वितीय अपिलाची सद्यःस्थिती विषयी माहिती देताना विभागाने खुलासा केला की, न्यायधिकरणात दाखल केलेले द्वितीय

अपील१६३६-३७/०६ प्रलंबित आहे. न्यायाधिकरण यांनी दि. ०५.०५.०८ च्या पत्रान्वये वसुलीस स्थगिती दिलेली आहे.

**१.५०** मे.भोपाळ शुगर इंडस्ट्रिज या कंपनीस निर्धारणा अधिकाऱ्यांनी योग्य प्रकारे नोटीस न दिल्यामुळे प्रकरण पुर्न:निर्धारणेसाठी प्रलंबित असल्याप्रकरणी कोण जबाबदार आहे ? याबाबत विभागाने असा खुलासा केला की, दि. २५.०८.२००३ रोजी एकतर्फी निर्धारणा आदेश पारित करण्यात आला होता. निर्धारणा आदेशाविरुध्द दाखल केलेल्या अपिलाचा दि. २२.०३.०४ च्या निर्णयानुसार व्यापाऱ्यास नव्याने पुस्तके दाखविण्याची संधी देण्यात आली. त्यानुसार दि. १०.११.०४ रोजी कलम ३३(५) अन्वये निर्धारणा आदेश परित करण्यात आला. सदर निर्धारणा आदेशाच्या दुरुस्तीसाठी व्यापाऱ्याने दि. ८.१२.०४ रोजी पत्र सादर केले होते. त्यानुसार व्यापाऱ्यास अंतिमत: दि. २७.८.०७ रोजी हजर राहण्यास कळविले होते. दि. २७.८.०७ रोजी व्यापारी हजर न झाल्यामुळे दि. १०.११.०४ चा निर्धारणा आदेश कायम करण्यात आला. व त्यानुसार वसुली कार्यवाही सुरु आहे. निर्धारणा आदेश कायम करण्यात आल्यामुळे पुर्न:निर्धारणा आदेश प्रलंबित नाही.

**१.५१** मे.दवे पेंन्टस् लि. याप्रकरणी अपीलदाखल करण्यासाठी ९४ व २३ महिने विलंब झाला हा विलंब करदात्यास मागणीपत्र व निर्धारणा आदेश प्राप्त न झाल्यामुळे होता, याप्रकरणी विलंब होण्यास कोण जबाबदार आहे ? अशी समितीने विचारणा केली असता, विभागाने असा खुलासा केला की, ९२-९३ व ९३-९४ या कालावधीचे निर्धारणा आदेश अनुक्रमे दिनांक २१.३.९६ व दिनांक २८.२.०२ रोजी पारित झाले. परंतु व्यापाऱ्यांचे ठाणे येथील कार्यालय बंद झाल्यामुळे अभिलेखावर उपलब्ध असलेल्या कार्यालयाच्या ७ पत्यांवर निर्धारणा आदेश व मागणी पत्र रजिस्टर पोस्टाने पाठविण्यात आले. ९३ - ९४ वर्षाची निर्धारणा आदेश व मागणीपत्र नरिमन पॉईंन्ट व विलेपार्ले येथील पत्त्यावर वेळेवर बजावले गेले. परंतू ९२-९३ या वर्षाची निर्धारणा आदेश व मागणीपत्र बजावण्यास विलंब झाला आहे. व्यापाऱ्यांचे मुंबई येथील कार्यालय शोधून निर्धारणा आदेश व मागणी पत्र बजावण्यास विलंब झाला आहे. सदर कालावधीत पुढील अधिकारी कार्यरत होते. १.श्री.एस.एस.सावकारे, २.श्री.एस.डी.देशमुख, ३.श्री.बी.एल.राठोड, ४.श्री.एस.जी.डांगे हे सर्व अधिकारी आता सेवानिवृत्त झाले आहेत. औद्योगिक आणि वित्तीय पुर्न:निर्माण बोर्ड यांनी दि. १४.२.०८ च्या आदेशान्वये व्यापाऱ्यास आजारी उद्योग म्हणून घोषित केले आहे. दि. ३१.३.०६ पर्यंतच्या देयास संरक्षण दिले आहे असे आयुक्तांनी समितीला सांगितले.

**परि.क्र. २.४.३.(१)**

**१.५२** उपरोक्त परिच्छेदातील प्रकरणाबाबत महालेखापरीक्षकांनी दिलेल्या अभिप्रायाबाबत समितीने अशी विचारणा केली की, मे. वल्लभ ग्लास कंपनीकडील वसुलीबाबतची सद्यःस्थिती काय आहे ? त्यावर सचिवांनी असा खुलासा केला की, या प्रकरणामध्ये संबंधित व्यापारी हा गुजरात उच्च न्यायालयात गेला असल्याने गुजरात उच्च न्यायालयाकडे आम्ही प्रकरण सादर केले आहे. यामधून आपल्याला वसुली करावयाची असून तसे गुजरात मध्ये वसुली अधिकाऱ्यास कळविण्यात आले आहे. तसेच हे प्रकरण बीआयएफआरकडे चालू असून संबंधित रजिस्ट्रारकडे १२ स्मरणपत्रे पाठवून कळविण्यात आले आहे. यावर समितीने पुन्हा अशी विचारणा केली की, मुंबई, कोलकाता, गुजरात वगैरे उच्च न्यायालयात अशी अनेक प्रकरणे असतील. अजून कोणकोणत्या राज्यात अशी प्रकरणे न्यायालयापर्यंत गेलेली आहेत ? यासाठी आपल्याकडे कोणती यंत्रणा कार्यरत आहे ? याबाबत विक्रीकर आयुक्तांनी खुलासा केला की, सर्वोच्च न्यायालयात प्रकरण असेल तर माननीय सचिव हे काम बघतात आणि राज्यातील उच्च न्यायालयातील प्रकरण असेल तर संबंधित क्षेत्रीय अधिकारी हे काम पाहतात.

**१.५३** समितीने अशी विचारणा केली की, You must be sending your officers to attend the cases which are being heard in the Courts within the State. But, so far as the cases pertaining to High Courts of other States and the Supreme Court Cases are concerned, what type of machinery do you have? याबाबत विक्रीकर आयुक्तांनी खुलासा केला की, अधिकृतरित्या ही प्रकरणे परिसमापकाकडे असल्याने आपण फक्त स्मरण करुन देतो. तथापि हे योग्य नाही. असे समितीने नमूद करुन संबंधित व्यापारी हा दुसऱ्या राज्याच्या उच्च न्यायालयात दाद मागण्यासाठी दावा दाखल करतो, ही त्याची पळवाट नाही काय ? अशी विचारणा केली असता सचिवांनी खुलासा केला की, त्या कंपनीचे खरोखरच दिवाळे निघाले आहे. तरी देखील आपला दावा आपण उच्च न्यायालयाला कळविणे आवश्यक असते. त्यासाठी संपर्क अधिकारी किंवा वकील नेमावा लागेल. कारण या सर्व केसेस अतिशय किचकट असून ती बीआयएफआरकडे गेलेली आहे. याबाबत महालेखाकार यांनी अभिप्राय व्यक्त केले की, There are some cases wherein Property has not been attached and no further action has been taken. I would like to quote one case of Vasandada Spinning Mills Ltd., Miraj. In this case no action has been taken. यावर सचिवांनी खुलासा केला की, The claim has been lodged with the DRT. त्यावर समितीने विचारणा केली की, आपल्या खात्याचा अधिकारी तेथे आहे काय ? याबाबत सचिवांनी खुलासा केला की, अशा ठिकाणी आमचे स्थानिक निर्धारणा अधिकारी असतात.

**१.५४** समितीने अशी विचारणा केली की, मे.एसीया पॅसिफिक इन्व्हेस्टमेंट लि. या कंपनीबाबत उच्च न्यायालय, आंधप्रदेश यांचकडील प्रलंबित प्रकरणांची सद्य:स्थिती काय आहे ? यावर विभागाने खुलासा केला की, जिल्हाधिकारी हैद्राबाद यांना जमीन महसूल वसुली प्रमाणपत्र पाठविण्यात आले आहे. प्रकरण अद्याप प्रलंबित आहे.

**१.५५** मे. एच.एम.पी. सिमेंट प्रकरणी पोलिस आयुक्त कलकत्ता यांनी काय कार्यवाही केली याबाबत विभागाने असा खुलासा केला की, व्यापाऱ्याने बीआरएफआर कडे आजारी घटक घोषित होण्यासाठी अपील केले होते त्यामुळे वसुली कार्यवाही स्थगित करण्यात आली होती. बीआरएफआर कडून सदर अपील फेटाळण्यात आल्यामुळे पुन्हा पोलिस अभियोग कार्यवाही करण्यात येत आहे.

**१.५६** मे.सोना ऑईल इंडस्ट्रिल प्रकरणातील कर्ज वसुली दाव्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ? याबाबत विभागाने असा खुलासा केला की, कर्ज वसुली न्यायालय, पुणे यांचा निकाल विरोधात आता डि.आर.टी मुंबई यांच्याकडे क्रमांक ३५९/२००६ अन्वये अपील दाखल केली आहे. अपील अद्याप प्रलंबित आहे.

**१.५७** जे.के.बी.एम.लि.बाबत कलकत्ता उच्च न्यायालयाने केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला द्यावी. याबाबत विभागाने असा खुलासा केला की, कलकत्ता उच्च न्यायालयाच्या परवानगीने इंडस्ट्रियल इनव्हेस्टमेंट कॉर्पोरेशन यांनी व्यापाऱ्याची स्थावर व जंगम मालमत्तेचा लिलाव केला आहे. उच्च न्यायालयाने विक्रीकर थकबाकीबाबत दावा दाखल करण्याचे निर्देश दिले आहेत त्यानुसार कलकत्ता उच्च न्यायालयात प्रतिज्ञा पत्र नोटराईज करुन दावा दाखल केला आहे.

**१.५८** महालेखाकारांनी अशी विचारणा केली की, One Case is regarding Silver Star Wines involving an amount of Rs. 7.57 crores. In this Case it has been stated that no property is available for recovery. त्यावर समितीने अधिक विचारणा केली की, या प्रकरणात आयकर विभागाने लिलाव केला तेव्हा आपला बोजा त्या मालमत्तेवर लावलेला नव्हता काय ? कारण हा लिलाव सन **२००६** मध्ये करण्यात आला होता आणि त्यावर आपला दावा असल्याने आपण आयकर विभागाला न कळविता त्यांना लिलाव करायला परवानगी कशी दिली ? हे प्रकरण थोडे थोडके नसून ७.५७ कोटीचे आहे. सकृतदर्शनी समितीला असे दिसते की, सन २००३ मध्ये कळले झाले तरी देखील त्या व्यापाऱ्याच्या मालमत्तेवर टाच आपण आणली होती. त्यानंतर सन २००६ मध्ये आयकर विभागाने त्या मालमत्तेचा लिलाव केला. आपल्या विभागाची जर त्या मालमत्तेवर टाच होती तर त्या मालमत्तेचा

लिलाव आयकर विभागाला कसा करता येईल ? आपण त्या लिलावावर स्थगिती का आणली नाही ? Which Officer was handling this case?

**१.५९** याबाबत विक्रीकर आयुक्तांनी खुलासा केला की, संबंधित अधिकारी असतो तोच यासंबंधीची कारवाई करतो. त्यासंबंधीची माहिती समितीला सादर करण्याचे आश्वासित केले. त्यावर समितीने पुन्हा विचारणा केली की, You submit information to this Committee about the action taken by you in this case during the last few years. You submit this information within a month, otherwise the Committee would take serious action in this matter. You can recover the amount from the concerned Officer. Even if the Officer is retired, you can recover the amount from his pension. यावर सचिवांनी खुलासा केला की, आमच्या अधिकाऱ्यांनी असेही सांगितले की, या व्यापाऱ्याचे "सिल्व्हर स्टार" नावाचे वाईन शॉप आहे ते सध्या बंद पडले आहे. पण सदर व्यापाऱ्याने हे दुकान पुन्हा नावात बदल करुन दुसरीकडे काढण्यात आले की कसे यासंबंधी राज्य उत्पादन शुल्क विभागाशी समन्वय साधून ही माहिती घेण्यात येईल. तसे आढळून आल्यास त्या दुकानाच्या परवान्यावर सुध्दा बंदी आणता येईल. अशा सूचना संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत.

**१.६०** समितीने असे नमूद केले की, The Committee is very serious about this Case. You send us details of action taken in this matter. मोक्याच्या जागेवर हे दुकान असेल म्हणून कदाचित ते बंद करुन दुसरीकडे तो व्यापारी भागीदार म्हणून सहभागी झाला असावा म्हणून मोक्याची जागा सोडून दिली असणार. म्हणून या प्रकरणासंबंधीची माहिती समितीला ताबडतोब सादर करावी. तसेच यामध्ये आपण पोलिसात प्रकरण दाखल केले आहे काय ? त्यावर विक्रीकर आयुक्तांनी खुलासा केला की, होय, आयकर विभागाने व्यापाऱ्याच्या दुकानाचा लिलाव केला म्हणून आपली रक्कम वसुल करण्यासाठी त्या व्यापाऱ्याकडे मालमत्ताच शिल्लक नसल्यामुळे त्या व्यापाऱ्याला शोधण्यासाठी सहाय्यक आयुक्त, पोलीस सेल, यांच्याकडे तक्रार दाखल केली आहे. वरील प्रमाणे आश्वासित केलेली माहिती **परिशिष्ट 'अ' मध्ये विवरणपत्र क्र. ५** समाविष्ट करण्यात आली आहेत.

**१.६१** मे. चाकण सोप केमिकल्सच्या बाबतीत सुध्दा वसुली प्रमाणपत्राचा पाठपुरावा केला नाही, त्याचे कारण काय आहे याविषयी विक्रीकर आयुक्तांनी खुलासा केला की, याप्रकरणी अद्याप प्रदान झालेले नाही, संबंधित प्रकरणात आरआरसी दिली आहे. तसेच या प्रकरणामध्ये जर अधिकाऱ्यांची चूक असल्याचे निदर्शनास आले तर त्या संबंधित अधिकाऱ्यावर कारवाई करण्यात येईल. असे सचिवांनी समितीला आश्वासित केले होते. याबाबत विक्रीकर विभागाकडून प्राप्त झालेल्या माहितीचा समावेश **परिशिष्ट 'अ' मध्ये विवरणपत्र क्र ६** आहे.

**१.६२** मे.आदर्श केमिकल ॲन्ड फर्टिलायझरर्स कंपनी यासंदर्भात मामलेदार कार्यालय सुरत यांचेकडून वसुली अहवाल प्राप्त झाला आहे काय ? याबाबत विभागाने असा खुलासा केला की, जिल्हाधिकारी सुरत यांना दि. १४/७/९८ रोजी महसूल वसुली प्रमाणपत्र पाठविण्यात आले आहे. अद्याप वसुली अहवाल प्राप्त झालेला नाही.

**१.६३** मे.पार्वती पॅकिंग इंडस्ट्रिज या कंपनीबाबतचा सिटी सर्व्हे अधिकारी कुपवाडा, डि.आय.जी. सांगली व मुल्यांकन अधिकारी सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेकडून अहवाल प्राप्त झाला आहे काय, नसल्यास होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ? अशी समितीने विचारणा केली असता, याबाबत विभागाने असा खुलासा केला की, व्यापाऱ्यांच्या जागेवर बोजा नोंदविण्यासाठी सिटी सर्व्हे अधिकारी कुपवाड यांना कळविण्यात आले आहे. मुल्यांकन अधिकारी सार्वजनिक बांधकाम कार्यालय यांना पत्रे पाठविली आहेत. त्यांचेकडील अहवाल प्रलंबित आहेत. पाठपुरावा चालू आहे.

**१.६४** मे.प्रिमियर फिल्टर प्रा.लि. या कंपनीबाबतच्या न्यायालयीन प्रकरणांची सद्यःस्थितीबाबत विभागाने असा खुलासा केला की, सत्र न्यायालयात दाखल केलेले प्रकरण प्रलंबित आहे.

**१.६५** मे.किर्लोस्कर इलेक्ट्रीक कंपनीच्या स्थगिती आदेशाचा थोडक्यात आशय काय आहे ? याबाबत विभागाने असा खुलासा केला की, न्यायाधिकरण यांच्या दि. १३.७.२००७ च्या आदेशानुसार वसुलीस स्थगिती होती. न्यायाधिकरण यांनी द्वितीय अपील १०७५/०६ चा दि. २६.६.२००९ रोजी दिलेल्या न्याय निर्णयानुसार व्यापाऱ्याने दि. २६.६.२००९ रोजी रु.१०००००० चा पूर्ण भरणा केल्यामुळे अपील आदेश रद्द झाला आहे. सद्या प्रकरण प्रथम अपील अधिकारी यांचेकडे प्रलंबित आहे.

**१.६६** मे.ग्राऊंडनट प्रोसेसर्स सहकारी सोसायटी लि. सांगली ऋणशोधन अधिकारी यांचेकडे प्रलंबित असलेल्या प्रकरणाची व सद्यःस्थिती काय आहे ? याबाबत विभागाने असा खुलासा केला की, व्यापाऱ्याचा व्यवसाय निर्धारणेपूर्वी बंद होता. त्यामुळे निर्धारणेसाठी कोणीही उपस्थित होऊ शकले नाही. सबब एकतर्फी निर्धारणा आदेश दि. २३.३.२००१ रोजी पारित केला. मागणीपत्र दि. ३१.३.२००१ रोजी काढण्यात आले. व ऋणशोधन अधिकारी यांना बजावण्यात आले. परंतु जिल्हानिबंधक सहकारी संस्था यांनी यापूर्वीच दि. २३.३.२००१ रोजी सदर व्यापाऱ्याची स्थावर व जंगम मालमत्तेचा लिलाव केला आहे. ऋणशोधन अधिकारी यांनी त्यांचे दि. १२.९.२००३ च्या पत्रान्वये व्यापाऱ्याकडे आता कोणतीही स्थावर व जंगम मालमत्ता शिल्लक नसल्यामुळे विक्रीकराची प्रलंबित वसुली आता वसुल करता येत नसल्याचे कळविले आहे.

## अभिप्राय व शिफारशी :

**१.६७ समितीसमोर आलेल्या उपरोक्त माहितीवरून असे दिसून येते की, बाटा, इंडिया लिमिटेड कंपनीचा अहमदाबादवरून अहवाल आला नाही. त्यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती तसेच अशाच स्वरूपाचे अपोलो टायर्स कंपनीचे प्रकरण असून या दोन्ही प्रकरणामध्ये अंतिम निर्णय घेण्यासाठी विक्रीकर अधिनियमात तरतूद आहे काय त्यानुसार संबंधीत कंपन्यावर आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यांत सादर करावी, अशी समितीची शिफारस आहे.**

**१.६८** अभय योजनेबाबत बरेच व्यापारी आग्रही आहेत. अभय योजना आणून शासनाचे नुकसान झाले असे समितीचे मत आहे. शासनाने लावलेला कर योग्य असेल तर कोणतीही योजना आणून शासनाच्या कराचे नुकसान करु नये असे समितीला वाटते.

**१.६९** सन २००४ नंतर कोणतीही अभय योजना शासनाने आणलेली नसली तरी व्यापाऱ्यांना कर भरण्यासाठी प्रोत्साहीत करणे आवश्यक आहे. सन २००४ मध्ये शासनाने अभय योजना आणली होती त्यावेळी २५ कोटी रूपयांचे उत्पन्न शासनास मिळाले होते आणि ७५ कोटी रूपयांचे नुकसान झाले होते. तसेच यामुळे जे व्यापारी नियमित कर भरत असतात त्यांच्यावर एकप्रकारे अन्याय होतो. सन १९९९ मध्ये अभय योजनेत ५०८७३ अर्ज आले होते. त्यामध्ये ८२.२० कोटी रूपये गोळा झाले. ही योजना लागू केली नसती तर २९९.२० कोटी शासनास येणे होते. जवळपास ३०० कोटी रूपयांपैकी फक्त १०० कोटी रूपये शासनाच्या तिजोरीत जमा झाले. दुसरी योजना सन २००४ मध्ये आली. त्यास चांगला प्रतिसाद मिळाला. त्यावेळी २,६९,००० अर्ज आले होते. त्यानुसार आपल्याकडे रूपये ४५१ जमा झाले. रूपये ७९१ कोटी सोडून दिले म्हणजे प्रत्यक्षात १/३ रक्कम जमा झाली आहे. वरील योजनांमध्ये शासनाचे जवळ जवळ एक हजार कोटी रूपयांचे नुकसान झाले आहे. अभय योजना बंद केल्यामुळे वसुलीचे प्रमाण वाढले आहे. गत पाच वर्षात ३५० कोटी रूपयांची वसुली करण्यात आली आहे. सन २००९-२०१० मध्ये ६०० कोटी रूपयाच्या वर वसुली झाली आहे.

**१.७०** अभय योजनेतून शासनाला ८५ टक्के निधी मिळाला पाहिजे. १०-१५ टक्के निधी गेला तर त्यास समितीचा विरोध नाही. परंतु अभय योजनेमध्ये १० ते १५ टक्के निधी शासनाकडे जमा झालेला आहे व ८५ टक्के निधी जमा झालेला नाही. **ही बाब गंभीर असून याबाबत समिती तीव्र नापंसती व्यक्त करते, यापुढे अशा प्रकारच्या योजना आणताना शासनाकडे जास्तीत जास्त कसा महसूल जमा होईल यादृष्टीने योजना आखण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**१.७१** आठ विभागातील ३२ व्यापाऱ्यांच्या १९९८-९९ आणि २००१-२००२मधील करातून सूट दिलेल्या रूपये ३५५.३४ कोटी किंमतीच्या हस्तांतरित मालाच्या निर्धारणातील नमुना फ घोषणापत्रात हस्तांतरकर्ता/हस्तांतरक यांची नावे, त्यांच्या वैध तारखेसहीत नोंदणी प्रमाणपत्र क्रमांक, बिल क्रमांक व

दिनांक, रेल्वे पावती क्रमांक, मालाचा तपशील व परिमाण माल पाठविल्याचा व पोहचण्याचा तपशील इत्यादी दिलेला नव्हाता. ही अपुरी आणि अवैध घोषणापत्रे स्वीकराल्यामुळे रूपये ३४.७३ कोटी दंड व रूपये ९.३४ कोटी व्याजासहीत रूपये ७८.७९ कोटी महसुलाची वसुली होऊ शकलेली नाही. यात एकमेकांचे दस्तऐवज तपासणे गरजेचे आहे. व्यापाऱ्याने खरोखरच विक्री कर भरला आहे किंवा नाही याची तपासणी करण्याची विभागाची जबाबदारी आहे. तशी तपासणी होत नसेल तर व्यापारी फसवू शकेल. व्यापारी संबंधीत राज्याचा 'फ' फॉर्म देतात. त्यानुसार विभाग कार्यवाही करतो. 'फ' फॉर्म हा कोणत्याही राज्याचा डिलर देत नाही. हा फॉर्म संबंधीत राज्याकडूनच मिळतो. फॉर्म देण्यापूर्वी मागील पुरावा देणे आवश्यक आहे. विभागाने संपूर्ण कागदपत्र लेखापरिक्षणाचे वेळी उपलब्ध करून दिले नाही. पुष्कळ कागदपत्र असल्यामुळे सगळे अभिलेखे तपासणीसाठी ठेवले जात नाही. परंतु जेवढया कागदपत्रांची तपासणी करण्यात येणार आहे तेवढी कागदपत्रे महालेखाकारांना सादर करणे आवश्यक आहे. **लेखापरिक्षणाच्यावेळी महालेखाकारांना कागदपत्रे सादर न करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांना समज देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**१.७२** एकूण ३२ प्रकरणापैकी १९ प्रकरणामध्यें वाहतुकीचे पुरावे अभिलेख्यावर ठेवलेले आहेत तसेच 'फ' फार्म देखील उपलब्ध आहेत. ९ प्रकरणांमध्ये हस्तांतरणाचे दावे माल वाहतुकीच्या जावक पुराव्याच्या तपासणीच्या आधारे मान्य करण्यात आलेले आहे. त्याचबरोबर प्रकरण क्रमाक ६,९, २८ या ३ प्रकरणामध्ये क्रॉस चेक मेमो पाठविण्यात आले आहेत. त्याचे उत्तर अजून आलेले नाही. प्रकरण क्रमांक २७ मध्ये संबंधित व्यक्ती अपीलात गेली असून हे प्रकरण अंतिम सुनावणीमध्ये आहे. ही प्रकरणे फार जुनी आहेत परंतु अजूनही त्यांच्याकडून माहिती प्राप्त झाली नाही. दुसऱ्या राज्याकडून उत्तरे यावयाची आहेत. वेळेवर उत्तर पाठविणे त्यांच्यावर बंधनकारक नाही. **माहिती वेळेवर देणे हे बंधनकारक असतानाही वर्षानुवर्ष माहिती न देणे ही बाब गंभीर आहे. त्यामुळे याबाबत योग्य ती दखल घेऊन कार्यवाही करण्यात यावी. तसेच वरील मुद्दे लोकलेखा समितीच्या मा.समिती प्रमुखांच्या देश पातळीवर होणाऱ्या बैठकीत मांडण्यासाठी अधिनियम व नियम यामधील तरतूदी व त्यामध्ये सुधारणा करण्याची आवश्यकता तसेच वरील मुद्दयांबाबत करावयाची आवश्यक ती उपाययोजना याबाबत समितीला सविस्तर माहिती ३ महिन्यांत देण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

**१.७३** मे.ट्रीडंट स्टील लि, सोमेश स्टील कंपनी, विक्रांत फर्मा, देवयानी ट्रेडींग, नांरग इंटरनॅशनल हॉटेले, भारत हेवी इलेक्ट्रीकल्स, भोपाळ शुगर इन्डस्ट्रीज, दवे पेन्टस इत्यादी कंपन्याची अपीलप्रकरणे निकाली काढण्यासंबंधी दिंरगाई होत असून काही प्रकरणामध्ये तर रु. ३.८ कोटी गुंतले आहेत. काही अपीले विभागीय अधिकाऱ्यांकडे तर काही अपील न्यायाधिकरणाकडे असतात. एक अपील शासनाकडे प्रलंबित आहे आणि एक अपील न्यायाधिकरणाकडे प्रलंबित आहे. बाकीच्या प्रकरणामध्ये वसुली सुरु आहे.

**१.७४** मे.ट्रीडंट स्टील कंपनीच्या प्रकरणात ३ कोटी ६७ लाख रुपये गुंतले असून न्यायाधिकरणाकडून अपील परत पाठविण्यात आले आहे आणि आता उच्च न्यायालयात दावा दाखल करण्यात आला आहे.

त्याचबरोबर सोमेश स्टील यांच्या प्रकरणात ८ कोटी ३ लाख रुपये गुंतले असून त्यांचे अपील फेटाळण्यात आले आहे. न्यायाधिकरणाकडून कंपनीचे प्रकरण विभागाकडून आले आहे आणि आता वसुलीसाठी प्रलंबित आहे. एकूण आठ अपीले असून त्यापैकी एक अपील शासनाकडे आणि एक न्यायाधिकरणाकडे प्रलंबित आहे. उरलेल्या सहा अपीलामध्ये अपील अधिकाऱ्याने स्वतः पडताळणी केलेली आहे. **वसुलीची प्रकरणे वर्षानुवर्षे प्रलंबित आहेत. ज्या अधिकाऱ्यांवर जबाबदारी सोपविली आहे ते एकतर निवृत्त झाल्यामुळे किंवा बदली झाल्यामुळे कार्यवाही प्रलंबित राहते. त्यादृष्टीने बँका किंवा इतर वित्तीय संस्था यांच्याकडे वसुलीसाठी ज्याप्रमाणे स्वतंत्र विभाग कार्यरत असतो तसा विभाग कार्यरत असणे आवश्यक आहे अशी समितीची शिफारस आहे.**

**१.७५** वेळेवर जर पैसे वसूल झाले नाही व जागेचा लिलाव करावयाची वेळ आल्यास लिलावाच्या वेळी देखील विभागातील संबंधित अधिकारी उपस्थित राहिला पाहिजे. प्रलंबित प्रकरणांबाबत सुधारणा करुन यासंबंधी जबाबदारी निश्चित करून संबंधीतांवर कारवाई होणे आवश्यक आहे. वर्षानुवर्षे प्रकरणे प्रलंबित राहतात त्याकडे कोणाचेही लक्ष नसते. ही प्रकरणे धूळ खात पडतात आणि त्यामध्ये कोट्यावधी रूपये अडकून पडतात यामध्ये शासनाचे नुकसान होते. महसूल न मिळाल्याने शासनास समाजपयोगी योजना राबविण्यास अडचणी येतात त्यामुळे पैशाची वसुली वेळेवर होणे आवश्यक आहे. समितीपुढे आठ प्रकरणे आली आहेत. या व्यतिरिक्त आणखी काही प्रकरणे असू शकतील असे समितीने मत व्यक्त केले. त्यामुळे समितीपुढे आलेल्या आठ प्रकरणांची व या व्यतिरिक्त विभागाकडे असलेल्या **आणखी काही प्रकरणांची चौकशी करण्यात यावी चौकशीत जर काही अधिकारी दोषी असतील तर त्यांच्याविरुध्द निश्चित कारवाई करण्यात यावी व दोषी अधिकाऱ्यांविरुध्द केलेल्या कारवाईची माहिती समितीला तीन महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**१.७६** विक्रीकर चुकविणाऱ्या संबंधीत व्यापाऱ्याला नोटीस दिली जाते, ती योग्य प्रकारे दिली जात नाही त्या व्यक्तीला न्यायालयात जाण्यास संधी मिळावी यादृष्टीने नोटीस मध्ये काही त्रुटी ठेवल्या जातात. अशा प्रकरणामध्ये अधिकाऱ्यांचा सुध्दा काही प्रमाणात सहभाग असतो. काही काही वेळा एका ठिकाणी सुरु असलेला उद्योग बंद करून तो दुसरीकडून सुरु केला जातो आणि नोटीस मात्र अगोदरच्या जागेवर चिकटवली जाते त्यामुळे ही नोटीस विहीत कालावधीत प्राप्त न झाल्याने त्यास उत्तर देण्याचे बंधन व्यापाऱ्यावर राहत नाही तेव्हा बँका वा इतर वित्तीय संस्था ज्याप्रमाणे वर्तमानपत्रात जाहिराती देतात त्याप्रमाणे या विभागाने देखील वर्तमानपत्रात जाहिरात देण्याची पध्दत सुरु करणे आवश्यक आहे. अशी समितीची शिफारस आहे.

**१.७७** मे.ट्रीडंट स्टील लि., वरळी या कंपनीच्या बाबत मा.न्यायाधिकरण यांचेकडून अपीलपरत पाठविल्यानंतर सदर प्रकरणात १५ महिन्यानंतर स्मरणपत्र पाठविले आणि मे.सोमेश स्टील मॅन्युल अपीलप्रकरणी २५ महिन्यानंतर सुनावणीची नोटीस काढली. अशा प्रकारे दीड ते दोन वर्षांचा कालावधी नोटीस व स्मरणपत्रासाठी लागत असेल तर विभागाचे प्रमुख म्हणून संबंधितांवर कारवाई करणे आवश्यक आहे असे असताना तीन तीन वर्षापर्यंत भेटच दिलेली नाही. यावरुन वसुलीबाबत विभाग गंभीर दिसत नाही. याबाबत समिती नापसंती व्यक्त करते.

**१.७८** ओएनजीसीमध्ये सहाय्यक विक्रीकर आयुक्त आहेत, त्यांनी विक्रीकराची वसूली थांबविण्यासाठी वारंवार आदेश निर्गमित केले आणि कारवाई मात्र कनिष्ठ अधिकाऱ्यांवर करण्यात आली. या प्रकरणात त्याच बरोबर अशी जेवढी प्रकरणे आहेत त्या सर्व प्रकरणांची माहिती जमा करुन समितीला तसेच त्यांची सद्य:स्थिती सादर करण्याचे सचिवांनी आश्वासीत करुनही संबंधित अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित केल्याची व कारवाई केल्याची माहिती समितीस अहवाल तयार करेपर्यंतही प्राप्त झाली नाही. याबाबत **समिती तीव्र नापासंती व्यक्त करुन समिती अशी शिफारस करीत आहे की, उपरोक्त प्रकरणी जे अधिकारी जबाबदार असतील त्यांची चौकशी करून चौकशीत दोषी आढळलेल्या अधिकाऱ्यांविरुध्द योग्य ती कारवाई करण्यात यावी व याप्रकरणी केलेल्या कारवाईची माहिती समितीला तीन महिन्यात देण्यात यावी.**

**१.७९** सन १९८९ ते २०१० पर्यंत महाराष्ट्र विक्रीकर न्यायाधिकरणाकडे ३८८३ अपीलप्रलंबित आहे. प्रलंबित अपिलाची विभागवार यादी तपासली असता १ एप्रिल, २०१० पर्यंत ४११७ अपीलआहे. उपायुक्ताकडे १११२१.५० अपीलप्रलंबित आहे. विक्रीकर विभागाकडे असलेल्या अपिलांची संख्या विचारात घेता फारच कमी अपीले निकाली काढण्यात आली आहेत. अपील प्रलंबित राहून वेळ तर वाया जातोच शिवाय शासनास येणे असलेला महसूल देखील फारच विलंबाने प्राप्त होतो. या अपीलांच्या सुनावणीस होणारा खर्च व येणे असलेली रक्कम कालांतराने त्याचे मुल्य कमी होऊन शासनाचे नुकसान होते त्यामुळे यामध्ये गतीमानता येणे आवश्यक आहे. सबब याबाबत शासनाने निश्चित स्वरुपाची कालमर्यादा निश्चित करुन त्या कालमर्यादेमध्येच अपिलातील प्रकरणे निकालात काढण्याचे दृष्टीने कार्यपध्दती आखावी व प्रलंबित प्रकरणे निकालात काढून त्याबाबतची सविस्तर माहिती समितीला पाठवावी व **याबाबत जे अधिकारी जबाबदार असतील त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी व यासंदर्भात परिपुर्ण माहिती समितीला तीन महिन्यांत सादर करण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

**१.८०** मे.वल्लभ ग्लास कंपनी, मे.एसीया पेसिफिक इन्व्हेस्टमेंट लि, मे.एच.एम.पी. सिमेंट कंपनी, मे. सोना ऑईल इंडस्ट्रिज, मे.जे.के.बी.एम.लि., सिल्वर स्टार वाईन शॉप, मो.चाकण सोप केमिकल्स, मे.आदर्श केमिकल ॲन्ड फर्टिलायझर्स कंपनी या सर्व कंपन्यांचे अपीलविविध स्तरावर व वेगवेगळ्या कारणामुळे प्रलंबित आहेत. तसेच काही व्यापाऱ्यांची कोणतीही स्थावर व जगंम मालमत्ता शिल्लक नसल्यामुळे विक्रीकराची प्रलंबित वसुली करता येत नसल्याची बाब विभागाने समितीच्या निदर्शनास आणली असून समिती याबाबत नाराजी व्यक्त करते. फारच क्वचित प्रसंगी व्यापारी त्यांच्या व्यवसायातील स्थावर व जंगम मालमत्ता गमावून बसतात हे प्रमाण अतिशय नगण्य असते वसुली योग्य रीतीने होण्यासाठी स्वतंत्र असा वसुली विभाग होणे तर आवश्यक आहेच परंतु या विभागाने अतिशय कार्यक्षमता राबविणे आवश्यक आहे तसेच उपरोक्त सर्व कंपन्यांनी व ज्या व्यापाऱ्यांनी शासनाचा विक्रीकर बुडविला आहे किंवा देण्यास विलंब केला आहे. **अशी प्रकरणे विक्रीकर विभागातील ज्या बेजबाबदार अधिकाऱ्यांमुळे घडली आहे. अशा अधिकाऱ्यांची चौकशी करून चौकशी मध्ये दोषी आढळलेल्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

# गृह विभाग

## वाहनांची तपासणी करुन क्षमता प्रमाणपत्र देण्याबाबत

**२.१** भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २००४-२००५ या वर्षाचा महसुली जमा अहवालामधील परिच्छेद क्र. ३.२.१४ "वाहनांची तपासणी न करणे" या संदर्भात महालेखापरीक्षकांनी खालील अभिप्राय व्यक्त केले.

मोटार वाहन अधिनियमाच्या तरतुदींनुसार आणि त्याअन्वये केलेल्या नियमांनुसार क्षमता प्रमाणपत्र जवळ असल्याखेरीज कोणत्याही वाहनाची वैध रितीने नोंदणी झाली नाही असे समजले जात नाही. नव्याने नोंदणी करण्यात आलेल्या वाहनाच्या बाबतीत या अधिनियमाखाली देण्यात आलेले क्षमता प्रमाणपत्र दोन वर्षासाठी विधीग्राह्य असते आणि त्यानंतर प्रत्येक वर्षी वाहनाच्या प्रवर्गाला लागू असलेले विहीत शुल्क प्रदान करुन त्याचे नुतनीकरण करणे आवश्यक आहे. प्रत्येक महिन्यात तपासणी करावयाच्या वाहनांची संख्या काढण्यात यावी आणि वाहने प्रत्यक्ष सादर करण्यासंबंधात सूचनापत्र पाठविण्यात यावीत अशी विभागाची सूचना आहे.

२५ कार्यालयांनी उपलब्ध केलेल्या माहितीनुसार, परिशिष्ट 'चार' मध्ये दाखविल्याप्रमाणे सन १९९९-२००० ते २००३-२००४ या वर्षांत जेवढया वाहनांची तपासणी करणे आवश्यक होते, त्यापेक्षा प्रत्यक्ष तपासणी करण्यात आलेल्या वाहनांची संख्या खूपच कमी होती. हे निदर्शनास आणून दिल्यानंतर, विभागाने असे नमूद केले की, मोटारवाहने एकतर दुरुस्तीला दिली होती किंवा त्यांच्या कराची थकबाकी होती किंवा त्यांची राज्याच्या बाहेर विक्री करण्यात आली होती किंवा ती वापरात नव्हती. त्यामुळे क्षमता प्रमाणपत्राचे नूतनीकरण करण्यासाठी मोटार वाहने हजर न केल्याने त्यांची तपासणी करता आली नाही. तथापि विभागाकडे दिलेल्या कारणांच्या पुष्ट्यर्थ कोणतेही अभिलेखे नव्हते.

विभागाचे उत्तर समर्थनीय नाही कारण वाहनांची तपासणी न केल्याबाबतची माहिती विभागानेच सादर केली होती आणि दुरुस्तीसाठी असलेल्या किंवा वापरात नसलेल्या किंवा स्थलांतरीत झालेल्या वाहनांची संख्या त्यांच्याकडे उपलब्ध नव्हती. ह्या मुलभूत माहितीच्या अभावी विभागाने मोटार वाहनांच्या तपासणीवर कसे नियंत्रण ठेवले होते, ते लेखापरीक्षण विभाग निश्चित करु शकले नाही.

तसेच, क्षमता प्रमाणपत्र मिळविणे ही वाहन मालकाची जबाबदारी असल्याचे विभागाचे मत होते. मोटार वाहन अधिनियमात क्षमता प्रमाणपत्राच्या नुतनीकरणासाठी नोटीसा पाठविण्याची तरतूद नाही. शासनाने महाराष्ट्र मोटार वाहन नियम, १९८९ मध्ये योग्य ती तरतूद करण्याचा विचार करावा.

२५ कार्यालयांतील मोटार वाहनांची तपासणी न केल्यामुळे वाहने फक्त विधीग्राह्य क्षमता प्रमाणपत्राशिवाय सार्वजनिक सुरक्षितता धोक्यात घालून धावत नव्हती तर दिनांक ३१ मार्च, २००१ पर्यंत प्रत्येक तपासणीसाठी किमान रु. ५० आणि त्यानंतर रु. २०० दराने तपासणी शुल्काच्या रु. १६.६५ कोटी एवढ्या रकमेची वसुली झाली नाही.

लेखापरीक्षण पुनर्विलोकन समितीच्या बैठकीतील चर्चेत शासनाने क्षमता प्रमाणपत्राच्या नुतनीकरणासाठी नोंदणीकृत मालकांना वाहने हजर करण्यासाठी सूचनापत्र पाठविण्याची तरतूद अधिनियमात / नियमात अंतर्भूत करण्याचे मान्य केले.

**ज्ञापन :**

**२.२** उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात परिवहन विभागाने पुरविलेल्या लेखी स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये असे नमूद करण्यात आले आहे की, परिवहन आयुक्त कार्यालयाकडून पत्र क्र. एमव्हीटी ५४९१/डी ॥ ए/एफ सीईआरटी/५८ ए/नं. १६६१२, दि. १/१२/९९ अन्वये सर्व अधिनस्थ कार्यालयांना क्षमता प्रमाणपत्र देण्यापूर्वी वाहनांची क्षमता संपूर्ण तपासून वाहनापासून धोका निर्माण होणार नाही याची विशेष काळजी घेण्याबद्दल सांगण्यात आले आहे. तसेच पत्र क्र.एमव्हीएन-५४/०२/टीसी/डी॥ए/एफसी/ नं.१५९५, दि.३०/१/२००३ अन्वये ज्या व्यक्तींना क्षमता प्रमाणपत्र निर्गमीत केले आहे, अशा व्यक्तींचे अभिलेख ठेवण्याबाबत सूचित केलेले आहे. त्याच बरोबर सर्व नोंदणी अधिकाऱ्यांना क्षमता प्रमाणपत्राची वैधता तपासण्याबाबत सूचित करण्यात आले आहे.

## साक्ष :

**२.३** उपरोक्त परिच्छेदासंदर्भात समितीने दिनांक ४ जानेवारी, २०११ रोजी परिवहन विभागाच्या सचिवांची व अन्य विभागीय प्रतिनिधींची साक्ष घेतली. त्यावेळी अधिक माहिती जाणून घेण्याच्या दृष्टीने समितीने अशी विचारणा केली की, वाहनांची नोंदणी केल्यानंतर त्या वाहनांची तपासणी केली जाते काय? तसेच परिवहन विभागाच्या संबंधित यंत्रणेकडून वाहनांची तपासणी करण्यात येते काय ? ज्या गाड्या खराब स्थितीत असूनही रस्त्यावर धावत आहेत, त्यांची माहिती समितीला देण्यात यावी.

**२.४** याबाबत महालेखाकारांनी यासंदर्भात असे सांगितले की, प्रत्येक वाहन चांगल्या स्थितीत असल्याचे योग्यता प्रमाणपत्र असल्याशिवाय ते अधिकृत नोंदणी झाल्याचे समजण्यात येत नाही.

वाहनाला वाहतुकीसाठी देण्यात येणारा योग्यतेचा दाखला हा दोन वर्षासाठी वैध असतो. विभागाच्या लेखापरीक्षणाच्या वेळी असे निदर्शनास आले की, वाहनांच्या प्रत्यक्ष तपासणींची संख्या ही तपासणी करणे आवश्यक असलेल्या संख्येपेक्षा खूपच कमी आहे. योग्यतेच्या दाखल्याशिवाय रस्त्यावर वाहन चालविणे हे सार्वजनिक सुरक्षिततेच्या दृष्टीने योग्य नसुन ते धोक्याचे आहे असे साक्षीचेवेळी सचिवांच्या निदर्शनास आणून दिले असता विभागीय सचिवांनी असा खुलासा केला की, सन २००४-२००५ मध्ये महसूली जमा अहवालामध्ये महालेखापालांनी असे म्हटलेले आहे की, खाजगी वाहनांची दुरुस्तीची जबाबदारी ही वाहन मालकाची असून ती त्याच्या आर्थिक परिस्थितीमुळे पार पाडली जात नाही. शासकीय व सार्वजनिक वाहनांची नियमित तपासणी प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालयाच्या यंत्रणेमार्फत केली जाते. वाहनांची तपासणी करुन त्याचे योग्यता प्रमाणपत्र खाजगी वाहन मालकांनी घेणे आवश्यक आहे. ही जबाबदारी त्यांच्याकडून नियमितपणे पार पाडली जात नाही. परिवहन विभागाकडून दिले जाणारे प्रमाणपत्र हे क्षमता प्रमाणपत्र नसून योग्यता प्रमाणपत्र आहे. योग्यता प्रमाणपत्रासाठी वाहने हजर न केल्याबाबत विभागाने दिलेले स्पष्टीकरण महालेखापालांनी स्वीकृत केले नाही. सदर प्रमाणपत्र मिळविणे ही जरी वाहन मालकाची जबाबदारी असली तरी योग्यता प्रमाणपत्र नुतनीकरणासाठी वाहन मालकांना नोटीसा देऊन बोलावून घेण्याची महाराष्ट्र मोटार वाहन नियम, १९८९ मध्ये तरतूद नसल्याने योग्य तरतूद करण्याचा विचार करावा असेही महालेखापालांनी सुचविले आहे.

**२.५** लेखापरीक्षण पुनर्विलोकन समितीच्या बैठकीतील चर्चेत महालेखापालांनी सुचविल्याप्रमाणे योग्यता प्रमाणपत्र नुतनीकरणासाठी नोंदणीकृत मालकांना वाहने हजर करण्यासाठी सूचना पत्र पाठविण्याची तरतूद अधिनियमात अंतर्भूत करण्याचे त्यावेळी शासनातर्फे मान्य करण्यात आले आहे. यामध्ये मुळ मुद्दा असा आहे की, जेवढी परिवहन वाहने आहेत त्या सर्वांची योग्यता प्रमाणपत्रे दिली जात नाहीत. त्यामुळे महसुलात घट होते आणि योग्यता प्रमाणपत्र नसलेली वाहने रस्त्यावर धावल्यामुळे सार्वजनिक सुरक्षितता धोक्यात येते.

**२.६** दिनांक १.४.२००९ रोजी राज्यातील नोंदणीकृत परिवहन वाहनांची संख्या १६,८०,६१९ इतकी आहे. उक्त १६,८०,६१९ वाहनांपैकी मागिल वर्षी नवीन नोंदणी झालेली १,००,०५० वाहने वजा जाता उर्वरित १५,८०,४६९ वाहनांपैकी ५,२२,२३० इतकी वाहने योग्यता प्रमाणपत्राच्या नुतनीकरणासाठी सादर करण्यात आली. तपासणी केलेली वाहने सुमारे ३३ टक्के इतकी आहेत. ही आकडेवारी खुपच कमी आहे, हे विभागास मान्य आहे, परंतु याची प्रमुख कारणे अशी आहेत की, अ) वाहन यांत्रिक सुस्थितीत नसणे, ब) वाहन दुरुस्त करण्याची वाहन मालकाची आर्थिक स्थिती नसणे, क) वाहन ना

वापरात असणे ड) योग्यता प्रमाणपत्र नुतनीकरणाच्या कालावधीत वाहन व्यवसायनिमित्त इतरत्र असणे, इ) परवाना विधीग्राहय नसणे. यावर समितीने अशी विचारणा केली की, वाहतुकीसाठी योग्य नसलेली वाहने आजही रस्त्यावरुन धावत आहेत. त्यामुळे वाहतुकीला व जिवीताला धोका निर्माण होण्याची शक्यता आहे. यास विभागीय प्रतिनिधींनी सहमती दर्शविली व मुंबई (पूर्व) येथील नोंदणी झालेली वाहने विचारात घेतली असता ६१,८३९ वाहनांपैकी ३५,०५३ इतकी वाहने योग्यता प्रमाणपत्रासाठी सादर करण्यात आली. या कार्यालयामध्ये नोंदणी झालेल्या वाहनांमध्ये ऑटोरिक्षांचे प्रमाण सुमारे ५८ टक्के आहे व हाच कल इतर कार्यालयांमध्येही दिसून येतो **असे समितीला सांगण्यात आले. याकरिता पुढीलप्रमाणे उपाययोजना केली असल्याचे विभागाने नमूद केले आहे :**

१) वाहन मालकांकडून वाहनाच्या योग्यता प्रमाणपत्र नुतनीकरणाकरिता त्यांची वाहने विहीत कालावधीत तपासणीसाठी आणली जात नाहीत, ही वस्तुस्थिती आहे याबाबत नियमामध्ये देखील तशी तरतूद नाही. या कारणास्तव महाराष्ट्र मोटार वाहन नियम, १९८९ मधील कलम ४५ (५) मध्ये तरतूद विहीत करण्याच्या अनुषंगाने विधी व न्याय विभागाच्या तपासणीसाठी प्रारुप नियम सादर करण्यात आलेले आहेत. तपासणीअंती शासन मान्यतेने जनतेच्या हरकती व सूचनांकरिता प्रारुप नियम अधिसूचीत करण्यात येईल व त्यानंतर शासन मान्यतेने अंतिम प्रारुप निर्गमित करण्याबाबतची कार्यवाही करण्यात येईल. यामुळे विहीत कालावधीमध्ये योग्यता प्रमाणपत्र नुतनीकरणास्तव वाहन मालकांनी यायला टाळाटाळ केल्यास त्यांना नोटीशी पाठवून बोलावण्याची तरतूद असून, त्यानंतरही वाहन मालकाने तसे न केल्यास किमान रु.१०० /- दरमहा व जास्तीत जास्त रु.२००० पर्यंत दंड आकारण्याची तरतूद देखील सदर नियमात केली आहे.

२) केंद्रशासनाच्या दिनांक ३.१२.२०१० रोजीच्या परिपत्रकान्वये क्षमता प्रमाणपत्राच्या संदर्भात ठोस आवश्यक ती कार्यवाही करण्याबाबत सूचना प्राप्त झालेल्या आहेत. त्यानुसार कार्यवाही करण्यासाठी शासनाने परिवहन आयुक्त यांना दिनांक ३१.१२.२०१० चे परिपत्रकान्वये कळविण्यात आले आहे.

३) या शिवाय राज्यातील वाहनांची संख्या लक्षात घेता त्यांना वेळेवर योग्यता प्रमाणपत्र घेणे आवश्यक आहे, म्हणून संगणकावर वाहतूक करणाऱ्या वाहनांची नोंदणी करण्याची कार्यवाही काही कार्यालयात सुरु करण्यासाठी एन.आय.सी.कडे पाठपुरावा करण्यात येत आहे.

४) त्याच प्रमाणे वाहन विभागातर्फे योग्यता प्रमाणपत्रासाठी वाहने सादर करण्यात आली आहेत अथवा नाहीत, याबाबतचा आढावा दर ३ महिन्यांनी राज्य स्तरावर परिवहन आयुक्त घेतील व दर महिन्याला जिल्हा स्तरावर आढावा क्षेत्रीय अधिकारी घेतील.

ज्या वाहनांची तपासणी झालेली नाही, ती वाहने देखील मोठया प्रमाणात रस्त्यांवरुन धावत आहेत. यामुळे लोकांच्या जिवीताला व सार्वजनिक सुरक्षेला धोका पोहोचू शकतो असे समितीने मत व्यक्त केले असता, त्याबाबत विभागीय प्रतिनिधींनी असा खुलासा केला की, २१,००० वाहनांचे मालक तपासणीअंतर्गत गुन्हेगार आढळून आलेले आहेत. अशा प्रकारे गुन्हेगार वाहनचालक व अकार्यक्षम असलेली वाहने यांचेसंबंधात दरमहा रुपये २००० दंड वसुलीची कारवाई करण्यात येणार आहे.

**२.७** समितीने पुढे असे विचार मांडले की, गुन्हेगार वाहन चालक व वाहन मालक हे २००० रुपये दंड भरुन आपली सुटका करुन घेतील. वाहनांना योग्यता प्रमाणपत्र देण्याकरिता प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालयांची यंत्रणा कमी पडते. याकरिता शासनाने विभागीय पातळीवर पदे वाढविण्याकरिता काहीतरी ठोस उपाययोजना करणे अत्यंत आवश्यक आहे. याकरिता सामान्य जनतेला आता पयार्वरण कर नावाचा नवीन कर भरावा लागणार आहे.

**२.८** या पर्यावरण कराच्या माध्यमातून इन्स्पेक्शनल मेंटेंनन्स ट्रॅक तयार करण्यात येऊन या ट्रॅक वर प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालयाच्या कर्मचाऱ्यांशिवाय वाहनांची तपासणी होऊन यंत्राच्या सहाय्याने योग्यता प्रमाणपत्र मिळण्याकरिता एक सक्षम विद्युत यंत्रणा बनविण्याचे काम चालू आहे. ही यंत्रणा कार्यरत झाल्यानंतर प्रत्येक वाहनांची नियमीतपणे तपासणी केली जाऊन योग्यता प्रमाणपत्र दिले जाईल. वाहनांची तपासणी या ऑटोमॅटिक इन्स्पेक्शनल एक्जामिनेशन मेंटेंनन्स ट्रॅकवर होणे अत्यंत सोपे होईल, मुलारी येथे अशा प्रकारच्या यंत्रणेकरिता एकूण ७ कोटी रुपये खर्च केले गेलेले आहेत. या विद्युत यंत्रणेमार्फत टायर, ब्रेक्स, व्हील अरेंजमेंट, टायरोडीन, स्टेअरिंग अरेंजमेंट यांची अचूक तपासणी ऑटोमॅटिकली कार्यक्रम करुन केली जाईल. व यंत्राद्वारे अहवालाची प्रत येईल. वाहनांची पूर्ण तपासणी ही मशीनद्वारे होणार आहे. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, काही कंपन्या अशाप्रकारच्या सेवा उपलब्ध करुन देतात, त्यांच्याकडे अत्याधुनिक यंत्रणा असते. तेव्हा अशा कंपन्यांकडे काम का सोपविण्यात येत नाही ? त्यावर विभागाने असा खुलासा केला की, विभागाकडे अशाप्रकारचे प्रस्ताव आलेले आहेत. परंतु कंपन्यांकडून वेगवेगळ्या वाहनांसाठी वेगवेगळी फी आकारण्यात येते. टॅक्सी, ऑटोरिक्षा व इतर वाहनांसाठी किती फी आकारली जाईल याबाबत एक ठराविक फी निश्चित केली पाहिजे. त्यासाठी आपणास नियमात काही बदल करावयाचे असल्यास ते करु शकता असे समितीने मत व्यक्त केले असता, त्यावर विभागाने अशी माहिती दिली की, मागील एक-दोन वर्षापासून

अशाप्रकारची पध्दती सुरु करण्याबाबतचा प्रस्ताव विभागाच्या विचाराधीन आहे. मग त्यावर विभाग निर्णय का घेत नाही ? प्रस्ताव विचाराधीन आहे असे म्हणणे योग्य नाही असे समितीने विचार मांडले असता, त्याबाबत विभागीय सचिवांनी असे सांगितले की, अशा प्रकारची पध्दत सुरु करण्याबाबत विभागाची सकारात्मक भुमिका आहे. आता त्यादृष्टीने ई-पेमेंट पध्दत सुरु केलेली आहे व त्याचा फायदा लोकांना होत आहे.

**२.९** परिवहन विभागामध्ये दलालांचा सुळसुळाट झालेला असून हे दलालच परिवहन विभाग चालवित आहेत असे म्हटले तर वावगे होणार नाही. अधिकारी फक्त सह्या करण्याचे काम करीत आहेत. आपल्याला दलालांचे राज्य संपवावयाचे असेल तर आपणास नवीन पध्दतीचा अवलंब करावा लागणार आहे. त्यासाठी इन्स्पेक्शनल एक्झामिनेशन मेटेनन्स ट्रॅक उभे केले पाहिजे असे समितीने स्पष्ट मत व्यक्त केले.

**२.१०** याबाबत विभागीय सचिवांनी माहिती दिली की, प्रत्येक परिवहन कार्यालयात दलालांमार्फत काम करुन घेऊ नये असे नमूद केलेले फलक लावण्यात आलेले आहेत. परिवहन विभागाचे अधिकारी गाड्यांची तपासणी करतात. अधिकाऱ्यांनी २० टक्के वाहनांची फेरतपासणी केली पाहिजे असा नियम आहे. इन्स्पेक्शनल एक्झामिनेशन मेटेनन्स ट्रॅक उभारण्याबाबतचा प्रस्ताव एक महिन्यात शासनाला सादर करण्यात येईल.

**२.११** यावर समितीने वाहनांच्या तपासणी संदर्भात ज्या सूचना केल्या त्याची विभागाने नोंद घ्यावी. विभागाकडे अधिकारी-कर्मचारी वर्ग कमी आहे. त्याचप्रमाणे जागेचा देखील प्रश्न आहे. कारण एकाच दिवशी तपासणीसाठी जास्त वाहने आल्यास त्यासाठी जागा कशी उपलब्ध करुन द्यायची हा देखील एक गंभीर प्रश्न आहे. सर्व वाहनांची तपासणी झाली पाहिजे. अनेकदा असे आढळून येते की, एखादा अपघात झाल्यानंतर त्या अपघातग्रस्त वाहनाची तपासणी झाली नसल्याचे आढळून येते. यासंबंधात विभागाने विधी व न्याय विभागाकडे प्रस्ताव पाठविलेला आहे. त्या संदर्भातील अहवाल आल्यानंतर समितीला टिप्पणी द्यावी. तसेच विभागामध्ये किती पदे रिक्त आहेत त्याची माहिती द्यावी. रिक्त पदे भरण्यामध्ये अनेक अडचणी आहेत जसे काही प्रकरणामध्ये कोर्ट कचेऱ्या सुरु आहेत, नामावलीप्रमाणे पदे भरणे इत्यादी अडथळ्यांमुळे ही रिक्त पदे लवकर भरली जातील असे वाटत नाही. आपणास गतीने काम करावयाचे असेल तर या कामासाठी सब-कॉन्ट्रॅक्ट किंवा आऊट सोर्सिंगद्वारे काम करुन घ्यावे लागेल. असे साक्षीचे वेळी समितीने विभागाच्या निदर्शनास आणून दिले. साक्षीच्या वेळी विभागीय प्रतिनिधी रिक्त पदांची माहिती देवू शकले नाहीत. परंतु ही माहिती विभागाकडून नंतर प्राप्त

झाली असून परिवहन विभागातील पदांचा तपशिल पुढील प्रमाणे आहे. एकूण मंजूर पदे - ३५८०, एकूण भरलेली पदे - २६२५, एकूण रिक्त पदे - ९५५ आहे.

**२.१२** शासन निर्णयाप्रमाणे दिनांक ५.६.२०१० पासून शासकीय कर्मचारी भरती बंद असून सदर बंदी शिथील करण्यात यावी. याबाबतचा प्रस्ताव शासनास पाठविण्यात आला आहे. प्रस्ताव मंजूर झाल्यास तातडीने विहीत पध्दतीनुसार भरती प्रक्रिया राबवून रिक्त पदे भरण्यात येतील असे समितीला सांगण्यात आले.

**२.१३** महिलांना टॅक्सी परवाने देण्याबाबतची स्थिती विशद करताना विभागीय प्रतिनिधींनी समितीला अशी माहिती दिली की, सन १९९७ पासून मूळ परवाने देण्याचे बंद केलेले आहे. त्याचप्रमाणे अनेक परवान्यांची मुदत संपलेली आहे. तसेच काही लोकांनी व्यवसाय बंद केलेले आहेत. तेव्हा नवीन परवाने देण्यासंदर्भात मागणी आलेली आहे, त्याप्रमाणे प्रस्ताव तयार करुन तो शासनाकडे पाठविला आहे. सदरहू प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन असून एकूण १ लाख १० हजार टॅक्सी परवाने आहेत व त्यापैकी जवळपास १६ हजार परवान्यांची मुदत संपलेली आहे. काहींनी परवान्यांचे नुतनीकरण केलेले नाही. नवीन परवाने देण्यासंदर्भातील प्रस्ताव शासनाकडे दिलेला आहे. या प्रस्तावामध्ये ३३ टक्के परवाने महिलांसाठी राखीव ठेवावेत असेही प्रस्तावित केलेले आहे. या संदर्भात शासन निर्णय घेईल. तसेच समितीला नंतर पाठविलेल्या रिक्षा परवान्यासंबंधातील महिला आरक्षणाबाबतच्या माहितीत असे नमूद करण्यात आले आहे की, परिवहन आयुक्त कार्यालयाच्या दिनांक १६.४.२००९ च्या पत्रान्वये टॅक्सी/रिक्षा परवाना धोरण/परवान्यांचे वाटपासंदर्भात शासनास सविस्तर प्रस्ताव सादर केलेला आहे. त्याप्रमाणे परवाने जारी करण्याचे धोरण मान्य झाल्यास परवान्यांचे वाटप करताना खालीलप्रमाणे आरक्षण ठेवण्याबाबत सदर प्रस्तावामध्ये नमूद करण्यात आले आहे :

१. शासकीय नोकरभरती प्रमाणे प्रवर्ग निहाय घटनाबध्द आरक्षण - ४९ टक्के.
२. राष्ट्रीय/राज्यस्तरीय खेळाडूंसाठी आरक्षण -५ टक्के.
३. भुकंपग्रस्त / प्रकल्पग्रस्तांसाठी आरक्षण - ५ टक्के.
४. अल्पसख्यांकांसाठी आरक्षण - ५ टक्के.
५. स्वातंत्र्यसैनिकांसाठी आरक्षण - ५ टक्के.
६. खुल्यासंवर्गासाठी आरक्षण - ३० टक्के.

**२.१४** महालेखाकार कार्यालयाकडून उपस्थित झालेल्या परिच्छेदा संदर्भातील पूर्तता वेळीच केली जाते काय, या समितीच्या प्रश्नावर माहिती देताना विभागीय प्रतिनिधींनी असे उत्तर दिले की, ते स्वत: महालेखापरीक्षकांकडे बैठकीसाठी गेले होते आणि परिच्छेदा संदर्भात चर्चा केलेली आहे.

**२.१५** मोटार वाहनांची तपासणी न केल्यामुळे विधी ग्राह्य क्षमता प्रमाणपत्राशिवाय धावत असलेल्या वाहनांच्या तपासणी शुल्काच्या रुपये १६.६५ कोटी एवढ्या रकमेच्या वसुलीबाबत काय कारवाई करण्यात आली ? या प्रश्नाबाबत विभागीय प्रतिनिधींनी असा खुलासा केला की, सन १९९९ ते २००४ अशा पाच वर्षांच्या कालावधीमध्ये प्रायोगिक तत्वावर २५ कार्यालये घेण्यात आली होती. त्याठिकाणी जेवढ्या वाहनांची गणना केली, त्याला गुणिले फी असे करुन ती रक्कम काढलेली आहे. ही संख्या चुकीची आहे असे विभागाचे म्हणणे नाही. परंतु विभाग महसुली जमा म्हणून फी आकारीत नाही तर ती सेवा शुल्क म्हणून घेते. याठिकाणी उपस्थित झालेल्या मुद्यांबाबत आम्ही काय कारवाई केली त्याची याठिकाणी चर्चा केलेली आहे.

**२.१६** परिवहन विभागाच्या काही कार्यालयांवर लाचलुचपत प्रतिबंधक खात्याच्या अधिकाऱ्यांनी धाडी टाकल्या होत्या, याबाबत खुलासा करताना समितीला असे सांगण्यात आले की, लाचलुचपत प्रतिबंधक खात्याच्या अधिकाऱ्यांनी परिवहन विभागाच्या कार्यालयावर धाडी टाकल्या, त्या संदर्भातील बातमी वर्तमानपत्रात आली होती. परिवहन विभागाकडे व्यवसाय कर वसुलीचे काम सोपविण्यात आले होते. २४ व्यवसायांवर व्यवसाय कर आकारण्यात येतो. त्यातील १३ क्रमांकावर परिवहन विभाग आहे. जे व्यापारी परवाना धारक असतील त्यांना हा कर भरावा लागतो. फक्त ६५ वर्षावरील व्यक्तींना यातून सूट दिलेली आहे. एका वाहनासाठी व्यवसाय करापोटी १५०० रुपये भरावे लागतात. तर एकापेक्षा जास्त वाहने असतील तर त्यांना २५०० रुपये एवढा व्यवसाय कर भरावा लागतो याबाबतीत असे तीन-चार प्रकारचे नियम आहेत. परिवहन विभाग वाहनांच्या नंबर प्लेटप्रमाणे नोंदणी करते तर महालेखाकारांकडून नावाप्रमाणे नोंदणी होते. सन २००७ मध्ये थकबाकीदारांची यादी नावानिशी पाठविण्यात आली होती. त्याप्रमाणे साधारणतः १०५ कोटी रुपये थकबाकी दाखविली होती. त्यापैकी ८५ कोटी वसूल करण्यात आले आहे. विभागाने तीन वर्षात १०५ कोटी पैकी ८५ कोटी वसुल केलेले आहेत, त्याशिवाय जी वाहने तपासणीसाठी येत होती, त्यांना मागील चलन दाखविण्याबाबत सांगण्यात येत होते. त्यावेळी ठाणे येथे काही चलन बोगस असल्याचे आढळून आले. तेव्हा लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने १२ कार्यालयांतील कागदपत्रे तपासणीसाठी जप्त केली. यामध्ये विक्रीकर विभागाची मदत घेण्यात येत आहे. दोन कर घेण्यापेक्षा ते एकत्रित करुन एकच कर घ्यावा अशा प्रकारचा प्रस्ताव विभागाने शासनाला दिलेला आहे.

**२.१७** परिवहन विभागाने व्यवसाय कर गोळा केल्यास तो विक्रीकर विभागाकडे द्यावा लागेल. परिवहन विभागामध्ये मनुष्यबळ कमी आहे असे सचिवांनी साक्षीचे वेळी सांगितले. तेव्हा विभागाच्या कार्यपद्धतीमध्ये सुधारणा व्हावयास पाहिजे असे समितीने विचार व्यक्त केले. व समितीने अशी विचारणा

केली की, बोगस पावत्या मिळाल्या, असे जे सांगितले गेले, त्या नेमक्या कोणाकडून मिळाल्या, तसेच ठाणे येथील प्रकरणाबाबतची नेमकी काय परिस्थिती होती, चौकशी अंतर्गत काय सापडले ? याची माहिती समितीला देण्यात यावी. यावर विभागाने अशी माहिती दिली की, सहाय्यक पोलीस आयुक्त तसेच, प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे यांच्याकडून मिळालेल्या माहितीनुसार त्या ठिकाणी ९ लाख १६ हजार इतकी रोख रक्कम मिळाली. बस ऑपरेटरने या रकमेसाठी दावा केला आहे. त्याच्या म्हणण्याप्रमाणे अचानकपणे हे घडल्याने घाबरून जाऊन तो ती रक्कम तेथेच सोडून गेला. त्याचा दावा तपासणीच्या अधीन आहे. आमच्या कार्यालयामध्ये १६ अधिकाऱ्यांचे ४ तपासणी समुह असून त्यांच्याकडून याबाबतची तपासणी सुरू आहे. परिवहन विभागाच्या एकूण १३ कार्यालयात लाचलूचपत प्रतिबंधक कार्यालयाने व्यवसाय करासंबंधी धाडी टाकल्या हे खरे असून त्यासंबंधी विक्रीकर विभाग व परिवहन विभाग यांची मदत घेऊन व्यवसाय करासंबंधात असलेल्या खोटया चलनाच्या संदर्भात तपास चालू आहे. तसेच प्रादेशिक परिवहन कार्यालय, ठाणे येथे लागलेली आग ही शॉर्टसर्कीटमुळे लागली असल्याचे अग्निशामक विभागाने प्रमाणित केले आहे. धाडी दरम्यान सापडलेले रुपये ९,१३,३०५/- हे एका बस ऑपरेटरने कर भरण्यासाठी आणलेली रक्कम असल्याचे व ती कपाटात ठेवल्याचे आढळून आल्याचे प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे यांनी कळविले आहे. याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक खाते अधिक चौकशी करीत असून त्यांचे मार्फत पुढील कार्यवाही अपेक्षित आहे.

**२.१८** वाहन परीक्षणाबाबत जो सर्वंकष प्रस्ताव शासनाकडे पाठविलेला आहे, त्यावर निर्णय कधी पर्यंत होईल, याबाबत विभागाने असा खुलासा केला की, ज्या ठिकाणी आमच्या जागा आहेत, त्या ठिकाणांच्या वाहन परीक्षण केंद्राबाबतचा प्रस्ताव एका महिन्याच्या आत शासनाला सादर करू. तसेच ज्या ठिकाणी जागा नाहीत, त्या ठिकाणी एखाद्या एजन्सीच्या माध्यमातून ते काम करण्याचा प्रयत्न केला जाईल. तसेच अधिक माहिती विभागाने दिली की, सद्यः स्थितीत परिवहन विभागाकडे वाहन योग्यता प्रमाणपत्र तपासणीकरिता लागणारी यंत्रसामुग्री उपलब्ध नसल्यामुळे परिवहन कार्यालयात योग्यता प्रमाणपत्र नुतनीकरणाकरिता येणाऱ्या वाहनांची यंत्रिक तपासणी १०० टक्के करता येत नाही. याबाबत हेडलाईट अलायनर, ब्रेक टेस्टिंग मशीन, स्टेरिंग चेकींग मशीन, व्हील अलायनमेंट मशिन प्रदूषण तपासणी मशीन इ. उपकरणे टेस्टिंग ट्रॅकवर सुविधा उपलब्ध होण्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला असून त्याविषयी पुढील कार्यवाही चालू असून सदर प्रस्ताव मंजूर झाल्यास प्रत्येक वाहनाची १०० टक्के यांत्रिक तपासणी करता येईल.

**२.१९** राज्यातील वाहनांच्या वाढत्या संख्येचा विचार करून भविष्यकाळात परिवहन विभागाने नगर रचना विभागाला विकास आराखड्यामध्ये परिवहन विभागाकरिता राखीव जागा शासनामार्फत

ठेवण्याबाबत कळविले आहे का, भविष्यकाळाचा विचार करून परिवहन विभागाने याबाबतीत काही योजना आखलेली आहे काय, पुढच्या ५० वर्षांचा विचार करता वाहनांसाठी जागा राखून ठेवली जाणे आवश्यक आहे. स्थानिक स्वराज्य संस्था या मैदाने, दवाखाने यासाठीची जागा मागू शकतात. त्यामुळे वाहनांसाठी जागा आरक्षित ठेवण्याचे काम हे परिवहन विभागाचेच आहे ते काम महानगरपालिकेचे वा नगरपालिकेचे नाही असे मत समितीने व्यक्त केले. विभागाने याबाबतीत काय कारवाई केली अशी समितीने विचारणा केली असता, विभागाने खुलासा केला की, जागेची समस्या काही प्रमाणात कमी करण्यासंदर्भात सन २०२० पर्यंत कमीत कमी १०० कार्यालये स्थापन करण्याबाबतचा प्रस्ताव तयार करून सादर केलेला आहे. तसेच समितीने सांगितल्याप्रमाणे वाहन पार्किंगबाबत आगाऊ आरक्षण देण्याबाबत नगर रचना विभागाकडे स्वतंत्र प्रस्ताव तयार करून पाठविला जाईल.

**२.२०** आजमितीला राज्यभरात प्रादेशिक परिवहन अधिकारी यांची एकूण ४५ कार्यालये अस्तित्वात आहेत. त्यामध्ये १४ प्रादेशिक कार्यालयांचा समावेश आहे. एका विभागीय कार्यालयाच्या अखत्यारीत २-३ जिल्हयांचे परिवहन व्यवस्थापन येते. या कार्यालयातील कर्मचाऱ्यांचा आढावा घेतल्यास ४५ उप प्रादेशिक परिवहन अधिकारी आहेत. प्रत्येक कार्यालयातील वाहतुक निरीक्षकाची संख्या ४ ते ६ इतकी आहे. तर एकूण सहाय्यक वाहतुक निरीक्षकांची संख्या ६५० इतकी आहे. उर्वरित कर्मचारीवर्गाची संख्या ३४२० आहे. त्यापैकी ८०० म्हणजे जवळपास एकूण संस्थेच्या १/३ पदे रिक्त आहेत. सहाय्यक निरीक्षकांच्या रिक्त असलेल्या २२० जागा भरण्यास शासनाची मान्यता मिळालेली आहे. सदरहू पदे भरतीबाबतचा प्रस्ताव महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगाकडे पाठविलेला आहे. लिपीकाची ४१० पदे रिक्त आहेत. मुंबईमध्ये महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगाकडूनच हे काम केले जाते. राज्याच्या अन्य भागामध्ये विभागाअंतर्गत हे पद भरतीचे काम करता येते. मध्यंतरी नॅशनल बँकिंग सर्व्हिस बोर्डाकडून परीक्षा घेऊन या पदांची भरती करण्याबाबत विचार करण्यात आला होता. परंतु शासनाच्या पद भरतीवरील बंदीच्या निर्णयामुळे ते होऊ शकले नाही. त्या बाबतीतील प्रस्ताव तयार आहे. त्यास शासनाची मान्यता मिळाल्यानंतर नॅशनल बँकिंग सर्व्हिस बोर्डाकडून परीक्षा घेऊन पद भरतीबाबतची कार्यवाही होऊ शकेल.

**२.२१** विभागाला हंगामी कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्याचे अधिकार आहेत काय, यावर असे सांगण्यात आले की, विभागाकडे नवीन गाड्या आहेत. परंतु, त्यासाठी वाहनचालकच नाहीत. त्यामुळे ही वाहनचालकांची पदे भरण्याबाबत विभागाने शासनाकडे विनंती केली होती. त्यापैकी सध्या तरी ८६ हंगामी पदे भरण्यास विभागाला मान्यता मिळाली आहे.

**२.२२** समितीने पुढे अशी विचारणा केली की, कार्यालयामध्ये पुरेसा कर्मचारीवर्ग नाही अशी परिस्थिती किती वर्षांपासूनची आहे व किती वर्षे कर्मचाऱ्यांची भरतीच झालेली नाही, याबाबत विभागीय प्रतिनिधींनी साक्षीचे वेळी असे सांगितले की, सन २००८ या वर्षाच्या शेवटी भरती केली गेली. त्यानंतर गेली ३ वर्षे कर्मचारीवर्गाची भरतीच झालेली नाही.

**२.२३** परिवहन आयुक्त कार्यालयाच्या अधिनस्त कार्यालयांबाबतची माहिती देताना विभागीय प्रतिनिधींनी असा खुलासा केला की, परिवहन आयुक्त कार्यालयाच्या अधिनस्त एकूण ४८ कार्यालये कार्यरत असून त्यांच्या वर्गवारी पुढीलप्रमाणे आहे.

राज्यात एकूण प्रादेशिक परिवहन कार्यालयांची संख्या १५, एकूण उप प्रादेशिक परिवहन कार्यालयांची संख्या ३३, त्याचबरोबर विभागाअंतर्गत राज्यात एकूण २२ सीमा तपासणी नाके कार्यरत आहेत. वैधरितीने नोंदणी करण्याकरिता क्षमता प्रमाणपत्रासाठी आणखी कोणत्या बाबींची पूर्तता करणे आवश्यक असते या समितीच्या मुद्यांच्या अनुषंगाने खुलासा करताना असे सांगण्यात आले की, मोटार वाहन अधिनियम, १९९८ मधील कलम ५६ अन्वये योग्यता प्रमाणपत्र वैध असल्याशिवाय परिवहन संवर्गातील वाहन हे कलम ३९ अन्वये विधीवत नोंदले असल्याचे मानता येत नाही. केंद्रीय मोटार वाहन नियम, १९८९ च्या नियम ६२ अन्वये नवीन परिवहन वाहनांच्या बाबतीत योग्यता प्रमाणपत्र हेच विधीग्राह्य असते. महाराष्ट्र मोटार वाहन नियम, १९८९ च्या नियम ४५ (४) अन्वये मोटार वाहन मालकास योग्यता प्रमाणपत्राच्या नुतनीकरणासाठी मुदतीत वाहन सादर करणे शक्य झाले नसल्यास, त्याने तपासणीची तारीख बदलून मिळण्यासाठी किमान १५ दिवस अगोदर सक्षम प्राधिकाऱ्याकडे अर्ज करणे आवश्यक आहे. तसेच महाराष्ट्र मोटार वाहन नियम १९८९ च्या नियम ४५ (५) अन्वये योग्यता प्रमाणपत्राच्या मागील बाजूस पुढच्या तपासणीची तारीख, वेळ व ठिकाण नमूद केलेले नसेल तर योग्यता प्रमाणपत्राच्या नुतनीकरणासाठी त्या प्रमाणपत्राची मुदत संपण्याच्या आत किमान एक महिना आधी विहीत केलेल्या नमुन्यात (सीएफआरए) सक्षम प्राधिकाऱ्याकडे अर्ज करणे आवश्यक आहे.

**वाहन योग्यता प्रमाणपत्र देण्यासाठी केंद्रीय मोटार वाहन नियम, १९८९ च्या नियम ६२ (१) (क) मध्ये नमूद केल्याप्रमाणे पुढील तांत्रिक बाबी विचारात येण्यात येतात :-**

१.स्पार्क प्लग/सप्रेसर कॅप/हाय देन्शन केबल, २.हेड लॅम्प बिम, ३.इतर लाईट, ४.रिफ्लेक्टर, ५.बल्ब, ६.मागचे दृश्य दर्शविणारा आरसा, ७. सुरक्षा काच, ८. हॉर्न, ९. सायलेन्सर, १०. डॅश बोर्ड उपकरण, ११.विडशिल्ड वायपर, १२.ब्रेकिंग यंत्रणा, १३.स्पीडो मीटर, १४.स्टिअररिंग गिअर

प्रमाणपत्राचे नूतनीकरण न केल्यामुळे शासनाचे किती आर्थिक नुकसान होते, याबाबतची माहिती देताना विभागीय प्रतिनिधींनी असा खुलासा केला की, योग्यता प्रमाणपत्र नुतनीकरणासाठीचे शुल्क हा महसूली उत्पन्नाचा भाग नाही. वाहन मालकाने आपले वाहन तपासणीसाठी आणले तरच योग्यता प्रमाणपत्र नुतनीकरणाचे शुल्क वसुल केले जाते. सदरचे शुल्क हे वाहनाची तपासणी करण्यासाठी जी

सेवा दिली जाते, त्या सेवेप्रित्यर्थ भरण्यात येणारे शुल्क आहे. **केंद्रीय मोटार वाहन नियम, १९८९ मधील नियम ८१ अन्वये योग्यता प्रमाणपत्र देणे वा त्याचे नुतनीकरण यासाठीचे शुल्क खालीलप्रमाणे आहे :-**

१. दोन/तीन चाकी वाहन - (शंभर रुपये) रु.१००/-
२. हलके मोटार वाहन - (दोनशे रुपये) रु.२००/-
३. मध्यम मोटार वाहन - (तीनशे रुपय) रु.३००/-
४. अवजड मोटार वाहन - (चारशे रुपये) रु.४००/-

**२.२४** योग्यता प्रमाणपत्राचे नियमितपणे नूतनीकरण न करणाऱ्या वाहनांच्या विरोधात रस्त्यावरील तपासणी गुन्हा नोंदविण्यात येऊन दंड वसुल केला जातो. मात्र नुतनीकरणाच्या तारखेस दरवर्षी वाहन सादर झाल्यास तेवढे शुल्क मिळू शकते. योग्यता प्रमाणपत्र नूतनीकरण करण्यासाठी विहीत कालावधीत वाहने हजर केली जात नाहीत यासाठी विहीत कालावधीत योग्यता प्रमाणपत्रासाठी वाहने हजर न करणाऱ्या वाहनधारकांकडून प्रति माह रु. १०० इतके दंडात्मक अतिरिक्त शुल्क वसुल केल्यास क्षमता प्रमाणपत्र नुतनीकरण न करण्याच्या प्रवृत्तीस आळा बसेल. यासाठी महाराष्ट्र मोटार वाहन नियम १९८९ मधील नियम ४५ (५) मध्ये खाली दर्शविल्याप्रमाणे सुधारणा प्रस्तावित केली आहे.

"Rule 45 (5), The following proviso shall be added namely,

Provided that the registering authority shall send a notice in **Form C.F.R.N.** to the owner to produce the vehicle for inspection to renew its certificate of fitness.

If the owner have to produce the vehicle for inspection on or before the date specified in the notice, he shall be liable to pay the amount of rupees One hundred per calender month or part thereof subject to the maximum amount of rupees Two thousand."

**२.२५** सन १९८९ च्या मोटार वाहन अधिनियमात/नियमात क्षमता प्रमाणपत्राच्या नुतनीकरणाबाबतची नोटीस पाठविण्याची तरतूद करण्यासाठी परिवहन आयुक्त कार्यालयाकडून शासनास प्रस्ताव सादर करण्यात आला आहे काय व शासनाने याबाबत काय कार्यवाही केली ? या समितीच्या प्रश्नावर विभागीय प्रतिनिधींनी असा खुलासा केला की, मोटार वाहन अधिनियमात क्षमता प्रमाणपत्राच्या नुतनीकरणासाठी नोटीसा पाठविण्याची तरतूद नाही. लेखा परिक्षण पुर्नविलोकन समितीच्या बैठकीत झालेल्या चर्चेत शासनाकडून क्षमता प्रमाणपत्राच्या नुतनीकरणासाठी नोंदणीकृत मालकांना वाहने हजर करण्यासाठी सूचनापत्र पाठविण्याची तरतूद अधिनियमात/नियमात अंतर्भूत करण्याचे मान्य करण्यात आलेले आहे. त्यानुसार महाराष्ट्र मोटार वाहन नियम १९८९ च्या नियम ४५ मध्ये वरील मुद्दा क्र. ४ मध्ये दर्शविल्याप्रमाणे सुधारणा करण्यासाठीचा प्रस्ताव दिनांक ४.११.२०१० रोजी शासनास सादर करण्यात आला आहे. त्या प्रस्तावान्वये वाहन मालकास नोटीस पाठविण्यात येणार असून त्यामध्ये क्षमता प्रमाणपत्राची मुदत संपण्याचा दिनांक नमूद करण्यात येईल

आणि त्या दिनांकापूर्वी वाहन हजर करण्यास्तव वाहन मालकास सूचित करण्यात येणार आहे. तसेच, विहीत मुदतीत वाहन तपासणीसाठी सादर न केल्यास अतिरिक्त शुल्क वसुल करण्याचीही तरतूद करण्यात आली आहे.

**२.२६** मोटार वाहनांची तपासणी न केल्यामुळे विधीग्राह्य क्षमता प्रमाणपत्राशिवाय धावत असलेल्या वाहनांच्या तपासणी शुल्काच्या रु. १६.६५ कोटी एवढ्या रकमेच्या वसुलीबाबत काय कार्यवाही करण्यात आली व त्यापैकी सन २०१० पर्यंत किती रक्कम वसुल होणे बाकी आहे, याबाबतची सद्य:स्थिती विशद करताना विभागीय प्रतिनिधींनी असे सांगितले की, मोटार वाहनांची तपासणी न केल्यामुळे विधीग्राह्य क्षमता प्रमाणपत्राशिवाय धावत असलेल्या वाहनांच्या संदर्भात राज्यातील एकूण २५ कार्यालयात रु.१६.६५ कोटी इतक्या रकमेची वसुली झालेली नव्हती, असा आक्षेप आहे. तथापि वाहन मालकाने आपले वाहन तपासणीसाठी आणले तरच योग्यता प्रमाणपत्र नुतनीकरणाची फी वसुल केली जाते. सदर फी ही वाहनाची तपासणी करण्याची जी सेवा मोटारवाहन विभागाकडून दिली जाते त्यासाठी आकारण्यात येणारे शुल्क आहे

**२.२७** वाहन मालकाने जर २ वर्ष वाहनाचे योग्यता प्रमाणपत्र मिळविण्यासाठी नुतनीकरणाकरिता वाहन आणले नाही तर २ वर्षाची योग्यता प्रमाणपत्राची फी वसुल करता येत नाही. सबब लेखा आक्षेपात नमूद केल्याप्रमाणे मोटार वाहनाची तपासणी न केल्यामुळे विधीग्राह्य व प्रमाणपत्राशिवाय धावत असलेल्या राज्यातील एकूण २५ कार्यालयात रु.१६.६५ कोटी इतक्या रकमेची वसुली झाली नव्हती असे म्हणणे संयुक्तिक होणार नाही. तथापि योग्यता प्रमाणपत्रासाठी वाहने नियमितपणे कार्यालयात येण्यासाठी महाराष्ट्र मोटार वाहन नियमात, योग्यता प्रमाणपत्राच्या नुतनीकरणासाठी नोंदणीकृत मालकांना परिवहन कार्यालयात वाहने हजर करण्यासाठी सूचना पत्र पाठविण्याची तरतूद विहीत करण्याबाबत विधी व न्याय विभागाच्या संमतीने प्रस्ताव तपासण्यात येत आहे.

## अभिप्राय व शिफारशी :

**२.२८** भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांनी नमूद केलेल्या महसूली जमा अहवालातील परिच्छेद क्र. ३.२.१४ - "वाहनांची तपासणी न करणे" या परिच्छेदाच्यासंदर्भात महालेखापालांनी दिलेले अभिप्राय व गृह (परिवहन) विभागाने दिलेली माहिती अशी आहे की, विभागाकडे दिलेल्या कारणांच्या पुष्ठयर्थ कोणतेही अभिलेखे उपलब्ध नव्हते. हे विभागाचे उत्तर समर्थनीय नाही; कारण वाहनांची तपासणी न केल्याबाबतची माहिती विभागानेच सादर केली होती आणि दुरुस्तीसाठी असलेल्या किंवा वापरात नसलेल्या किंवा स्थलांतरीत वाहनांची संख्या त्यांच्याकडे उपलब्ध नव्हती. ह्या मूलभूत माहितीच्या अभावी विभागाने मोटार वाहनांच्या तपासणीवर कसे नियंत्रण ठेवले होते, ते लेखापरीक्षण विभाग निश्चित करु शकले नाही. **क्षमता प्रमाणपत्र मिळविणे ही जरी वाहन मालकाची जबाबदारी असली तरी योग्यता प्रमाणपत्र नुतनीकरणासाठी वाहन मालकांना नोटीस देऊन बोलावून घेण्याची तरतूद**

**महाराष्ट्र मोटार वाहन नियम, १९८९ मध्ये नसल्याने योग्य तरतूद करण्याचा शासनाने विचार करावा. लेखा परीक्षण पुनर्विलोकन समितीच्या बैठकीत महालेखापालांनी सूचविल्याप्रमाणे योग्यता प्रमाणपत्र नुतनीकरणासाठी नोंदणीकृत मालकांना वाहने हजर करण्यासाठी सूचना पत्र (नोटीस) पाठविण्याबाबतची तरतूद नियमात अंतर्भूत करण्याचे त्यावेळी शासनातर्फे मान्य करण्यात आले आहे परंतू तरीही मोटार वाहन नियमात क्षमताप्रमाणपत्राच्या नूतनीकरणासाठी नोटीसा पाठविण्याची तरतूद नाही. अशी समितीला माहिती मिळाली. परंतू अशा प्रकारची तरतूद नियमात असणे आवश्यक आहे असे समितीला वाटते तरी त्यादृष्टीने शासनाने महाराष्ट्र मोटार वाहन नियम, १९८९ मध्ये योग्य ती तरतूद करण्याच्या दृष्टीने त्वरीत कार्यवाही करावी, अशी समितीची शिफारस आहे.**

**२.२९** जेवढी परिवहन वाहने आहेत, त्या सर्वांची योग्यता प्रमाणपत्रे दिली जात नाहीत. त्यामुळे महसुलात घट होते आणि योग्यता प्रमाणपत्र नसलेली वाहने रस्त्यावर धावल्यामुळे सार्वजनिक सुरक्षितता देखिल धोक्यात येते. तपासणी केलेली वाहने सुमारे ३३ टक्के इतकी आहेत व ही आकडेवारी खूपच कमी आहे आणि हे विभागालाही मान्य आहे. योग्यता नसलेली वाहने आजही रस्त्यावरून धावत आहे. त्यामुळे वाहतुकीला व नागरिकांच्या जिविताला धोका निर्माण होण्याची शक्यता आहे यास साक्षीचेवेळी विभागीय प्रतिनिधींनी देखील सहमती दर्शविली.

**२.३०** वाहन मालकाकडून वाहनाच्या योग्यता प्रमाणपत्र नुतनीकरणासाठी त्यांची वाहने विहित कालावधीत तपासणीसाठी आणली जात नाहीत ही वस्तुस्थिती आहे. याबाबत नियमातही तरतूद नाही. याकारणास्तव महाराष्ट्र मोटार वाहन नियम, १९८९ मधील ४५ (५) मध्ये तरतूद विहीत करण्याच्या अनुषंगाने विधी व न्याय विभागाच्या तपासणीसाठी प्रारुप नियम सादर करण्यात आलेले आहेत. यामुळे विहीत कालावधीमध्ये योग्यता प्रमाणपत्र नुतनीकरणासाठी वाहन मालकाने येण्यास टाळाटाळ केल्यास त्यांना नोटीस पाठवून बोलावण्याची नियमात तरतूद असून त्यानंतरही वाहन मालकाने तसे न केल्यास किमान रु.१०० /- दरमहा व जास्तीत जास्त रु.२००० पर्यंत दंड आकारण्याची तरतूद देखील सदर नियमात केली आहे. केंद्र शासनाच्या दिनांक ३.१२.२०१० रोजीच्या परिपत्रकान्वये क्षमता प्रमाणपत्राच्या संदर्भात परिवहन आयुक्त यांना ठोस आवश्यक ती कार्यवाही करण्याच्या सूचना प्राप्त झालेली आहे. त्यानुसार कार्यवाही करण्यासाठी शासनाने दिनांक ३१/१०/२०१० च्या परिपत्रकान्वये कळविण्यात आले आहे. **वाहतूक करणाऱ्या वाहनांची नोंदणी संगणकाद्वारे करण्याची कायर्वाही काही कायार्लयात सुरु करण्यासाठी एन.आय.सी.कडे पाठपुरावा करण्यात येत आहे असे समितीला सांगण्यात आले. त्या पाठपुराव्याबाबतची सद्य:स्थिती समितीला कळविण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**२.३१** २१,००० वाहनांचे मालक तपासणीअंतर्गत गुन्हेगार आढळून आलेले आहेत. तसेच या वाहनांची तपासणी झालेली नाही. ती वाहने देखील मोठया प्रमाणात रस्त्यांवरुन धावत आहेत. यामुळे लोकांच्या जिविताला व सार्वजनिक सुरक्षेला धोका पोहोचू शकतो. अशा प्रकारे **गुन्हेगार वाहनचालक व वाहतुकीस अयोग्य असलेली वाहने यांचे मालक यांच्याकडून दरमहा २००० रुपये दंड वसुलीची कारवाई करण्यात येणार आहे असे समितीला सांगण्यात आले. केवळ दंडाची कारवाई पुरेशी नसून यामध्ये शिक्षेची देखील तरतूद करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**२.३२** सामान्य जनतेला आता 'पर्यावरण कर' हा नवीन कर भरावा लागणार आहे. या पर्यावरण कराच्या माध्यमातून इन्स्पेक्शनल मेंटेनन्स ट्रॅक तयार करण्यात येऊन या ट्रॅकवर प्रादेशिक परिवहन अधिकाऱ्याशिवाय अधिकृत वाहनांची तपासणी होऊन मशिनच्या सहाय्याने योग्यता प्रमाणपत्र मिळण्याकरिता एक सक्षम विद्युत यंत्रणा बनविण्याचे काम चालू आहे. त्यामुळे वाहनांची तपासणी नियमितपणे केली जाणार आहे. वाहनाची पूर्ण तपासणी ही मशिनद्वारे होणार असल्यामुळे त्यामध्ये गतिमानता येणार आहे. अशाप्रकारची सेवा देणाऱ्या अनेक कंपन्या असून त्यांच्याकडे अत्याधुनिक यंत्रणा आहे. **परंतु या कंपन्यांकडून वेगवेगळया वाहनांसाठी वेगवेगळी फी आकारण्यात येते अशा प्रकारे फी आकारणे योग्य नसून खाजगी व सार्वजनिक तसेच टॅक्सी व ऑटो रिक्षा यासाठी फीचे दर निश्चित करण्यात यावेत तसेच शासनाच्या विचाराधीन असलेली ही पध्दती तातडीने सुरु करण्याच्या दृष्टीने पावले उचलावित अशी समिती शिफारस करीत असून याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यात पाठविण्यात यावी.**

**२.३३** परिवहन विभागाकडे व्यवसाय कर वसुलीचे काम सोपविण्यात आले होते. २४ व्यवसायांवर व्यवसाय कर आकारण्यात येतो. त्यातील १३ क्रमांकावर परिवहन विभाग आहे. जे व्यापारी परवाना धारक असतील त्यांना हा कर भरावा लागतो. फक्त ६५ वर्षावरील व्यक्तींना यातून सूट दिलेली आहे. एका वाहनासाठी १५०० रुपये भरावे लागतात. तर एकापेक्षा जास्त वाहने असतील त्यांना २५०० रुपये एवढा व्यवसाय कर भरावा लागतो. असे तीन-चार प्रकारचे नियम आहेत. विभाग वाहनांच्या नंबर प्लेटप्रमाणे नोंदणी करते तर महालेखाकारांकडून नावाप्रमाणे नोंदणी होते. सन २००७ मध्ये थकबाकीदारांची यादी नावानिशी पाठविण्यात आली होती. त्याप्रमाणे साधारणत: १०५ कोटी रुपये थकबाकी दाखविली होती. त्यापैकी ८५ कोटी वसुल केले आहे. विभागाने तीन वर्षात १०५ कोटी पैकी ८५ कोटी वसुल केलेले आहेत. त्याशिवाय जी वाहने तपासणीसाठी येत होती, त्यांना मागील चलन दाखविण्याबाबत सांगण्यात येत होते. त्यांच्याकडून जुने चलन दाखविण्यात येत होते. परंतु ठाणे येथे काही चलने बोगस असल्याचे आढळून आले. तेव्हा लाचलुचपत प्रतिबंधक खात्याने १२ कार्यालयांतील कागदपत्रे तपासणीसाठी जप्त केली. याबाबत सहाय्यक पोलिस आयुक्त तसेच प्रादेशिक परिवहन

अधिकारी, ठाणे यांच्याकडून मिळालेल्या माहितीनुसार त्या ठिकाणी ९ लाख १६ हजार इतकी रोख रक्कम मिळाली. बस ऑपरेटरने या रकमेसाठी दावा केला आहे. हा दावा तपासणीच्या अधीन असून परिवहन कार्यालयामधील १६ अधिकाऱ्यांचे ४ तपासणी समुह आहेत अशी माहिती समितीला देण्यात आली, **त्यांच्याकडून तपासणी सुरु असून अद्याप पर्यंत तपासणी का पूर्ण करण्यात आली नाही याची माहिती समितीला देण्यात यावी. विक्रीकर विभाग व परिवहन विभाग यांची मदत घेऊन व्यवसाय करासंबंधात असलेल्या खोट्या चलनाच्या संदर्भात सुरु असलेला तपास तसेच प्रादेशिक परिवहन कार्यालय ठाणे येथे लागलेली आग तसेच धाडी दरम्यान सापडलेले रु. ९,१३,३०५/- एवढा ऐवज, याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक खात्या मार्फत सुरु असलेली अधिक चौकशी तातडीने पूर्ण करण्यात यावी व यामध्ये दोषी आढळून आलेल्या व्यक्तिवर लवकरात लवकर योग्य ती कारवाई करुन केलेल्या कारवाईची सविस्तर माहिती समितीला तीन महिन्यात देण्यात यावी अशी समिती शिफारस करीत आहे.**

**२.३४** सद्यः स्थितीत परिवहन विभागाकडे वाहन योग्यता प्रमाणपत्र तपासणीकरीता लागणारी यंत्रसामुग्री उपलब्ध नसल्यामुळे परिवहन कार्यालयात योग्यता प्रमाणपत्र नुतनीकरणाकरिता येणाऱ्या वाहनांची यंत्रिक तपासणी १०० टक्के करता येत नाही. **या**बाबत हेडलाईट अलायनर, ब्रेक टेस्टिंग मशीन, स्टेरिंग चेकींग मशीन, व्हील अलायमेंट मशिन प्रदुषण तपासणी मशीन इ. उपकरणे टेस्टिंग ट्रॅकवर सुविधा उपलब्ध होण्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला असून त्याविषयी पुढील कार्यवाही चालू असून सदर प्रस्ताव मंजूर झाल्यास प्रत्येक वाहनाची १०० टक्के यांत्रिक तपासणी करता येईल. **यासंदर्भातील आवश्यक असणारी उपकरणे लवकरात लवकर प्राप्त होण्यासाठी शासनाकडे पाठपुरावा करावा तसेच याप्रकरणी निधीची आवश्यकता भासत असल्यास परिवहन विभागाने अंदाजपत्रकात तरतूद करुन घेण्याची कार्यवाही करावी अशी समिती शिफारस करीत आहे.**

**२.३५** राज्यातील वाहनांची वाढती संख्या, त्याचा विचार करून भविष्यकाळात विभागाने नगर रचना विभागाला विकास आराखड्यामध्ये प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालयाकरिता राखीव जागा शासनामार्फत ठेवण्यात याव्यात. **स्थानिक स्वराज्य संस्था या खेळाची मैदाने, दवाखाने इत्यादीसाठी जागा राखून ठेवतात, त्याच धर्तीवर परिवहन विभागाने देखील पार्किंगसाठी आगाऊ आरक्षण ठेवण्याबाबत नगररचना विभागाकडे प्रस्ताव पाठवून पाठपुरावा करावा तसेच तशा प्रकारची नियमात सुधारणा करण्याच्या दृष्टीने योग्य ती कार्यवाही करण्यात यावी अशी समितीची ठोस शिफारस आहे.**

**२.३६** आजमितीला राज्यभरामध्ये प्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांची एकूण ४५ कार्यालये अस्तित्वात आहेत. त्यामध्ये १४ प्रादेशिक कार्यालयांचा समावेश आहे. एका विभागीय कार्यालयाच्या अखत्यारीत २-३ जिल्हयांचे परिवहन व्यवस्थापन येते. या कार्यालयातील कर्मचाऱ्यांचा आढावा घेतल्यास ४५ उपप्रादेशिक परिवहन अधिकारी आहेत. प्रति कार्यालयातील वाहतूक निरीक्षकांची संख्या ४ ते ६ इतकी आहे. तर एकूण सहाय्यक वाहतुक निरीक्षकांची संख्या ६५० इतकी आहे. उर्वरित कर्मचारीवर्गाची संख्या ३४२० आहे. त्यापैकी ८०० म्हणजे जवळपास १/३ पदे रिक्त आहेत. **राज्यातील प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालयातील विविध संवर्गातील अनुक्रमे एकूण ४५ व ८०० पदे रिक्त**

**असल्यामुळे वाहनांच्या सार्वजनिक सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे तसेच वाहनांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक असलेल्या विविध योजना राबविण्यास प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालयास अपयश येत असल्याचे समितीच्या निदर्शनास आले आहे. पदे रिक्त असल्यामुळे शासनाचा महसूलही मोठ्या प्रमाणात बुडत आहे. त्यामुळे प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालयातील रिक्त पदे तातडीने भरण्यात यावीत अशी समितीची शिफारस आहे.**

# महसूल व वन (महसूल)

## शासनाच्या पूर्व परवानगी शिवाय हस्तांतरण व वापरात बदल केल्याबाबत :

**३.१** भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २००४-२००५ या वर्षाच्या महसुली जमा अहवालामधील परिच्छेद क्र. ४.४.१० "अनर्जित उत्पन्न न/कमी आकारणी" या संदर्भात महालेखापरीक्षकांनी खालील अभिप्राय व्यक्त केले.

महाराष्ट्र जमीन महसूल (शासकीय जमिनीची विल्हेवाट) नियम, १९७१ अनुसार लाभार्थींना, शासनाची परवानगी घेतल्याशिवाय, वाटप केलेल्या जमिनीची विल्हेवाट लावता येत नाही. शासन निर्णय नोव्हेंबर, १९५७, अनुसार कृषीतर भुखंडाची विक्री करण्यास अनर्जित उत्पन्नाच्या, म्हणजे जिल्हाधिकाऱ्याने मान्य केलेली विक्री किंमत आणि, लाभार्थींने भूखंडात केलेल्या सुधारणांच्या किंमतीसह, शासनाला दिलेली मूळ किंमत, यातील फरकाच्या ५० टक्के इतकी रक्कम दिल्यावर जिल्हाधिकारी परवानगी देऊ शकतात. शासनाच्या परवानगी शिवाय विक्री केलेल्या प्रकरणांच्या बाबतीत लाभार्थींना अनर्जित उत्पन्नाच्या ६२.५ टक्के ते ७५ टक्के रक्कम द्यावयाची होती. शिवाय, या तरतूदी, महाराष्ट्र भूसंपादन नियमावलीतील नियम ८१-H मध्ये व्याख्या केलेल्या शासनाच्या ५१ टक्क्यांहून अधिक भागधारणा असलेल्या शासकीय कंपनीची मालकी, खाजगी कंपनीला हस्तांतरण करण्याला ही लागू आहेत. चार जिल्हाधिकारी कार्यालयांमध्ये, असे आढळून आले की सहा लाभार्थ्यांनी १९९९ ते २००४ या कालावधीत, धारण केलेल्या ७८,८९,५०८.३९ चौ.मी. शासकीय जमिनी, शासनाची परवानगी न घेता, विकल्या/हस्तांतरित केल्या. ही अनधिकृत विक्री नियमात बसविण्यासाठी अनर्जित उत्पन्नाच्या ७५ टक्के रक्कम शासनाला देणे आवश्यक होते. पण त्या लाभार्थ्यांनी आजतागायत अनर्जित उत्पन्नाचे रुपये १३३.१६ कोटी खालील तपशीलाप्रमाणे शासनाला दिले नाहीत.

| अ. क्र. | वाटप केलेल्याचे नांव/ जिल्हाधिकारी कार्यालय | क्षेत्रफळ चौ.मी. मध्ये | नवीन वाटप केलेल्याचे नांव | हस्तांतरण करण्याचा दिनांक/ मागणी करण्याचा दिनांक | शासनाची परवानगी घेतली किंवा नाही | अनर्जित उत्पन्नाची मागणी केली किंवा नाही | केली असल्यास/ भरलेली रक्कम | बाकी (रुपये कोटीत) | मागणी न केलेल्या अनअर्जित उत्पन्नाची रक्कम (रुपये) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) |
| १ | मेसर्स मॉडर्न फूड इंडस्ट्रीज (शासकीय कंपनी) मुंबई उपनगर | २२, २६४ | मेसर्स मॉडर्न फूड इंडस्ट्रीज (शासकीय कंपनी नाही) | एप्रिल, २००० | नाही | नाही | -- | -- | २१.०६ (७५%) |
| २ | मेसर्स हॉटेल सेंटॉर, जूहू (शासकीय कंपनी) मुंबई उपनगर | १८१०.०२ | मेसर्स टूलिप हॉस्पिटॅलिटी (शासकीय कंपनी नाही) | मार्च, २००२ | नाही | नाही | नाही | | २.१४ (७५%) |
| ३ | मेसर्स प्रसन्ना मेटालिक्स, ठाणे | १२,१३७.३७ | मेसर्स संगेश्वर नगर सी.एच. एस. आणि मेसर्स सुक्रीम सिंथेटिक्स | फेब्रुवारी, २००२ | नाही | हो/५०% (७५% च्या जागी) म्हणजे रुपये ०.३७ कोटी | अंशत: दिले (आकारणी रु.०.१२ कोटी) | ०.२५ (कारण ७५% अनर्जित उत्पन्न देय आहे.) | -- |
| ४ | मेसर्स कल्याणी स्टील्स, पुणे | १,००,००० | मेसर्स कल्याणी कार्पेंटर्स एस. एस.लिमिटेड | सप्टेंबर, १९९९ | नाही | नाही | -- | -- | १६.०९ (७५%) |
| ५ | मेसर्स एस. एम. डायकेम, पुणे | ३,०२,१०० | श्रेणी II ते श्रेणी I भोगवटादार | फेब्रुवारी, १९९९ | -- | नाही/ (अनअर्जित उत्पन्नाच्या ६५% मागणी करावयाची आहे). | नाही | ०.८५ | -- |
| ६ | मेसर्स आय पी सी एल (शासकीय कंपनी), रायगड | ७४,५१,१९७ | मेसर्स आय पी सी एल (शासकीय कंपनी नाही) | फेब्रुवारी, २००४ | नाही | नाही | -- | -- | ९२.७७ (७५%) |
| **एकूण** | | **७८,८९,५०८.३९** | **एकूण रक्कम (र.क्र.९ + १०)** | | | | | | **१३३.१६** |

शासनाने दोन प्रकरणांमध्ये (अ.क्र.१ आणि ६) ऑगस्ट, २००५ मध्ये नमूद केले की भूसंपादन नियमावली कलम ८१H मधील विनिर्दिष्ट तरतूद लक्षात घेऊन, या प्रकरणांमध्ये विधिमत घेण्यासाठी निर्देश दिले जातील व अ.क्र.५ चे प्रकरण शासनाकडे आदेशाकरिता पाठविले जाईल. इतर प्रकरणांमध्ये वस्तुस्थितीची पडताळणी केल्यानंतर योग्य कार्यवाही केली जाईल.

**ज्ञापन :**

या संदर्भात विभागाने पाठविलेले लेखी स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये असे नमूद करण्यात आले आहे की,

**१) मे.मॉडर्न फूड इंडस्ट्रीज यांनी हस्तांतरीत केलेल्या जमिनीबाबत :-**

**३.२** मौजे गोरेगाव ता.बोरीवली जिल्हा मुंबई उपनगर मधील आरे कॉलनीतील १८ एकर जमीन केंद्र शासनाने बेकरी व्यवसायाकरीता स्थापन केलेल्या मॉडर्न बेकरीस (इंडिया) लि. या संस्थेला बेकरीसाठी लागणाऱ्या यंत्र सामग्रीच्या उभारणीकरीता दिनांक ३.६.१९६६ ते २.६.१९८६ या २० वर्षासाठी भाडेपट्टयाने व भाडेपट्टा संपुष्टात आल्यानंतर म्हणजे ३.६.१९८६ रोजी त्या दिवशी असलेल्या जमीनीच्या बाजार भावाची किंमत घेऊन शासन ज्ञापन दिनांक ७.३.१९८६ अन्वये मंजूर केलेली आहे. मात्र मॉडर्न बेकरी (मॉडर्न फुड इंडस्ट्रीज) यांनी भाडेपट्टयाच्या/कब्जेहक्काच्या रकमेचा भरणा न करता सदरची जमीन नाममात्र भाडेपट्टयाने मिळण्याची विनंती शासनास केली. त्याअनुषंगाने शासन ज्ञापन दिनांक ७.११.१९९६ अन्वये कंपनीची विनंती अमान्य करुन कंपनीच्या ताब्यातील १८ एकर जमीनीपैकी १२.५ एकर जमीन काढून घेऊन ५.५ एकर जमीन कंपनीकडे ठेवण्यास व सदर जमीनीचे १९७६ ची प्रति चौ.मी. रुपये ५० व सन १९८६ चे प्रति चौ.मी. ३००/- इतक्या मुल्यांकनास मंजूरी देऊन त्यानुसार होणारी रक्कम वसूल करण्याचे निर्देश देण्यात आले. या जमिनीचा दिनांक २३.१०.२००० रोजी करारनामा करण्यात आला. करारनाम्यातील अट क्रमांक ६ नुसार शासनाच्या पूर्वपरवानगीशिवाय विनापरवाना हस्तांतरण / वापरात बदल केल्यास अनर्जित उत्पन्न घेण्याची अट नमुद केली आहे.

मे.मॉडर्न फुड इंडस्ट्रीज (इंडीया) लि.व मे.मॉडर्न फुड न्युट्रीशिअन इंडस्ट्रीज लि. या दोन कंपन्याचे विलीनीकरण (Amalgamation) मे.हिंदुस्थान युनिलिव्हर या कंपनीबरोबर करण्यास दिल्ली उच्च न्यायालयाने दिनांक १५.१.२००७ च्या आदेशान्वये मंजूरी दिली आहे. मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार मे.मॉडर्न फुड इंडस्ट्रीजच्या सर्व मिळकती व त्यावरील हक्क मे.हिंदुस्थान युनिलिव्हर या कंपनीकडे गेले आहेत. मे हिंदुस्थान युनिलिव्हर लि. यांनी दिनांक २२.३.२०१० च्या अर्जान्वये मे.मॉडर्न फुड इंडस्ट्रीज लि. यांना प्रदान केलेली शासकीय जमीन मे.हिंदुस्थान युनिलिव्हर लि.यांच्या नावे करण्याची विनंती जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर

जिल्हा यांना केली आहे. त्या अनुषंगाने जमीन प्रदानाच्या करारातील अट क्रमांक ६ नुसार रुपये २७,२५,६०,५९६/- इतके अनर्जित उत्पन्नाची रक्कम मे.हिंदुस्थान युनिलिव्हर यांचेकडून वसूल करुन त्यानंतर महसूल अभिलेखात मे.हिंदुस्थान युनिलिव्हर यांचे नाव दाखल करण्याबाबतचा प्रस्ताव जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांनी विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचेमार्फत शासनास सादर केला आहे. सदरचा प्रस्ताव विभागीय आयुक्त यांचेकडून प्राप्त झाल्यावर अनर्जित उत्पन्न वसूल करण्याच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी यांना शासनाकडून योग्य ते निर्देश देण्यात येतील.

**२) मे.हॉटेल सेंटॉर यांनी हस्तांतरीत केलेल्या जमिनीबाबत :-**

**३.३** मौजे-जुहू, ता.अंधेरी स.नं.७३ पै २१६५ चौ.वार (१८१०.२ चौ.मी.) सरकारी जमिन दिनांक १५.३.१९४१ च्या कराराने श्री.किकाभाई प्रेमचंद ट्रस्टला ५० वर्षाचे भाडेपट्टयाने खूली व बगिचा या प्रयोजनासाठी मंजूर केलेली आहे. त्यानंतर शासन पत्र दिनांक १५.१.१९७१ अन्वये सदर जागा पूर्वीच्याच प्रयोजनासाठी वापरण्याच्या अटीवर व या संदर्भात शासनाकडून भाडेपट्टयाच्या अन्य अटी व शर्ती यथावकाश ठरविल्यानंतर त्या भाडेपट्टेधारकास मान्य होतील या अटीच्या अधिन राहून मे.एअर इंडियाला हस्तांतर करण्यास परवानगी दिली. शासनाने पुन्हा ज्ञापन दिनांक २५.९.१९७२ अन्वये सदरची जमिन एअर इंडियाकडून मे.हॉटेल कॉर्पोरेशन ऑफ इंडिया यांना दिनांक १५.१.१९७१ च्या पत्रातील पूर्वीच्याच अटी व शर्तींना अधिन राहून हस्तांतरणास परवानगी दिलेली आहे. शासन ज्ञापन दिनांक २७.१०.१९८३ अन्वये हॉटेल कॉर्पोरेशन ऑफ इंडीया कडे हस्तांतरीत झालेल्या जमिनीच्या भाडेपट्टयाच्या अटी व शर्ती निश्चित केल्या असून भाडेपट्टा सन १९९० पर्यंत राहणार असून पुन्हा भाडेपट्टयाचा कालावधी ५० वर्षाने वाढविण्याची तरतूद होती. त्याप्रमाणे सन १९९० पर्यंत पूर्ण रक्कम मे.हॉटेल कॉर्पोरेशन ऑफ इंडिया कडून वसूल करण्यात आलेली आहे. प्रश्नाधीन जमिनीच्या भाडेपट्टयाची मुदत दिनांक ३१.७.१९९० रोजी संपुष्टात आलेली आहे व जागेचा वापर हॉटेल कॉर्पोरेशन ऑफ इंडिया करीत असल्याने शासनाचे आदेशाचे अधीन राहून तात्पुरत्या दराने भाडेपट्टयाचे आकारणी करुन पट्टेदारास भाडेपट्टा भरण्यास जिल्हाधिकारी कार्यालयाने दिनांक २२.१०.१९९३ रोजी आदेश पारित केले होते.

सदरच्या आदेशामध्ये आकारण्यात आलेल्या भाडेपट्टयाच्या दरास मे.हॉटेल कॉर्पोरेशन यांनी हरकत घेऊन अपर आयुक्त, कोकण विभाग यांचेकडे अपिल दाखल केले होते. या प्रकरणी आयुक्त, कोकण विभाग यांनी त्यांच्या दिनांक २५.५.१९९५ चे आदेशान्वये जिल्हाधिकारी यांचे आदेश तांत्रिक मुद्दयावर रद्दबादल ठरवून तात्पुरत्या दराने भाडेपट्टा आकारण्याचे अधिकार जिल्हाधिकारी कार्यालयास नसल्याचे स्पष्ट केले. प्रस्तुत प्रकरणातील भाडेपट्टयाची मुदत संपलेली असल्याने या शासकीय जागेच्या भाडेपट्टयाचे नुतनीकरण करण्यासंदर्भात भाडेपट्टेधारकास सुनावणी देऊन भाडेपट्टा नुतनीकरणाची कार्यवाही सुरु असताना जिल्हाधिकारी कार्यालयाच्या असे निदर्शनास आले की, हॉटेल कॉर्पोरेशन ऑफ इंडिया यांनी त्यांच्या खाजगी

जागेसह त्यांचेकडे असलेली भाडेपट्टयाची शासकीय जागा शासनाची पूर्वपरवानगी न घेता टुलीप हॉस्पिटॅलिटी सर्व्हीसेस यांना दिनांक ११.३.२००२ च्या करारान्वये विकली आहे. त्याप्रमाणे त्यांनी शर्तभंग केला असल्याने भाडेपट्टी नुतनीकरणाची कार्यवाही थांबवून भाडेपट्टेदार यांना जिल्हाधिकारी कार्यालयाकडून शर्तभंगाबाबत कारणे दाखवा सूचना देण्यात आली. याप्रकरणी जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या सुनावणीच्या अनुषंगाने हॉटेल कॉर्पोरेशन ऑफ इंडिया यांनी केलेल्या बेकायदेशीर व्यवहारापोटी शासन निर्णय दिनांक २१.११.१९५७ नुसार ७५% अनर्जित रक्कम रुपये ४,४८,०२,४५०/- भरण्याबाबत जिल्हाधिकारी यांनी दिनांक ५.७.२००६ रोजी आदेश पारीत केले. सदर रक्कम संस्थेने भरली नसल्याने दिनांक १.१२.२००८ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयाने रक्कम भरण्याबाबत सूचना बजावली. त्याविरुध्द मे.टुलीप हॉस्पिटॅलिटी लि.यांनी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ च्या कलम २४७ खाली अतिरिक्त आयुक्त कोकण विभाग यांच्याकडे अपील केले. सदरच्या अपीलामध्ये अतिरिक्त आयुक्त यांनी दिनांक १९.१.२००९ रोजीच्या अंतरिम आदेशान्वये जिल्हाधिकारी यांच्या दिनांक १.१२.२००८ च्या नोटीशीला अंतरिम स्थगिती देण्यात आली. त्यानंतर मे.टुलीप हॉस्पिटॅलिटी यांनी शासनाकडे अपील दाखल केले असल्याने सदरची अपीलाची सुनावणी शासनाकडे होणे उचित होईल असे नमूद करुन अतिरिक्त आयुक्त कोकण यांनी त्यांच्या दिनांक ११.१२.२००९ च्या आदेशान्वये सदरचे अपील निकाली काढले आहे. याप्रकरणी मे.टुलीप हॉस्पिटॅलिटी लि.यांनी मा.मंत्री (महसूल) यांच्याकडे महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ च्या कलम २५७ अंतर्गत पुनरिक्षण अर्ज केला असून त्या अनुषंगाने मा.मंत्री (महसूल) यांच्याकडे दिनांक २.२.२०१० रोजी सुनावणी झाली असून या प्रकरणी निर्णय अपेक्षित आहे.

**३) मेसर्स प्रसन्ना मेटालिक्स, ठाणे यांनी हस्तांतरीत केलेल्या जमिनीबाबत :-**

**३.४** मौ.नांदिवली तर्फे पाचानंद येथील स.नं.७१ पै.मधील मे.प्रसन्ना मेटालिक्स प्रा.लि.यांना नवीन अविभाज्य शर्तीने धारणा केलेल्या ३०,७३३.९३ चौ.मी.इतक्या क्षेत्रापैकी १०४७०.६७ चौ.मी.इतक्या क्षेत्राची विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांनी दिनांक ३१.२.२००२ च्या आदेशान्वये, ५० टक्के अनर्जित रक्कम शासन जमा करुन शंखेश्वर नगर को.ऑप.हौ.सोसायटी यांना निवासी प्रयोजनाकरिता विक्री करण्यास परवानगी देण्यात आली आहे.

महाराष्ट्र जमीन महसूल नियम पुस्तिक खंड-२ मधील परि.८४ मधील तरतूदीनुसार नवीन शर्तीवर धारण केलेल्या अकृषिक भूखंडाची विक्री परवानगी ५० टक्के अनर्जित उत्पन्न घेऊन देता येते. प्रस्तुत प्रकरणी विभागीय आयुक्तांनी सदर तरतूदीस अनुसरुन, ५०% अनर्जित रक्कम आकारुन जमीन विक्रीस दिलेली परवानगी योग्य असल्याने या प्रकरणी संबंधितांकडून ७५% अनर्जित रक्कम वसूल करण्याची आवश्यकता नाही.

**४) मेसर्स कल्याणी स्टील्स, पुणे यांनी हस्तांतरीत केलेल्या जमिनीबाबत :-**

**३.५** मौजे मुंढवा ता.पुणे शहर येथील स.नं.७२ ते ७६/२ मधील ११३ एकर ३८.५ गुंठे जमीन मे.भारत फोर्ज लि. या कंपनीला औद्योगिक प्रयोजनासाठी शासनाने मंजूर केली आहे. सदर जागेपैकी २५ एकर जमीन मेसर्स कल्याणी स्टील्स लि.पुणे या कंपनीला दिनांक २७/९/१९७३ पासून ९८ वर्षाच्या कालावधीकरीता काही अटी/शर्तीवर भाडेपट्टयाने देण्यास शासन ज्ञापन दिनांक १/३/१९८२ अन्वये मान्यता देण्यात आलेली होती. मे.कल्याणी स्टील्स लि.यांच्या नावाने असलेला भाडेपट्टयाचा करार मे.कल्याणी कारपेंटर्स स्पेशल स्टील या कंपनीच्या नावे उर्वरीत कालावधीसाठी हस्तांतरीत करण्याबाबत मे.भारत फोर्ज लि. या कंपनीने शासनाला विनंती केली होती. त्यानुसार सदर भाडेपट्टा रद्द करुन तो (मेसर्स कल्याणी स्टील्स लि.या कंपनीला भाडेपट्टा देतांना ज्या अटी/शर्तीवर विहित केल्या होत्या त्यास अनुसरुन) नेहमीच्या अटी/शर्तीवर व खालील विशेष अटीवर मेसर्स कल्याणी कारपेंटर्स स्पेशल स्टील्स लि. या कंपनीला हस्तांतरण करण्यास दिनांक २९ सप्टेंबर, १९९९ च्या शासन ज्ञापनान्वये शासन मान्यता दिली आहे.

"सदर जमिनीची चालू बाजारभावाने होणारी किंमत सहायक संचालक, नगर रचना, पुणे यांचेकडून निर्धारित करुन घ्यावी व त्यास शासनाची मान्यता घेण्यात यावी. तसेच सदर किंमतीवर शासनाच्या प्रचलित धोरणानुसार भाडेपट्टयाची रक्कम निश्चित करावी व त्या रकमेच्या ९० टक्के रक्कम अधिमुल्य म्हणून मेसर्स भारत फोर्ज लि. या कंपनीकडून वसूल करण्यात यावी"

त्यानुसार जिल्हाधिकारी, पुणे यांनी दिनांक ३१/१२/१९९९ च्या पत्रान्वये सदर जमिनीचे मुल्य निर्धारीत करण्याबाबत संचालक, नगररचना पुणे यांना सूचना दिलेल्या होत्या. त्यानुसार संचालक, नगर रचना पुणे यांनी जागेचा मोजणी नकाशा सादर करण्याचे कळविले. त्यानुसार तहसिलदार, पुणे यांनी दिनांक ११/७/२००० च्या पत्रान्वये व्यवस्थापक, मे.कल्याणी कारपेंटर्स स्पेशल लि. यांना तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख यांच्या कार्यालयाशी संपर्क साधून जमिनीची मोजणी करुन घेण्याचे निर्देश दिले होते. तथापि प्रस्तुत प्रकरणी कंपनीने जमिनीची मोजणी करुन घेतली नाही. तसेच जिल्हाधिकारी तथा तहसिलदार कार्यालयाकडून वेळोवेळी पाठपुरावा झालेला आढळून येत नाही. सदर जमिनीची मोजणी झालेली नसल्याने जमिनीचे मुल्य निर्धारीत करता आलेले नाही व पर्यायाने जमीन हस्तांतरणास मंजूरी बाबतचे जिल्हाधिकारी यांचे अंतिम आदेश पारीत झालेले नाहीत.

तहसिलदार, पुणे यांनी दिनांक ८/८/२०१० रोजी जागेचा पंचनामा केला असता, जागेवर कल्याणी कारपेंटर्स स्पेशल स्टील्स असा फलक असून आतील बाजूस इमारत व कारखान्याचे शेड आहेत. सदर जागेचा वापर औद्योगिक प्रयोजनासाठी आहे.

प्रस्तुत प्रकरणी अद्याप जागेची मोजणी झालेली नसल्याने जागेचे मुल्य निर्धारीत करण्यात आलेले नाही. त्यामुळे शासनाच्या दिनांक २९ सप्टेंबर, १९९९ च्या आदेशानुसार दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी करता आलेली नाही.

वरीलप्रमाणे जमिनीच्या मुल्यांकनास शासनाची मान्यता घेण्याबाबत निदेश असले तरी मात्र त्यानंतर दिनांक २९/५/२००६ च्या शासन निर्णयान्वये जमिनीच्या किंमती शिघ्र सिध्दगणकानुसार निश्चित करण्याबाबत शासनाने धोरण निश्चित केलेले असल्याने जमिनीच्या मुल्यांकनास आता शासनाच्या मान्यतेची आवश्यकता नाही. त्यामुळे याबाबत भाडेपट्टयाची रक्कम व नजराणा रक्कम निश्चित करण्याची कार्यवाही जिल्हाधिकारी यांच्याकडून सुरु आहे.

**५) मेसर्स एस.एम.डायकेम, पुणे यांनी हस्तांतरीत केलेल्या जमिनीबाबत :-**

**३.६** मौजे भरे, ता.मुळशी, जि.पुणे येथील गट नं.४०६ मधील ४० हेक्टर २१ आर क्षेत्र शासन ज्ञापन दिनांक १८/४/१९९० अन्वये मे.एस.एम.डायकेम कंपनी लि. यांना औद्योगिक प्रयोजनासाठी मंजूर करण्यात आली आहे. त्यानुसार जिल्हाधिकारी, पुणे यांनी त्यांच्या दिनांक २६/३/१९९१ च्या आदेशान्वये जमिनीची तात्पुरती किंमत रुपये ४०,२१,०००/- वसुल करुन कंपनीस जमीन मंजूर करण्यात आली आहे. सदर कंपनीने सदर जागेचा औद्योगिक वापर करण्याऐवजी औद्योगिक वसाहत स्थापन करण्यासाठी परवानगी देण्याची विनंती केली होती. त्यास अनुसरुन शासन ज्ञापन दिनांक २७/११/१९९७ अन्वये सदर जागेचा औद्योगिक वसाहत स्थापन करणेसाठी वापर करण्यास परवानगी देण्यात आली आहे. त्यामध्ये सदर जमिनीची कब्जेहक्काची अंतिम किंमत निश्चित करुन तात्पुरती किंमत व कब्जेहक्काची अंतिम किंमत यामधील फरकाची रक्कम व्याजासह वसूल करणे बाबत अट टाकण्यात आली होती. तथापि संस्थेने सदर अटी/शर्ती मान्य असल्याबाबत प्रतिज्ञापत्र अद्याप सादर केलेले नाही. त्यानंतर सदर कंपनीने ३० हे २१ आर इतक्या जमिनीचा धारणाधिकार वर्ग-२ मधून वर्ग-१ मध्ये रुपांतरीत करण्याची विनंती केली होती. त्यास अनुसरुन शासनाने दिनांक ९/२/१९९९ च्या शासन ज्ञापनान्वये जमिनीचा धारणाधिकार वर्ग-२ मधून वर्ग-१ मध्ये रुपांतरीत करण्यास मान्यता दिली आहे. त्यामध्ये जमिनीची अंतिम किंमत व कंपनीने भरलेली तात्पुरती किंमत यामधील फरकाची रक्कम प्रचलित दराने व्याजासह वसूल करणेची तसेच शासनाने निश्चित केलेली अंतिम किंमत व कंपनीने भरलेली तात्पुरती किंमत यातील फरकाच्या रकमेच्या ६५% इतकी रक्कम नजराणा अथवा अनर्जित उत्पन्नातील शासनाचा हिस्सा म्हणून वसूल करणेची अट टाकण्यात आली होती. त्यानुसार जिल्हाधिकारी यांनी नजराण्याची रक्कम निश्चित करण्यासाठी प्रस्ताव शासनास दिनांक ६/८/१९९९ रोजी सादर केला आहे. त्यावर अद्याप निर्णय झालेला नाही. सदरच्या जागेचा कंपनीकडून मंजूर प्रयोजनासाठी अद्याप वापर केलेला नाही.

दरम्यानच्या काळात सदर जमिनीची तहसिलदार, मुळशी यांनी पाहणी करुन दिनांक ९/७/२००९ रोजी अहवाल सादर केला आहे. त्यामध्ये स.नं.४७ चा नवीन ग.नं.४०६ असा झाला असून कंपनीस दिलेल्या जागेचा ग.नं.४०६/२ असा हिस्सा पडलेला आहे. आतापर्यंत कंपनीकडून शासकीय, निमशासकीय प्रयोजनासाठी ९ हेक्टर १३ आर इतके क्षेत्र काढून घेण्यात आले आहे. आज रोजी कंपनीच्या नावे ग.नं.४०६/२/१/१ क्षेत्र ३१ हेक्टर ०८ आर शिल्लक राहिल्याचे दिसून येते. सदर जागेबाबत आता वनसंरक्षक, पुणे यांनी त्यांच्या

दिनांक ७/८/२००९ अन्वये, सदर जमीन ही वन विभागाकडील १ मार्च, १८७९ मधील अधिसुचनेनुसार "राखीव वन" संवर्गातील असून त्यास वन संवर्धन अधिनियम १९८० मधील तरतुदी लागू होतात. त्यामुळे सदर जमीन वन विभागाच्या ताब्यात द्यावी, असे कळविले आहे. याबाबत योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

**६) मेसर्स आय.पी.सी.एल.(शासकीय कंपनी), रायगड यांनी हस्तांतरीत केलेल्या जमिनीबाबत -**

**३.७** सदर लेखापरिच्छेद अहवाल हा अनर्जित उत्पन्नाची आकारणी न करणे किंवा कमी करणे या संदर्भात अहे. प्रस्तुत लेखापरिच्छेदामध्ये एकूण ६ प्रकरणे असून सदर प्रकरण हे क्रमांक ६ वर मे.आय.पी.सी.एल.या कंपनीने शासनास अनर्जित रक्कम भरणा न केल्यासंदर्भात आहे. यासंदर्भात असे नमूद करण्यात येते की, आय.पी.सी.एल.ही पूर्वी शासकीय कंपनी होती. परंतु सदर कंपनीचे सर्व भाग रिलायन्स इंडस्ट्रीज लि.या कंपनीने घेतले असून फक्त नाममात्र एक टक्का शेअर गव्हर्नमेंट इक्विटी म्हणून शिल्लक आहेत. त्यामुळे सदर कंपनी ही पब्लिक सेक्टर मधून प्रायव्हेट सेक्टर मध्ये रुपांतरीत झालेली आहे. त्यामुळे शासनाची पूर्व परवानगी न घेता आय.पी.सी.एल.ला दिलेल्या जमिनीचे खाजगी कंपनीकडे हस्तांतरण झालेले आहे. त्यामुळे सदर प्रकरण नियमानुकूल करण्यासाठी या प्रकरणी ७५ टक्के म्हणजेच रु.९२.७७ कोटी एवढी रक्कम शासनास अनर्जित उत्पन्न मिळणे आवश्यक आहे, असे लेखापरिच्छेदामध्ये नमूद करण्यांत आले आहे.

प्रस्तुत प्रकरणी प्रादेशिक अधिकारी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, महाड यांनी त्यांच्या दिनांक ८/२/२००७ च्या पत्रान्वये असे कळविले आहे की, आय.पी.सी.एल.साठी देण्यात आलेली जमीन ही महामंडळामार्फत शासनाच्या उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाने संपादित केलेली आहे. सदर जमिन महामंडळाने करार करुन कंपनीस उद्योगाकरीता दिलेली आहे, जमिनीची विक्री करण्यात आलेली नाही. औद्योगिक क्षेत्र स्थापन झाल्यानंतर त्या क्षेत्राखाली येणाऱ्या जमिनींबाबतची कार्यवाही महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ मधील तरतूदीनुसार करण्यात येते. त्यामुळे मे.आय.पी.सी.एल., नागोठणे यांचेकडून शासनाने अनर्जित रक्कम म्हणून वसूल करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. ७/१२ सदरी सदर जमीन महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या नांवे आहे.

महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ व महाराष्ट्र जमीन महसूल (स.ज.वि.) नियम, १९७१ अन्वये वाटप केलेल्या जमिनीच्या हस्तांतरणावर अनर्जित रक्कम आकारण्यात येते. मे.आय.पी.सी.एल.लि.यांना मौजे नागोठणे येथे मंजूर केलेली जमीन ही महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ व त्याखाली तयार केलेल्या नियमातील तरतूदीनुसार मंजूर केलेली नाही. त्यामुळे याप्रकरणी अनर्जित उत्पन्न वसूल करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. उक्त जमीन ही महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने मे.आय.पी.सी.एल.यांना भाडेतत्वावर वितरीत केलेली आहे व त्याबाबतचा भाडेपट्टा करार महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ व

आय.पी.सी.एल.यांचेमध्ये करण्यात आलेला आहे व त्याबाबतच्या विनियमची रक्कम ही महामंडळाने वसूल केली आहे. महाराष्ट्र औद्योगिक महामंडळाच्या मालकीच्या जमिनींना महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ मधील तरतूदी लागू होतात. उक्त जमिनीचे वाटप महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियमातील तरतूदीनुसार करण्यात आलेले नसल्याने २१ नोव्हेंबर, १९५७ च्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार मे.आय.पी.सी.एल.कडून अनर्जित रक्कम वसूल करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

मे.आय.पी.सी.एल. व मे.रिलायन्स इंडस्ट्रीज लि.यांच्या एकत्रिकरणानंतर मे.आय.पी.सी.एल. यांचे नावे असलेला भाडेपट्टा महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने मे.रिलायन्स इंडस्ट्रीज यांचे नावे केला असून त्याकरीता रु. ११,३१,०६,७५०/- एवढी हस्तांतरण फी वसूल केली आहे. यावरुन स्पष्ट होते की, जमिनीची मालकी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाची आहे. त्यामुळे या प्रकरणी शासनास अनर्जित उत्पन्न वसूल करता येणार नाही. सदर खुलासा मान्य करण्यात यावा.

## साक्ष :

उपरोक्त परिच्छेदासंदर्भात समितीने दिनांक १८ ऑगस्ट, २०१० व २८ सप्टेंबर, २०१० रोजी अपर मुख्य सचिव, महसूल व वन विभाग व प्रधान सचिव, उद्योग विभाग यांची साक्ष घेतली.

**(१) मेसर्स मॉर्डन फूड इंडस्ट्रिज**

**३.८** मेसर्स मॉर्डन फूड इंडस्ट्रिज यांनी हस्तांतरीत केलेल्या जमीनीबाबत समितीने विभागीय सचिवांना विचारणा केली की, रु. २७,२५,६०,५९६/- एवढ्या रकमेच्या अनर्जित उत्पन्नाची रक्कम केव्हा वसूल करण्यात आली? तसेच ही अनर्जित उत्पन्नाची रक्कम केव्हापासून आहे त्याच्या तारखा नमूद कराव्यात. याबाबत खुलासा करताना विभागीय सचिवांनी समितीस असे सांगितले की, अनर्जित उत्पन्नाची रक्कम अद्यापपर्यंत वसूल करण्यात आली नाही. अलिकडेच जिल्हाधिकारी कार्यालयाकडून विभागीय आयुक्ता मार्फत प्रस्ताव शासनाकडे सादर होत आहे. मेसर्स मॉडर्न फूड इंडस्ट्रिज (इंडिया) लि.व.मेसर्स मॉडर्न फूड न्युट्रीशिअन इंडस्ट्रीज लि. या दोन कंपन्याचे विलिनीकरण मे.हिंदुस्थान युनिलिव्हर या कंपनीबरोबर करण्यास दिल्ली उच्च न्यायालयाने दिनांक १५/०१/२००७ च्या आदेशान्वये मंजूरी दिली आहे. मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार मे.मॉडर्न फूड इंडस्ट्रीजच्या सर्व मिळकती व त्यावरील हक्क मे.हिंदुस्थान युनिलिव्हर या कंपनीकडे गेले आहेत. मे हिंदुस्थान युनिलिव्हर लि. यांनी दिनांक २२/०३/२०१० च्या अर्जान्वये मेसर्स मॉडर्न फूड इंडस्ट्रिज लि. यांना प्रदान केलेली जमीन मे.हिंदुस्थान युनिलिव्हर लि. यांच्या नावे करण्याची विनंती जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांना केली आहे. त्या अनुषंगाने जमीन प्रदानाच्या करारातील अट क्रमांक ६ नुसार रु. २७,२५,६०,५९६/- इतकी अनर्जित उत्पन्नाची रक्कम मे.हिंदुस्थान युनिलिव्हर यांचेकडून वसूल करुन त्यानंतर महसूल अभिलेखात मे.हिंदुस्थान युनिलिव्हर यांचे नाव दाखल करण्याबाबतचा प्रस्ताव जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांनी विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचेमार्फत शासनास सादर केला आहे.

**३.९** वरील दोन कंपन्यांचे विलिनीकरण करण्यात आले आहे. या दोन कंपन्यामधील हस्तांतरणाचा जो नफा होईल त्याच्या ५० टक्के रक्कम शासनास मिळाली पाहिजे, असा शासनाचा नियम आहे. तसेच शासनाचे असे धोरण आहे की, एखादी जागा कंपनीला दिली, परंतु त्या कंपनीने ती जागा दुसऱ्या कंपनीला विकली तर सदरची जागा हस्तांतरीत करीत असतांना सध्या जो सिद्धगणकाचा दर आहे तो विचारात घेतला जातो. समजा त्या जागेची किंमत १०० कोटी रुपये असेल तर त्यातील ५० टक्के रक्कम शासनास मिळाली पाहिजे. यावर विभागीय सचिवांनी दिनांक १५/०१/२००७ रोजीच्या आदेशान्वये माननीय न्यायालयाने या दोन्ही कंपन्यांच्या विलिनीकरणास मंजूरी दिली आहे. बाजारभावाप्रमाणे ५० टक्के अनर्जित रक्कम शासनाकडे भरणा केली पाहिजे. अशी माहिती समितीस दिली.

**३.१०** मे.मॉडर्न फूड इंडस्ट्रिज या कंपनीला १८ एकर जागा दिली आहे. या जमिनीपैकी साडेबारा एकर जमीन शासनाने काढून घेऊन साडेपाच एकर जमीन कंपनीकडे ठेवली. या साडेपाच एकर जमिनीची सिद्धगणकाच्या दराप्रमाणे किंमती निश्चित करण्यात आली. जमीन प्रदानाच्या करारातील अट क्रमांक ६ नुसार शासनाच्या पूर्वपरवानगी शिवाय विनापरवाना हस्तांतरण केल्यास अनर्जित उत्पन्न घेण्याची अट नमूद केली होती. त्या अटींचे पालन करण्यात आले नाही काय ? यातील ५० टक्के नफ्याची रक्कम २७ कोटी रुपये होते काय ? ती रक्कम अद्यापपर्यंत शासनाकडे आली नाही. सन २००७ ते २०१० या चार वर्षांच्या कालावधीत २७ कोटी रुपये शासनाकडे भरणे आवश्यक होते, परंतु ती रक्कम भरणा केली नाही. या रकमेवर व्याज लावले आहे का? अशी विचारणा समितीने विभागास केली असता विभागीय सचिवांनी सदरहू रक्कम ही ५० टक्के नफ्याप्रमाणे २७ कोटी रुपये होती. ज्या तारखेला या दोन कंपन्यांचे विलिनीकरण झाले आहे तेव्हापासून व्याज लावूनच ही रक्कम वसूल केली जाणार आहे, अशी माहिती समितीस दिली.

**३.११** वरील दोन कंपन्यांचे विलिनीकरण करणे म्हणजे ही शासनाची निव्वळ फसवणूक आहे. विलिनीकरण करण्याअगोदर या दोन कंपन्यांच्या विलिनीकरणाबाबत आक्षेप मागविण्यात आले होते का? यासंदर्भात शासनाचे काही आक्षेप होते का? मुंबई उपनगर जिल्हाधिकारी कार्यालयाने याबाबत आक्षेप घेणे आवश्यक होते. त्यावेळी विलिनीकरण संदर्भात आक्षेप काढण्याची जबाबदारी शासनाची होती अशी समितीने विचारणा केली असता, विभागीय सचिवांनी सांगितले की, विलिनीकरण झाल्याशिवाय कंपनी शासनाचे पैसे देऊ शकणार नाही.

**३.१२** मुंबई उपनगर जिल्हाधिकारी कार्यालय याप्रकरणी दावा करु शकले असते. तसेच या प्रकरणी मंत्रालय स्तरावर काही निर्णय प्रलंबित आहे का? दोन कंपन्यांचे विलिनीकरण होत असेल तर कायदेशीर सूचना काढून सर्व प्रक्रीया पार पाडण्याची आवश्यकता होती. ही मालमत्ता शासनाची होती त्यामुळे शासनाची परवानगी घेतल्याशिवाय या दोन्ही कंपन्यांचे विलिनीकरण करायला नको होते. याप्रकरणी कोणी निष्काळजीपणा केला, याला कोण जबाबदार आहे? व कंपनीने याबाबत जाहिर सूचना प्रसिध्द केली होती

काय ? मुंबई उपनगर जिल्हाधिकारी कार्यालयाची परवानगी घेतली होती काय ? या समितीने विचारलेल्या प्रश्नासंदर्भात विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, सर्वप्रथम ही जमीन त्या कंपनीला भाडेपट्टयाने दिली होती. त्यांनी मा.न्यायालयात विलिनीकरणाचा प्रस्ताव सादर केला. भाडेपट्टयाची बाब मा.न्यायालयासमोर ठेवली. कंपनीने मा.न्यायालयात जाण्यापूर्वी शासनाची परवानगी घेणे आवश्यक होते. परंतू सदरहू कंपनीने कसलीही सूचना शासनास दिलेली नाही. तसेच जोपर्यंत मेसर्स हिंदुस्थान युनिलिव्हर कंपनी शासनाकडे रक्कम भरणार नाही तोपर्यंत कंपनीच्या नावावर ही जमीन होणार नाही.

**३.१३** सदरहू कंपनी सुरु आहे काय ? असे समितीने विचारले असता सदरहू कंपनी सुरु आहे अशी माहिती विभागाने दिली. सदरहू कंपनी ही विलिनीकरणाची प्रक्रीया पूर्ण करीत असतांना शासनाने याबाबत कोणतेच आक्षेप घेतले नाहीत. ही शासनाची मालमत्ता होती. शासनाने त्या कंपनीला भाडेपट्टयाने जागा दिलेली आहे. शासनाच्या परवानगीशिवाय कंपन्यांचे विलिनीकरण करावयास नको होते. खरेतर या कंपनीला टाळे लावावयाला पाहिजे, तो शासनाचा हक्क आहे. शासनास अंधारात ठेवून करोडो रुपयांचे व्यवहार होत असतील तर ही बाब अतिशय गंभीर आहे. Government is supreme and is vested with power and authority. Any Court before giving any decision will ask the Government to give its say in the matter. या सर्व परिस्थितीस जे अधिकारी जबाबदार असतील त्यांची जबाबदारी निश्चित करण्यात यावी असे निदेश समितीने विभागास दिले.

**३.१४** सदरहू जमीन कंपनीला भाडेपट्टयाने दिली होती, व अटी व शर्ती पाहूनच माननीय दिल्ली उच्च न्यायालयाने निर्णय दिला आहे. यापूर्वीची मॉडर्न फूड इंडस्ट्रिज आणि हिंदुस्थान युनिलिव्हर या दोन्ही कंपन्याविरुध्द मा.न्यायालयात केस दाखल करावयास हवी. ज्यांची जमीन होती त्यांची परवानगी घेणे आवश्यक होते तसेच अजूनही सदरची जमीन कंपनीच्या नावावर झालेली नाही अशी माहिती विभागाने समितीस दिली. परंतु या दोन कंपन्यांचे विलिनीकरण झाले आहे. ती जागा त्यांच्या नावावर करा अथवा नका करु त्यांना कसलीच अडचण नाही, त्यांची कंपनी सुरु आहे. सदरहू कंपनी नवी दिल्ली येथील न्यायालयात गेलेली असली तरी शासनाने या प्रकरणात स्वत:हून पक्षकार होऊन शासनाचा हक्काचा पैसा मिळवावयास हवा, असे समितीने मत व्यक्त केले.

**३.१५** मॉडर्न फूड इंडस्ट्रिज ही शासनाची कंपनी आहे आणि मेसर्स हिंदुस्थान युनिलिव्हर ही लिमिटेड कंपनी आहे. यावर कोणाची देखरेख नव्हती काय ? शासनाची याप्रकरणी काही जबाबदारी आहे की नाही ? या प्रकरणाबाबत समिती अतिशय गंभीर आहे. या प्रकरणात जो अधिकारी जबाबदार असेल त्याला शिक्षा होणे आवश्यक आहे. असे समितीने विभागीय सचिवांना आदेश दिले.

**३.१६** Rule 81 of the Maharashrtra Land Acquisition Manual contains provision regarding transfer of Government land to private parties. Any transfer of land has to

be done as per these rules. अशी विचारणा महालेखाकारांनी केली असता, विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, in this case, it is not transfer. the land was given to M/s Modern Food Industries (India) Ltd and M/s Modern Food Nutrition industries Ltd. These two Companies are Government owned companies. The land was given on concessional terms to these two companies. Thereafter, these two companies entered into an agreement with Hindustan unilever Company and decided to share the assets and liabilities. The title gets transferred.

Now, it no longer remains a government company. The nature of the company changes from Government Company to Private Company. Due to this it becomes a different case. असे मत महालेखाकारांनी व्यक्त केले.

**३.१७** चार वर्षाचा कालावधी होऊन गेलेला आहे. याप्रकरणी राज्य शासनाकडे केव्हा पत्रव्यवहार झालेला आहे त्याच्या तारखा सांगाव्यात ? तसेच नवीन कंपनी कधी केली, याबाबतचा पत्रव्यवहार केव्हा झाला आहे ? ही कंपनी केंद्र सरकारची असो किंवा खाजगी असो. परंतु शासनाच्या परवानगीशिवाय असे व्यवहार होता कामा नये. शासनाच्या परवानगी शिवाय कोणी काहीही करेल हे संयुक्तिक नाही. केंद्र सरकारचे राज्य सरकारकडे किंवा जिल्हाधिकारी कार्यालयाकडे काही पत्र आले आहे का ? अशी विचारणा केली असता विभागीय सचिवांनी समितीस सांगितले की, राज्य शासनाकडे पत्रव्यवहार झालेला नाही. तसेच महसूल व वन विभागाकडे कसलाही पत्रव्यवहार केलेला नाही.

**३.१८** शासनाची अनर्जित रक्कम कंपनीकडून वसूल करावयाची आहे असे असताना शासन या प्रकरणात पक्षकार का झाला नाही ? जमिनीचे मुल्यांकन कोणी काढले आहे ? असे विचारले असता, जमिनीचे मुल्यांकन शासनाने केलेले आहे. २००७ च्या सिद्धगणकाप्रमाणे मुल्यांकन केलेले आहे. यामध्ये व्याज समाविष्ट केलेले आहे काय ? असे समितीने विचारले असता २००७ च्या मुल्याप्रमाणे आकारणी केली तर व्याज लावण्यात येईल. परंतु जर २००९ च्या मुल्याप्रमाणे आकारणी केली तर व्याज लावण्यात येणार नाही. तसेच सन २०१० या साली ३० कोटी रूपयांचे मुल्यांकन येते. २७ कोटी रूपये अनर्जित रक्कम मे.हिंदुस्थान युनिलिव्हर यांच्याकडून वसूल करून घेण्याबाबतचा प्रस्ताव विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांच्यामार्फत शासनाला ऑगस्ट महिन्यात सादर केला आहे. अशी माहिती विभागीय सचिवांनी दिली.

**३.१९** शासनाने ऑगस्ट महिन्यामध्ये प्रस्ताव शासनाला सादर केला आहे. सन २००७ पासून व्यवहार सुरू आहे. सन २००७ पासून ते ऑगस्ट २०१० पर्यंत म्हणजे पावणेचार वर्षे शासनाकडून कोणतीही दखल घेतली नसल्यामुळे समितीने याबाबत नाराजी व्यक्त केली.

**३.२०** मे.हिंदुस्थान युनिलिव्हर यांनी दिनांक २२.३.२०१० च्या अर्जान्वये मे.मॉडर्न फुड इंडस्ट्रीज लि.यांना प्रदान केलेली शासकीय जमीन मे.हिंदुस्थान युनिलिव्हर यांच्या नावे करण्याची विनंती जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांना केली आहे. त्या अनुषंगाने मुल्यांकन काढून तत्संबंधीचा प्रस्ताव शासनाकडे आलेला आहे. मे.हिंदुस्थान युनिलिव्हर कंपनीकडून शासन अनर्जित रक्कम वसूल करणार आहे. तो पर्यंत त्यांच्या नावे होणार नाही असे विभागीय सचिवांनी समितीला सांगितले असता, या कंपनीच्या संदर्भात कागदपत्रावर जमीन हस्तांतरीत झाल्याचे दिसत नसले तरी वास्तविक जमीन हस्तांतरीत झालेली आहे असे समितीने विभागाच्या निदर्शनास आणले.

**३.२१** मे.मॉडर्न बेकरीला भाडेपट्टयाने जमीन दिलेली आहे असे विभागीय सचिवांनी समितीस सांगितले असता, त्यांनी दुसऱ्या कंपनीशी व्यवहार केल्यानंतर आपण समोर आलो आहोत. हे जे झाले ते चुकीचे झाले असे कोणालाही वाटत नाही, असे समितीस वाटते. विभागाने ऑगस्ट २०१० पर्यंत कुठलीही हालचाल केलेली नाही. ज्या अधिकाऱ्याने कोणत्याही प्रकारची कार्यवाही केली नाही त्याच्यावर कारवाई करावी लागेल. तसेच त्यावेळी जे अधिकारी होते त्यांना आणि आता जे अधिकारी आहेत त्यांची एकत्रित चौकशी करुन नंतर जबाबदारी निश्चित करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

**३.२२** विभागाने दिलेल्या माहितीवरुन समितीचे समाधान झाले नसल्यामुळे समितीने विभागीय सचिवांना पुन्हा दिनांक २८ सप्टेंबर, २०१० रोजी साक्षीकरीता बोलाविले असता, विभागीय सचिवांनी अनर्जित उत्पन्नाच्या रक्कमेसंदर्भात खुलासा करताना सांगितले की, मे.मॉडर्न फुड इंडस्ट्रीज (इंडिया) लि.व मे.मॉडर्न फुड न्युट्रीशिअन इंडस्ट्रीज लि. या दोन कंपन्यांचे विलीनीकरण मे.हिंदुस्थान युनिलिव्हर या कंपनीबरोबर करण्यास दिल्ली उच्च न्यायालयाने दिनांक १५-०१-२००७ च्या आदेशानुसार मंजूरी दिलेली आहे. शासनाची जी जमीन आहे, ती मे.हिंदुस्थान युनिलिव्हर कंपनीकडे वर्ग झालेली आहे. त्यामध्ये अनर्जित उत्पन्नाची रक्कम वसूल करण्याबाबतचा हा मुद्दा आहे. यासंदर्भात २७ कोटी रुपयांचे व्याज आणि चार वर्षाचे १२ कोटी २१ लाख रुपयांच्या व्याजाच्या संबंधात कंपनीला दिनांक १६ सप्टेंबर, २०१० रोजी सूचना पाठविण्यात आलेली आहे. परंतु कंपनीला इतकी वर्षे याबाबतीत सूचना का देण्यात आली नाही ? आता संबंधित कंपनीला सूचना दिली हे मान्य आहे. पण जेव्हा व्यवहार झाला, तेव्हापासून आतापर्यंत सूचना का पाठविण्यात आली नाही ? ती मोठी कंपनी आहे म्हणून त्याकडे लक्ष देण्यात आले नाही काय ? अशी विचारणा समितीने केली असता यापूर्वी संबंधित कंपनीला सूचना पाठविली केली नाही ही वस्तुस्थिती आहे हे विभागीय सचिवांनी मान्य केले.

**३.२३** सदरहू कंपनीकडून वसूल करावयाची रक्कम किती आहे ? अशी विचारणा समितीने केली असता मे.हिदुस्थान युनिलिव्हर या कंपनीकडून अनर्जित उत्पन्नाची रक्कम २७,२५,६०,५९६/-रुपये आणि ४ वर्षाच्या व्याजाची १२ कोटी २१ लाख रुपये इतकी रक्कम वसूल करावयाची आहे. या अनुषंगाने सदरहू कंपनी मा.न्यायालयामध्ये गेली आहे काय ? व कंपनीला दिनांक १६ सप्टेंबर रोजी सूचना पाठविल्यानंतर

त्यांच्याकडून काही उत्तर आलेले आहे काय ? यावर विभागाने कंपनी मा.न्यायालयात गेली नाही व कंपनीला उत्तर पाठविण्यासाठी १५ दिवसांचा कालावधी देण्यात आलेला आहे. यामध्ये अनियमितता झाली हे विभाग मान्य करते का ? असे समितीने विचारले असता मे. हिंदुस्थान युनिलिव्हर या कंपनीवर तातडीने कारवाई होणे व रक्कम वसुलीची सूचना बजावणे आवश्यक होते ती बजावली गेली नाही, अशाप्रकारची अनियमीतता सन २००७ मध्ये झालेली होती. परंतु, आता व्याजासह रक्कम वसुलीची सूचना बजावण्यात आलेली आहे. असा खुलासा विभागीय सचिवांनी केला. त्यावेळी ज्या प्रकरणात मोठ्या प्रमाणात अनियमीतता झाली आहे अशा प्रकरणांच्या बाबतीत जबाबदार असलेल्यांवर काय कारवाई प्रस्तावित करण्यात आली व याबाबतीतील जबाबदारी निश्चित केली जाईल ? विभाग अशाप्रकारची कारवाई कधी करणार आहे ?

**३.२४** लाभार्थींना शासनाची परवानगी घेतल्याशिवाय वाटप केलेल्या जमीनींची विल्हेवाट लावता येत नाही. शासनाच्या पूर्व परवानगीशिवाय विनापरवाना हस्तांतरण / वापरात बदल केल्यास अनर्जित उत्पन्न घेण्याची जमीन प्रदान करारनाम्याच्या अट क्र. ६ मध्ये आहे असे सांगितले होते. या कंपन्यांनी शासनाच्या परवानगी शिवाय असे व्यवहार केले ही अनियमीतता आहे. शिवाय, रक्कम वसूल करण्यासाठी सूचना पाठविणे आवश्यक होते तेही केले नाही. परंतु, आता २७ कोटी रुपये अनियमितते पोटी, अधिक व्याजाची रक्कम १२ कोटी अशा एकूण ३९ कोटी रुपयांच्या वसुलीबाबतची सूचना पाठविण्यात आलेली आहे.

**३.२५** जर या रकमेची वसुली झाली नाही तर विभाग काय कारवाई करणार आहे ? असे विभागास विचारले असता मा.उच्च न्यायालयाच्या सन २००७ च्या आदेशान्वये हे विलीनीकरण झालेले असल्याने मा.उच्च न्यायालयाच्या निदर्शनास ही गोष्ट आणून देता येईल. तसेच जमीन शासनाची आहे व शासनाच्या परवानगीशिवाय हा व्यवहार झाल्याने शासन ही जमीन परत घेऊ शकते. असे विभागीय सचिवांनी सांगितले. परंतु जर मा.न्यायालयामध्ये प्रकरण गेले तर वेळ लागू शकतो. यावर मा.उच्च न्यायालयाने कंपनी अधिनियमाप्रमाणे या विलीनीकरणास मान्यता दिली आहे. सामान्यतः जमीन कोणाची आहे, त्याबाबतच्या व्यवहारांना परवानगी घेतली आहे की नाही या तपशिलात न्यायालय जात नाही. अशी माहिती विभागीय सचिवांनी दिली.

**३.२६** परंतु याबाबतीत न्यायालयामध्ये जाण्याची गरजच काय ? जर संबंधित कंपनीने वसुली केली नाही तर विभागाने जप्ती केली पाहिजे कंपनीने कायद्याचे उल्लंघन केलेले आहे याकरिता शासनाने न्यायालयामध्ये जाण्याची गरज नाही कारण, एकदा न्यायालयात जावयाचे ठरविले की, त्याचा निर्णय होईपर्यंत वाट पहावी लागेल. मालमत्ता आपली असताना जप्ती का नाही आणत? विभाग कठोर पावले का नाही उचलत ? असे समितीने मत व्यक्त केले असता ती जमीन अजूनही शासनाच्या नावावर आहे, कंपनीच्या नावावर झालेली नाही. त्याबाबतच्या रक्कम वसुलीबाबत सूचना पाठविली असून त्यासाठी त्यांना नियमाप्रमाणे मुदत

दिली आहे. त्यानंतरही वसुली झाली नाही तर, शासन आपली जमीन परत घेऊ शकते. असे विभागीय सचिवांनी सांगितले.

**२) <u>मे. हॉटेल सेंटॉर यांनी हस्तांतरित केलेल्या जमिनीबाबत.</u>**

**३.२७** मे.हॉटेल सेंटॉर यांनी हस्तांतरित केलेल्या जमिनीबाबत थोडक्यात माहिती देण्यास विभागीय सचिवांना सांगितले असता अंधेरी मुंबई येथील १८१० चौ.मी.जमीन श्री किकाभाई प्रेमचंद ट्रस्टला १९४१ साली ५० वर्षाच्या भाडेपट्टयाने खुली व बगीचा या प्रयोजनासाठी मंजूर केली होती. त्यानंतर शासन पत्र दिनांक १५.१.१९७१ अन्वये सदर जागा पूर्वीच्याच प्रयोजनासाठी वापरण्याच्या अटीवर मे.एअर इंडियाला हस्तांतर करण्याची परवानगी दिली. शासनाने पुन्हा ज्ञापन दिनांक २५.९.१९७२ अन्वये सदरची जमीन एअर इंडियाकडून मे.हॉटेल कॉर्पोरेशन ऑफ इंडिया यांना दिनांक १५.१.१९७१ च्या पत्रातील पूर्वीच्याच अटी व शर्तींना अधीन राहून हस्तांतरणास परवानगी दिलेली आहे. शासन ज्ञापन दिनांक २७.१०.१९८३ अन्वये हॉटेल कॉर्पोरेशन ऑफ इंडियाकडे हस्तांतरित झालेल्या जमिनीच्या भाडेपट्टयांच्या अटी व शर्ती निश्चित केल्या असून भाडेपट्टा सन १९९० पर्यंत राहणार असून पुन्हा भाडेपट्टयाचा कालावधी ५० वर्षाने वाढविण्याची तरतूद होती. सदर जमिनीच्या भाडेपट्टयाची मुदत ऑगस्ट १९९० रोजी संपलेली आहे व जागेचा वापर हॉटेल कॉर्पोरेशन ऑफ इंडिया करीत असल्याने शासनाच्या आदेशाच्या अधीन राहून तात्पुरत्या दराने भाडेपट्टयाची आकारणी करून भाडेपट्टेदारास भाडेपट्टा भरण्यास जिल्हाधिकारी कार्यालयाने दिनांक २२.१०.१९९३ रोजी आदेश पारित केले होते. सदरच्या आदेशास मे.हॉटेल कॉर्पोरेशन यांनी हरकत घेतली. या शासकीय जागेच्या भाडेपट्टयाच्या नूतनीकरण संदर्भात भाडेपट्टेधारकास सुनावणी देऊन भाडेपट्टा नूतनीकरणाची कार्यवाही सुरू असताना जिल्हाधिकारी कार्यालयाच्या असे निदर्शनास आले की, हॉटेल कॉर्पोरेशन ऑफ इंडिया यांनी त्यांच्या खाजगी जागेसह त्यांच्याकडे असलेली भाडेपट्टयाची शासकीय जागा शासनाची पूर्वपरवानगी न घेता टुलीप हॉस्पिटॅलिटी सर्व्हीसेस यांना दिनांक ११.३.२००२ च्या करारान्वये विकली आहे. हॉटेल कॉर्पोरेशन ऑफ इंडिया यांनी केलेल्या बेकायदेशीर व्यवहारापोटी ७५ टक्के अनर्जित रक्कम भरण्याबाबत जिल्हाधिकारी यांनी आदेश पारित केले आहे. अशी माहिती विभागीय सचिवांनी समितीस दिली.

**३.२८** २०० ते ३०० कोटी रूपये किंमतीच्या जागेची विक्री होते. त्यावेळी विभागाकडून जागेची किंमत कशी ठरविण्यात येते ? विभागाने चार कोटीचा हिशोब कसा केला आहे ? जर सिद्धगणकानुसार किंमत असेल तर बाजार भावाप्रमाणे किंमत मिळाली पाहिजे. ३० ते ४० टक्के जागा खाजगी असली तरी उर्वरित जागा शासकीय आहे. ती कोणत्या किंमतीमध्ये दिलेली आहे ? ती रक्कम कशी काढण्यात आली आहे ? ह्यावर सदर रक्कम बाजार भावाप्रमाणे काढण्यात आली आहे, असे समितीस सांगण्यात आले.

**३.२९** बाजार भावाप्रमाणे एक हजार कोटी रूपयाला जागा विकली असेल तर शासन ५० कोटी रूपये घेणार काय ? परंतु विभागीय सचिवांनी याबाबत पुन्हा अभ्यास करुन समितीस माहिती देण्यात येईल असे आश्वासन दिले.

**३.३०** जी जमीन दिली त्यावर कुठेही बांधकाम करावयाचे नव्हते ती रिकामी ठेवावयाची होती. या जमिनीची सिद्धगणकाच्या दराप्रमाणे ४ कोटी रुपये किंमत काढली आहे. अशी माहिती विभागाने दिली असता एकूण जमीन किती आहे व त्यापैकी हॉटेल जवळ किती आहे तसेच हॉटेल कॉर्पोरेशन ऑफ इंडिया यांनी किती रक्कमेला निर्गुंतवणूक केली आहे व या जमीनीची किंमत कशी ठरविण्यात आली आहे ? यासर्व गोष्टी समितीसमोर याव्यात असे समितीने विभागीय सचिवांस सांगितले असता, यासंदर्भात We have got information regarding the sale. The total amount of sale was 153 crores, including land, building and business. अशी माहिती महालेखाकारांनी दिली.

**३.३१** हॉटेल कॉर्पोरेशन ऑफ इंडिया यांनी ही जमीन टूलीप कंपनीला विकली आहे व टूलीपने सदरहू जमीन हॉटेल सेंटॉर यांना विकली आहे. त्यामुळे ही जमीन शासनाच्या परवानगीने हस्तांतरित झालेली आहे काय. तसेच एकूण ही जमीन किती आहे असे समितीने विचारले असता, तिथे १८१० चौ.मी. जमीन आहे, अशी माहिती महालेखाकारांनी दिली.

**३.३२** ती सगळी १० एकर जमीन असली तरी त्यातील २० गुंठे जमीन आहे. १८१० चौ.मीटरसाठी पाच कोटी रुपये अंदाजे लावले आहेत. ते फायदेशीर आहे. तरी देखील हे सर्व पुन्हा तपशीलवार करण्याचे आश्वासन विभागीय सचिवांनी समितीस दिले. याबाबत अद्याप समितीस माहिती प्राप्त झालेली नाही.

**३.३३** समितीच्या बैठकीत हॉटेल सेंटॉर बाबत अधिक माहिती देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, हॉटेल कार्पोरेशन ऑफ इंडिया यांनी त्यांच्या खाजगी जागेसह त्यांच्याकडे असलेली भाडेपट्टयाची शासकीय जागा शासनाची पूर्वपरवानगी न घेता टुलीप हॉस्पिटॅलिटी सर्व्हीसेस यांना दि. ११-३-२००२ च्या करारान्वये विकली. या शर्त भंग प्रकरणी जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या सुनावणीच्या अनुषंगाने ७५ टक्के अनर्जित रक्कम ४,४८,०२,४५०/- रुपये वसूल करण्याबाबत शासनाने सूचना काढलेली आहे. तसेच, याबाबत माननीय महसूल मंत्री यांच्याकडे दिनांक २-२-२०१० रोजी सुनावणी झालेली असून या प्रकरणी निर्णय अपेक्षित आहे.

**३.३४** परंतु, ज्या ४,४८,०२,४५०/- रुपयांच्या वसुलीबाबत सूचना दिलेली आहे तसे न करता एकूण २३,३०० चौ.मी. अधिक १८०० चौ.मी. अशा एकूण २५,१०० चौ.मी. जमिनीची १५३ कोटी विक्री किंमत त्यावर वसुली केली पाहिजे. त्या जमीनीपैकी काही जमीन ही उद्यानासाठी आरक्षित आहे आणि सदर जमिन सागरी नियामक क्षेत्र याखाली बिगर विकसित क्षेत्र म्हणून येते आणि इतर भाग वाणिज्यिक वापराकरीता केलेला आहे. त्यामुळे त्याला एकच किंमत लावणे योग्य होणार नाही जर आपण एकूण २५,१०० चौ.मी. जमिनीवर वसूली

लावली तर १५३ कोटीवर ८ टक्के प्रमाणे १२ कोटी एवढी ती रक्कम येते अशी माहिती विभागीय सचिवांनी समितीस दिली.

**३.३५** सेंटॉर हॉटेल आता बांधण्यात आलेले नाही. ते जेव्हा बांधण्यात आले त्यावेळेस सागरी नियामक क्षेत्र नव्हते. तसेच, ते बांधताना उद्यान कुठे असावे हे ठरवून त्याच्यासाठी वेगळी जागा सोडली गेली होती. त्यामुळे ते सारे वगळता उरलेली जमीन शासनाची आहे व त्यावर दावा करायला पाहिजे असे समितीचे मत व्यक्त केले असता ज्या जागेचा वापर केवळ उद्यानासाठी करता येतो आणि जी बिगर विकास क्षेत्रामधील जागा आहे त्याबाबतीत शासन दावा कसा काय करु शकते ? असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले.

**३.३६** त्या व्यतिरिक्त असलेली जागा तरी शासनाच्या मालकीची आहे का ? यावर ती जागा खाजगी असून त्या जागेशी शासनाचा काही संबंध नाही. असे समितीस सांगितले असता, ती जागा खाजगी असली तरी शासनाने विकत घेतलेली आहे का ? असे समितीने विचारले असता ती जमीन आय.टी.डी.सी ने खाजगी व्यक्तीकडून घेतलेली आहे. अशी माहिती विभागाने दिली.

निदान शासनाची जेवढी जमीन आहे त्याबाबतीत तरी नियमाप्रमाणे कारवाई करावी असे आदेश समितीने विभागास दिले.

**3) मेसर्स प्रसन्ना मेटालिक्स, ठाणे यांनी हस्तांतरीत केलेल्या जमिनीबाबत :-**

**३.३७** मेसर्स प्रसन्ना मेटालिक्स, ठाणे यांनी हस्तांतरीत केलेल्या जमिनीबाबत महाराष्ट्र जमीन महसूल नियम पुस्तिका खंड-२ मधील परि.८४ मधील तरतुदीनुसार नवीन शर्तीवर धारण केलेल्या अकृषिक भूखंडाची विक्री परवानगी ५० टक्के अनर्जित उत्पन्न घेऊन देता येते. ही नियमातील तरतूद लेखा परिक्षण करताना महालेखापालांच्या निदर्शनास का आणण्यात आली नाही? याबाबत खुलासा करताना विभागीय सचिवांनी समितीस सांगितले की, मे. प्रसन्ना मेटालिक्स यांना ३०,७३३ चौ.मी. इतकी जमीन दिली होती. त्यापैकी १२,१३७.९३ चौ.मी. इतकी जमीन शासनाच्या परवानगीशिवाय मे.प्रसन्ना मेटालिक्सने विकलेली आहे. त्या जमिनीची रक्कम त्यांच्याकडून वसूल करणे आवश्यक होते असे लेखापरीक्षण परिच्छेदात म्हटले आहे. प्रत्यक्षात १०,४७०.६७ चौ.मी.इतक्या क्षेत्रास विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांनी ५० टक्के अनर्जित रक्कम शासन जमा करुन निवासी प्रयोजनाकरिता विक्री करण्यास परवानगी देण्यात आली आहे. ती रक्कम शासनाकडे जमा झालेली आहे. त्यावेळची विक्री किंमत २३ लाख रुपये होती. २३ लाख रुपयाची ५० टक्के रक्कम अंदाजे ११.७० लाख रुपये शासनाकडे जमा झालेले आहेत.

**३.३८** ही अनधिकृत विक्री नियमात बसविण्यासाठी अनर्जित उत्पन्नाच्या ७५ टक्के रक्कम शासनाला देणे आवश्यक होते असे महालेखाकारांचे म्हणणे आहे यावर महाराष्ट्र जमीन महसूल नियम पुस्तिका खंड -२ मधील परि.८४ मधील तरतुदीनुसार नवीन शर्तीवर धारण केलेल्या अकृषिक भूखंडाची विक्री परवानगी ५० टक्के अनर्जित उत्पन्न घेऊन देता येते. या संबंधात महालेखाकारांचे म्हणणे असे होते की, अनधिकृत

विक्री

झालेली आहे. तथापि ५० टक्के रक्कम भरुन, अधिकृतरित्या परवानगी घेऊन या जमिनीची विक्री झालेली आहे. शासनाची परवानगी असेल तर ५० टक्के अनर्जित रक्कम भरावी लागते. शासनाची परवानगी नसेल तर ७५ टक्के अनर्जित रक्कम भरावी लागते. असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले.

**३.३९** Had they taken permission before sale or after sale? असे समितीने विचारले असता, They had taken permission before sale. शासनाच्या परवानगीने विक्री झालेली आहे. 50 टक्के रक्कम भरली आहे ती भरली नाही असे महालेखाकरांचे म्हणणे नाही. तर ती रक्कम 75 टक्क्याप्रमाणे शासनाला देणे आवश्यक आहे असे महालेखाकारांचे म्हणणे आहे. असे विभागीय सचिवांनी सांगितले. महालेखाकारांनी Permission was taken for sale of one part of land but for sale of another part of land, permission was not taken. असे सांगितले असता, 10470.67 चौ.मी. क्षेत्राची विक्री शासनाची परवानगी घेऊन झालेली आहे आणि 1666 चौ.मी. क्षेत्राची विक्री परवानगी न घेता झालेली आहे. असे विभागीय सचिवांनी सांगितले.

**३.४०** There is another portion of land for which permission was not taken. The amount remaining to be paid is Rs. 25 lakhs. असे महालेखाकारांनी सांगितले असता १२,१३७.३७ इतक्या चौ.मी. जमिनीचा अनधिकृत व्यवहार झालेला नाही तर १०,४७०.६७ चौ.मी. इतक्या जमिनीचा व्यवहार शासनाच्या परवानगीने झालेला आहे. त्यानंतर १६६६ चौ.मी. इतकी जमीन अनधिकृतरित्या हस्तांतरीत झालेली आहे. मधुरा सिंग या व्यक्तीबरोबर अनधिकृत व्यवहार झालेला आहे. १६६६ चौ.मी. इतक्या जमिनीच्या अनधिकृत व्यवहाराची अनर्जित रक्कम वसूल करण्याची प्रक्रिया सुरु आहे असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

**३.४१** महालेखाकारांनी आक्षेप घेतला त्यावेळी महालेखाकरांना ही माहिती का देण्यात आली नाही तसेच १०४७०.६७ चौ.मी.इतकी जमीन शासनाच्या परवानगीने विकलेली आहे असे महालेखाकारांना का सांगितले नाही? ७५ टक्क्याप्रमाणे वसुली करण्याची आवश्यकता नाही हा निर्णय लागू होतो काय? यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, १६६६ चौ.मी. इतकी जमीन शासनाची परवानगी न घेता विकलेली आहे त्यासंबंधीची रक्कम येणे बाकी आहे. ७५ टक्क्याप्रमाणे वसुली व्हावयास पाहिजे होती असे महालेखाकरांचे म्हणणे आहे पण ती जमीन शासनाच्या परवानगीने विकलेली असल्यामुळे त्यांच्याकडून ५० टक्क्याप्रमाणे वसुली करण्यात आलेली आहे. असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

**३.४२** उर्वरित २५ लाख रुपये कधी वसूल करणार असे विभागास विचारले असता, उर्वरित रक्कम २५ लाख काढण्यात आली आहे ती १२,१३७.३७ चौ.मी. जमिनीचा एकंदर तफावत काढली असेल तर १०,४७०.६७ इतक्या चौ.मी. जागेची रीतसर विक्री झालेली आहे अशी माहिती विभागाने दिली.

**३.४३** उर्वरित रक्कम किती होती आणि ती कधी वसूल करणार असे समितीने विचारले असता, सदरहू रक्कम ही सिद्धगणकानुसार काढावी लागेल. असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले. परंतु हे प्रकरण २००० मधील आहे. यासंदर्भात आतापर्यंत रक्कम वसूल करण्याकरिता प्रयत्न कां करण्यात आले नाहीत? यावर अतरिक्त आयुक्त कोकण यांनी अपिल निकाली काढले असून त्यानंतर परत तपासणी करणे आवश्यक आहे. अशी माहिती विभागीय प्रतिनिधींनी दिली.

**३.४४** अपिल अंतिम झाले असेल तर वसुली कधी करणार यासंदर्भात विभागाने वसुलीची रक्कमेचा दर सिद्धगणकानुसार काढून वसुली संबंधीची माहिती समितीला देण्याचे व गेल्या दहा वर्षात रक्कम वसूल करण्याकरीता काय प्रयत्न केले तसेच शासनाच्या परवानगीने जमीन विकलेली नाही याबाबतीत संबंधितावर काय कारवाई करणार तसेच आतापर्यंत काय कारवाई केली याची माहिती समितीला देण्याचे आश्वासन विभागीय सचिवांनी दिले.

**३.४५** विभागीय सचिवांनी दिलेल्या आश्वासनानुसार मे. प्रसन्ना मेटालिक्स प्रा.लि. प्रकरणी १६६६ चौ.मी. जमीन अनधिकृतरित्या हस्तांतरित करण्यात आली आहे. त्या जमिनीची अनर्जित रक्कम किती येणे बाकी आहे व ती कधी वसूल करणार आहे, त्या संबंधीची माहिती समितीला देण्यासंदर्भात विभागीय प्रतिनिधींनी सांगितले, त्या जमिनीची सिद्धगणक किंमत काढली आहे. १६६६.०७ चौ.मी. एवढी ती जमीन आहे. सन २०१० मध्ये जमिनीचा दर प्रती चौ.मी. दर ६५०० इतका आहे. त्याप्रमाणे रु.१,०८,२९,४५५/- इतकी त्या जमिनीची किंमत होते. त्याच्या ७५ टक्के रु.८१,२२,०९१/- इतकी रक्कम भरण्याबाबत त्यांना जून, २००९ मध्ये सूचना दिली होती. परंतु, त्यांनी ती रक्कम न भरल्याने ती जमीन महाराष्ट्र शासनाने परत घेतली आहे.

**३.४६** आता जरी ती जमीन महाराष्ट्र शासनाने परत घेतली असली तरी त्यावर खरा ताबा कोणाचा आहे यासंदर्भात विचारणा केली असता, सदरहू जमीन नागरी जमीन कमाल धारणेची आहे. याबाबतीत जिल्हाधिकाऱ्यांना अशाही सूचना दिलेल्या आहेत की, शासनाने ही जमीन ज्यांना दिलेली आहे त्यांनी जर त्याचे पैसे भरले नाहीत तर शासन ती जमीन परतही घेऊ शकते अशी माहिती विभागीय सचिवांनी समितीस दिली. यासंदर्भात विभागाच्या सचिवांनी योग्य ती कार्यवाही करावी व समितीला कळवावे असे निदेश समितीने विभागास दिले.

**४) मेसर्स कल्याणी स्टील्स, पुणे यांनी हस्तांतरीत केलेल्या जमिनीबाबत :-**

**३.४७** मे.कल्याणी स्टील्स, पुणे या कंपनीसंबंधीचा खुलासा करण्याबाबत विभागीय सचिवांना सांगितले असता, यासंदर्भात विभागीय प्रतिनिधींनी खुलासा करताना असे सांगितले की, मे.भारत फोर्ज लि. या कंपनीला १९६४ साली जमीन दिली होती. मे. भारत फोर्ज लि. कंपनीने १९६४ साली मे.कल्याणी स्टील्स लि. पुणे या कंपनीला २५ एकर जमीन शासनाच्या परवानगीने दिली होती. १९९९ ला मे.कल्याणी स्टील्स लि. या कंपनीने मे. कल्याणी कारपेंटर्स स्पेशल स्टील या कंपनीला ही जमीन देण्यास परवानगी मागितली. शासनाने १९९९

मध्ये ज्ञापन काढून मान्यता दिली. त्यानंतर सहाय्यक संचालक, नगर रचना यांच्याकडून या जमिनीची किंमत ठरवून घेऊन त्याला शासनाची मान्यता घ्यावी आणि मे.भारत फोर्ज लि. कंपनीकडून भाडेपट्टा कराराच्या ९० टक्के रक्कम अधिमुल्य म्हणून वसूल करावा अशा दोन सूचना करण्यात आल्या होत्या. त्याप्रमाणे या जमिनीची किंमत ठरविण्याबाबत सहाय्यक संचालक,नगर रचना यांना कळविण्यात आले. सहाय्यक संचालक, नगर रचना यांनी जमिनीची मोजणी करुन घ्यावी व भाडेपट्टा कराराच्या ९० टक्के रक्कम भरण्यात यावी असे संगितले. कंपनीने पैसे भरलेले नाहीत आणि जमिनीची मोजणीही झालेली नाही. परंतु जमिनीच्या मुल्यांकनास आता शासनाच्या मान्यतेची आवश्यकता नसल्यामुळे भाडेपट्टयाच्या थकबाकीची रक्कम निश्चित केली आहे. तसेच व्याजाची रक्कम निश्चित केली असून मे.भारत फोर्ज लि.कंपनीकडून भाडेपट्टयाची ९० टक्के रक्कम ५ कोटी ७५ लाख रुपये इतकी होते.

**३.४८** मे.भारत फोर्ज लि. मे.कल्याणी कारपेंटर्स स्टील्स लि.कडून पैसे घेऊन शासनाकडे भरावयाचे होते काय? व मे.कल्याणी कारपेंटर्स स्पेशल स्टील्स लि.कंपनी ही मे.भारत फोर्ज लि. कंपनीचीच कंपनी आहे काय? असे समितीने विचारले असता, मे.भारत फोर्ज लि. कंपनीने शासनास भरावयाचे होते व सदरहू २ कंपन्या ह्या सिस्टर कंपनी आहे अशी माहिती विभागीय सचिवांनी दिली.

**३.४९** १९६४ साली दिलेली जमीन १९९९ साली हस्तांतरित करताना बाजार भावात प्रचंड प्रमाणात फरक होता. त्यामुळे ही रक्कम कमी आहे याबाबत समितीने विचारले असता, सचिवांनी खुलासा केला की, १९९९ ला सिद्धगणकाचा चौ.मी.चा दर २१७५ रुपये होता. त्याप्रमाणे त्या जमिनीचे मुल्यांकन २१ कोटी रुपये आलेले आहे. त्याच्या १३ टक्के प्रमाण २ कोटी ८२ लाख रुपये भाडेपट्टयाचे दर वर्षी वसूल करण्याचे नक्की झालेले आहे. मे.कल्याणी कारपेंटर्सला २५ एकर जमीन देण्यात आलेली आहे अशी माहिती विभागीय प्रतिनिधींनी समितीस दिली. परंतु १९९९ साला पासून आता पर्यंत कंपनीने जमिनीची मोजणी केलेली नाही आणि एकही पैसा देण्यात आलेला नाही. असे समितीने विभागाच्या निदर्शनास आणून दिले असता, त्यामुळे शासनास ३४ कोटी ६० लाख रुपये मे.कल्याणी कारपेंटर्स स्पेशल स्टील्स लि. कडून येणे बाकी आहेत. मे.कल्याणी कारपेंटर्स स्पेशल स्टील्स लि.कंपनीला ३४ कोटी ६० लाख रुपयाची नोटिस नुकतीच बजावली आहे.

**३.५०** या रकमेवर दंड आकारण्यात आला आहे काय? असे विचारले असता, दंडाची तरतूद नाही, व्याजाची रक्कम धरण्यात आलेली आहे असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले.

**३.५१** मे.कल्याणी कारपेंटर्स ही मोठी कंपनी आहे. नफ्यामध्ये चालणारी कंपनी आहे. त्या कंपनीकडे ३४ कोटी ६० लाख रुपये थकबाकी असताना पैसे वसूल करण्यासाठी ११ वर्षे काहीच प्रयत्न कां करण्यात आले नाही? यावर यासंदर्भात कंपनीने करार केल्यानंतर शासनाकडून पाठपुरावा व्हावयास पाहिजे होता तो झालेला नाही. असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले. समितीने हा परिच्छेद विचारात घेतला नसता तर

अजून दहा वर्षे काहीही झाले नसते तेव्हा यासंदर्भात जबाबदारी निश्चित करण्यात यावी. असे विभागास सांगितले असता विभागाने यासंदर्भात विभागाने लेखी दिलेल्या खुलाश्यात "संबंधितावर जबाबदारी निश्चित करुन शिस्तभंग कार्यवाहीचा अहवाल शासनास सादर करण्याचे जिल्हाधिकारी, पुणे यांना दिनांक १५/९/२०१० च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे, त्यानुसार संबंधितावर जबाबदारी निश्चित करुन त्यांच्या विरुध्द पुढील कारवाई जिल्हाधिकारी यांच्याकडून करण्यात येत आहे. तसेच मे.कल्याणी स्टील्स लि.या कंपनीस देण्यात आलेल्या जागेच्या अंतिम मुल्यांकनास मान्यता देण्याचा तसेच त्यानुसार होणारी भाडेपट्टयाची रक्कम कंपनीकडून वसुल करण्याचा प्रस्ताव शासन मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे". असे नमूद केले आहे.

**३.५२** २५ एकर जमीन मे. कल्याणी कारपेंटर्स स्पेशल स्टील्स लि. या कंपनीला देण्यात आलेली आहे. या जमिनीच्या विक्रीचा भाव काय लावण्यात आला? सिद्धगणकाप्रमाणे लावला की, बाजार भावाप्रमाणे लावला? सिद्धगणकापेक्षा बाजारभाव जास्त असेल तर त्यांच्याकडून जास्त भावाने पैसे घ्यावयास पाहिजेत. यावर १९९९ ला शासनाने परवानगी दिली. त्यानंतर १९९९ च्या मुल्यांकनाप्रमाणे त्यांनी पैसे द्यावयास पाहिजेत असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले.

**३.५३** १९९९ ला शासनाने परवानगी दिली असेल तर त्याकडे कंपनीने लक्ष देणे आवश्यक होते कारण की, शासनाची मालमत्ता आहे. मग कंपनीवर कशासाठी मर्जी करण्यात येत आहे? त्यांना आताच्या सिद्धगणकाप्रमाणे पैसे द्यावयास सांगावे असे निदेश समितीने शासनास दिले.

**३.५४** विभागीय सचिवांनी ६२ कोटी रुपयांचा तपशील महालेखाकार यांनी महसूल व वन विभागाला द्यावा, अशी विनंती महालेखाकारांना केली असता, महालेखाकारांनी it is the total value of transfer including the transfer of land, building, Machinery etc. to M/s Kalyani Carpenters Ltd. We have got this information on the basis of information supplied to us by the department असे सांगितले. परंतु या आकडेवारीचा उल्लेख लेखा परिक्षण अहवालामध्ये नाही. असे विभागाने सांगितले असता, We got this information from the department itself. This information was supplied to us long ago असे महालेखाकारांनी सांगितले.

**३.५५** ६२ कोटी रुपयांमध्ये यंत्रसामुग्रीचा समावेश असला तरी एकूण व्यवहारात जमीनीच्या भावाचे प्रमाण नेहमीच जास्त असते. महालेखाकार यांनी माहिती दिलेली आहे ती त्यांना लेखापरीक्षणातूनच मिळालेली आहे. जिल्हाधिकारी कार्यालयाकडे त्यामुळे ती माहिती निश्चितच उपलब्ध असावयास हवी तसेच या रकमेची वेगवेगळया भागात माहिती जिल्हाधिकारी कार्यालयाकडे असावयास हवे. ही माहिती देण्याबाबत विभागास सांगितले असता विभागीय प्रतिनिधींनी ६२ कोटी रुपयांचा जो व्यवहार झाला आहे तो या दोन कंपन्यांमध्ये झाला आहे. या कंपनीने शासनाची परवानगी घेऊन जमीन हस्तांतरणाचा व्यवहार केला आहे. मूळ कंपनीला

जमीन देत असतांना शासनाकडून ज्या अटी व शर्ती टाकण्यात आल्या होत्या त्यानुसारच आता हस्तांतरणाची परवानगी देण्यात आली आहे असे सांगितले.

**३.५६** मूळ कंपनीला भाडेपट्टयाने जमीन दिलेली आहे. त्यामुळे २५ एकर जमीन दुसऱ्या कंपनीला देत असतांना परिगणना कशाच्या आधारे केली आहे ? यावर २५ एकर जमीन दुसऱ्या कंपनीला हस्तांतरित केली असल्यामुळे सन १९९८-९९ पासून भाडेपट्टा आकारण्यात आला आहे. कंपनीने जर भाडेपट्टा यापूर्वीच भरला असेल तर कंपनी त्याप्रमाणे दावा करु शकेल असे विभागाने सांगितले. १० वर्षानंतर कंपनीला भाडेपट्टयाची आकारणी केली तर ही मोठी कंपनी असल्यामुळे न्यायालयात जाईल व स्थगिती आदेश मिळविल व न्यायालयीन प्रकरणात आणखी काही कालावधी जाईल. त्यामुळे आताच या प्रकरणी कार्यवाही झाली पाहिजे अशी समितीने विचारणा केली असता, विभागीय प्रतिनिधींनी शासनाच्या आदेशानुसारच भाडेपट्टयाची व व्याजाची आकारणी करण्यात आली आहे असे सांगितले.

**३.५७** संबंधित कंपनीने जमीन हस्तांतरणाची परवानगी शासनाकडे इतर कंपनीला विकल्यानंतर घेतली असती तर दुप्पट तिप्पट किंमत सरकारला मिळू शकली असती. दुसऱ्या कंपनीला जागा देतांना हेच दर राहणार आहेत का? कंपनीने ज्याअर्थी दुसऱ्या कंपनीला जमीन देण्यासाठी परवानगी मागितली आहे त्याअर्थी त्या कंपनीला जमिनीची आवश्यकता नाही. जर त्या कंपनीला जमिनीची आवश्यकता नाही तर बाजार भावने लिलाव पध्दतीने ही जमीन अन्य कंपनीला विकता आली असती. हा पर्याय शासनाने का स्वीकारला नाही? तसेच बाजार भावा नुसार शासनाला अधिकची रक्कम मिळू शकेल व जमिनीची मालकी शासनाची आहे. जर मूळ कंपनीला ही जमीन नको असेल तर शासन जो दर ठरवून देईल त्या दराने दुसऱ्या कंपनीला ही जमीन दिली पाहिजे किंवा लिलाव केला पाहिजे याबाबत माहिती देताना विभागीय प्रतिनिधींनी असे सांगितले की, ज्या कंपनीला पूर्वी जमीन देण्यात आली होती त्या कंपनीच्या सिस्टर कंपनीकडेच ही जमीन हस्तांतरित केलेली आहे. मूळ भाडेपट्टा करारामधील अटी व शर्तीप्रमाणे जमीन हस्तांतरित करतांना शासनाची परवानगी घेणे बंधनकारक आहे. ही परवानगी देत असतांना शासनाने सिद्धगणकाप्रमाणे दर ठरविलेला आहे.

**३.५८** मूळ जमीन शासनाची आहे. त्यामुळे ती कोणाला आणि किती किंमतीला द्यावी, याबाबतचा निर्णय घेण्याचा अधिकार शासनाला आहे. शासनाने ठरविले असते तर मिळालेल्या रकमेपेक्षा तीनपट जास्त रक्कम शासनाला मिळू शकली असती. भाडेकराराचा दर शासनाने ठरवून दिलेला आहे. परंतु, मुल्यांकन शासनाने दिलेले नाही यावर विभागाने खुलासा केला की, सन १९९९ मधील जमिनीचा दर निश्चित करुन त्याप्रमाणे सन १९९९ ते सन २०१० पर्यन्तच्या भाडेपट्टयाची रक्कम घ्यावयाची होती. सन १९९९ पासून भाडेपट्टयाची रक्कम थकित असल्यामुळे त्या त्या वेळच्या मुख्य कर्ज दराप्रमाणे थकित रकमेवर व्याज आकारणी करावयाची होती. त्यानुसार भाडेपट्टयाप्रित्यर्थ आणि १३ टक्के मुख्य कर्ज दराप्रमाणे व्याजासहीत अशी २ कोटी ८२ लाख रुपये आणि २१ कोटी रुपये आकारणी करण्यात आली आहे.

**३.५९** सदरची रक्कम संबंधित कंपनीने शासनाकडे भरणा केली आहे का ? व सदर रक्कम दंडासह वसूल करण्यात येणार आहे का? तसेच अशा प्रकरणांमध्ये ठरविण्यात आलेला दर कमी करण्याचा स्वेच्छाधिन अधिकार कोणाला आहेत ? यावर सदर रक्कम अद्याप शासनाला प्राप्त झालेली नाही. तथापि, जिल्हाधिकारी कार्यालयाने संबंधित कंपनीला सूचना बजावली आहे. रक्कम थकित असल्यामुळेच व्याज आकारणी करण्यात आली आहे व बाजारभावाप्रमाणे सिद्धगणकाचे दर ठरविण्यात येत असतात. यामध्ये तरतूद अशी आहे की, सिद्धगणकाप्रमाणे मुल्यांकन निश्चित केल्यानंतर जर त्यासंबंधी काही वाद असेल तर अभिनिर्णयासाठी आयुक्त स्टॅम्प्स यांच्याकडे दाद मागता येते. परंतु, अभिनिर्णयानंतरच दर कमी करता येतात अशी माहिती विभागीय सचिवांनी समितीस दिली.

**३.६०** या प्रकरणी प्रशासनाची देखील चूक झालेली आहे व कंपनीची देखील चूक झालेली आहे. कारण, एवढ्या वर्षात भाडेपट्टयाची थकित रक्कम व्याजासह वसूल करण्याबाबतची कार्यवाही प्रशासनाने केलेली नाही वा त्याबाबतचा कोणताही पाठपुरावा केलेला नाही. लोकलेखा समितीमध्ये हा मुद्दा उपस्थित झाल्यानंतर संबंधित कंपनीला सूचना देण्यात आलेली आहे. भाडेपट्टयांचा जो दर निश्चित करण्यात आलेला आहे तो सिद्धगणकाप्रमाणे असला तरी त्यापेक्षा अधिकची रक्कम शासनाला मिळाली असती. परंतु, त्याबाबतही विचार करण्यात आलेला नाही. याअर्थी प्रशासनाची चूक झाली आहे, असे मी म्हणालो. त्याचप्रमाणे संबंधित कंपनीची देखील ही जबाबदारी होती की, जमीन हस्तांतरणाला शासनाने परवानगी दिल्यानंतर लगेच कंपनीने भाडेपट्टयाची रक्कम शासनाकडे जमा करावयास हवी होती. परंतु, ती त्यांनी केलेली नसल्यामुळे कंपनीचीही चूक झाली आहे. अशा पध्दतीने जर कामकाज झाले तर आणखी ५० वर्षे रक्कम वसूल होणार नाही. जर लोकलेखा समितीने हा मुद्दा उपस्थित केला नसता तर कंपनीनेही रक्कम भरली नसती व प्रशासनाने वसुलीसाठी काही प्रयत्न केले नसते असे मत समितीने व्यक्त केले असता जिल्हाधिकारी यांनी सांगितल्याप्रमाणे थोडा उशीर झाला आहे. परंतु, व्याजाची आकारणी करण्यात आलेली आहे. खरे पाहता रक्कम शासनाकडे जमा करण्याची कंपनीचीही जबाबदारी आहे असे विभागीय सचिवांनी समितीस सांगितले.

**३.६१** जिल्हाधिकारी यांनी दिनांक १० ऑगस्ट, २०१० रोजी कंपनीला सूचना बजावली आहे. त्यापूर्वी कोणतीही कार्यवाही झालेली नाही. सन १९९९ पासून कंपनीने भाडेपट्टयाची रक्कम शासनाकडे जमा करणे आवश्यक होते. परंतू, जिल्हाधिकारी यांनी १० ऑगस्ट, २०१० रोजी कंपनीला सूचना दिलेली आहे. कायद्यानुसार जोपर्यंत शासनाकडून मागणी पत्र किंवा मागणी सूचना दिली जात नाही तोपर्यंत सदर रक्कम भरणे कंपनीवर बंधनकारक नाही यासंदर्भात समितीने विभागास विचारणा केली असता, शासनाने मागणी सूचना दिली पाहिजे, असे नाही. कंपनीची देखील ही जबाबदारी आहे की, त्यांनी नियमितपणे भाडेपट्टयाची रक्कम शासनाकडे जमा केली पाहिजे. शासनाच्या सन १९४९ च्या शासन निर्णयानुसार मोजणी करुन घेण्याची

जबाबदारी कंपनीची आहे. त्यामुळे कपंनीची देखील चूक झाली आहे असे विभागीय सचिवांनी समितीस सांगितले.

**३.६२** जर कंपनीने स्वत:हून रक्कम भरली नसेल तर प्रशासनाने कोणती कार्यवाही केली आहे ? एवढ्या कालावधीत कोणतीही कार्यवाही न करण्यास कोण जबाबदार आहे ? या सर्व काळात जिल्हाधिकारी म्हणून कोण अधिकारी कार्यरत होते ? कंपनीची जबाबदारी होती, असे म्हणून प्रशासन गप्प राहू शकते का ? त्यामुळे तत्कालीन सर्व अधिकाऱ्यांवर कारवाई झाली पाहिजे. यासंदर्भातील सर्व कार्यपध्दती समितीने समजावून घेतलेली आहे. तत्कालीन सर्व अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करण्यात यावी व त्याबाबतची माहिती समितीला सादर करण्यात यावी. प्रशासनाने २५ एकर जमिनीचे जे मुल्यांकन केलेले आहे, ते चुकीचे आहे. या कंपन्यांना शासनाने कृपादृष्टी दाखविण्याचे काहीही कारण नाही, या मोठमोठ्या कंपन्या आहेत व त्यांना करोडो रुपयांचा फायदा होत असतो. त्यामुळे जर कंपनीने स्वत:हून रक्कम भरली नसेल आणि प्रधान सचिव, महसूल व वन विभाग यांच्या म्हणण्यानुसार जर ही कपंनीची जबाबदारी असेल तर त्यांना सन १९९९ च्या सिद्धगणकाऐवजी सन २०१० च्या सिद्धगणकानुसार भाडेपट्टयाच्या रकमेची आकारणी करण्यात यावी. तसेच, थकित रकमेवर दंडनीय व्याजाची आकारणी करण्यात यावी असे निदेश समितीने विभागास दिले असता, विभागीय सचिवांनी सांगितले की, सन २०१० च्या सिद्धगणकाप्रमाणे भाडेपट्टयाची आकारणी केली तर दंडनीय व्याजाची आकारणी करता येणार नाही. "whichever is higher" याप्रमाणे आकारणी करण्यात यावी असे निदेश समितीने विभागास दिले असता, समितीने सुचविल्यानुसार तपासणी करुन घेण्यात येईल. प्रत्येकवर्षी सिद्धगणकाच्या दरामध्ये साधारणपणे १० टक्क्यांनी वाढ होत असते. मुख्य कर्ज दरानुसार १२ ते १३ टक्के दरवर्षी व्याज मिळू शकेल. त्यामुळे ही बाब विभागाकडून तपासून घेण्यात येईल असे आश्वासन विभागीय सचिवांनी समितीस दिले.

**३.६३** समितीला दिलेल्या आश्वासनानुसार समितीच्या बैठकीत विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले की, सदरहू कंपनीला पैसे भरण्याबाबत निदेश दिलेले होते. या निदेशानंतर त्यांनी दिनांक १५ ऑगस्ट, २०१० रोजी याकरिता एक महिन्याची मुदत मागितली आहे. त्यांचे असे म्हणणे होते की, जी बाकी आहे त्याची त्यांना तपासणी करावयाची होती. त्याच्यानंतर त्यांनी दिनांक २३ सप्टेंबर, २०१० रोजी, शासनाने भाडेपट्टीचे जे काही दर ठरवून परिगणना केली आहे ते दर जास्त असल्याने त्याच्यामध्ये बदल करण्याबाबत त्यांचे पर्सनल हिअरिंग (वैयक्तिक सुनावणी) घेण्याबाबत विभागाकडे विनंती केली आहे. आम्ही शासनाच्या आदेशाप्रमाणे हे परिगणना केली आहे व त्यामध्ये बदल करण्याचे अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना नाहीत. मात्र, नैसर्गिक न्यायाप्रमाणे त्यांचे म्हणणे आम्हाला ऐकावे लागेल. त्यांचे मुद्दे विचारात घेऊन पुन्हा वसुली निर्णय करण्याबाबत शासनस्तरावरुन निर्णय घेतला जाईल अशी माहिती दिली.

**३.६४** ज्या वेळी जमिनीचा व्यवहार झाला त्यावेळेस जमिनीच्या विक्रीचा भाव किती होता ? या समितीने विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर देताना विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, सन १९९९ मध्ये जेव्हा हा व्यवहार झाला तेव्हा जमिनीचा दर प्रति चौरस मीटरला २१४५ इतका होता. त्याप्रमाणे जमिनीची एकूण किंमत १२१ कोटी रुपये इतकी होती. मौजे मुंढवा, ता. पुणे शहर येथील स.नं. ७२ ते ७६/२ मधील ११३ एकर ३८.५ गुंठे जमीन मे. भारत फोर्ज लि. या कंपनीला औद्योगिक प्रयोजनासाठी शासनाने मंजूर केली होती. सदर जागेपैकी २५ एकर जमीन मे. कल्याणी स्टील्स लि. पुणे या कंपनीला सन १९७३ पासून ९८ वर्षांच्या कालावधीकरिता काही अटी/ शर्तीवर भाडेपट्टयाने देण्यास मान्यता देण्यात आलेली होती. परंतु, मे. भारत फोर्ज लि.या कंपनीने मे. कल्याणी स्टील्स लि. यांच्या नावाने असलेला भाडेपट्टयाचा करार मे. कल्याणी कारपेंटर्स स्पेशल स्टील या कपंनीच्या नावे उर्वरित कालावधीसाठी हस्तांतरित करण्याबाबत विनंती केली होती. त्यानुसार सदर भाडेपट्टा रद्द करून तो नेहमीच्या अटी / शर्तीवर मे. कल्याणी कारपेंटर्स स्पेशल स्टील लि. या कंपनीला हस्तांतर करण्यास सन १९९९ मध्ये शासन मान्यता देण्यात आली आहे.

**३.६५** सन १९९९ मध्ये जेव्हा हा व्यवहार झाला तेव्हा सदरहू जमिनीची बाजारभावानुसार किंमत किती होती व कंपनीने किती रक्कम द्यावयाची हे कंपनीला कळविले होते का ? यावर सदरहू जमिनीच्या भाडेपट्टीची रक्कम ठरवून कंपनीला कळवावयाची होती असे विभागाने समितीस सांगितले.

**३.६६** सन १९९९ मध्ये झालेल्या या व्यवहाराबाबतचे नेमके धोरण काय होते ? अशी विचारणा विभागास केली असता, सदर जमिनीची चालू बाजारभावाने होणारी किंमत सहायक संचालक, नगर रचना, पुणे यांच्याकडून निर्धारित करून घ्यावी व त्यास शासनाची मान्यता घेण्यात यावी. तसेच, सदर किंमतीवर शासनाच्या प्रचलित धोरणानुसार भाडेपट्टयाची रक्कम निश्चित करावी व त्या रकमेच्या ९० टक्के रक्कम अधिमुल्य म्हणून मे. भारत फोर्ज लिमिटेड यां कंपनीकडून वसूल करण्यात यावी असे आदेश होते. परंतु, नंतर सहायक संचालक नगर रचना यांच्याकडून सदरहू जमिनीची बाजार भावानुसार किंमत ठरविण्यात आली नाही परंतु विभागाने याबाबत कळवूनही ती किंमत ठरवून देण्यात आली नाही का ? असे समितीने विचारले असता, शासनाने भाडेपट्टी ठरवून देणे जसे आवश्यक होते. त्याचप्रमाणे संबंधित कंपन्यांनीही जमिनीची मोजणी करून घेणे ही त्यांची जबाबदारी होती अशी माहिती विभागीय सचिवांनी समितीस दिली.

**३.६७** संबंधित कंपन्यांनी मोजणी करून घेतली नाही तरी देखील हा व्यवहार झाला कसा ? त्यावर तहसीलदाराच्या स्वाक्षऱ्या आहेत. ज्या वेळेस हा व्यवहार झाला त्यावेळेस शासनाचे प्रतिनिधी कोण होते ? यावर शासनाच्या आदेशाप्रमाणे भाडेपट्टी ठरवून द्यायची होती, ती त्यावेळेस ठरवून दिली नव्हती. त्यामुळे आता त्या त्या वर्षाची भाडेपट्टी अधिक व्याज अशाप्रकारे परिगणना करून त्यांना ३४ कोटी रुपये भरण्यास सांगण्यात आले आहे. तहसीलदार हे त्यावेळेस शासनाचे प्रतिनिधी होते. हा निर्णय मंत्री पातळीवर झाला किंवा विभागीय आयुक्तांच्या पातळीवर झाला. परंतु, शेवटी कोणावर तरी याबाबतीत जबाबदारी निश्चित होईलच. ज्याने हे काम केले तो हुशार होता. त्याने वरच्या अधिकाऱ्यांपर्यंत गोष्ट येऊ न देता हा व्यवहार केला असे

मत समितीने व्यक्त केले. सदरहू जमीन कंपनीच्या नावे झालेली आहे काय? असे समितीने विचारले असता, ७/१२ या उताऱ्यावर मेसर्स कल्याणी स्टील्स, पुणे यांचे नाव आहे अशी माहिती समितीस दिली.

**३.६८** कंपन्यांना दर मान्य झाले नाही तर त्या न्यायालयात जातात आणि एकदा प्रकरण न्यायालयात गेले की, मग ते २५ वर्षे तसेच पडून रहाते. यावर ही बाब वसुलीची असल्यामुळे न्यायालयात जाण्याचा प्रश्न येत नाही. कंपनीला दर मान्य झाले नाही तर त्यांना शासनाकडे विचारणा करता येते. त्यासाठी न्यायालयात जाण्याचा प्रश्न येत नाही. शासन निर्णयाप्रमाणे परिगणना केलेली असल्यामुळे त्यांना ते योग्य वाटले नाही तर शासनाला विचारु शकतात. पूर्वी पासूनच्या शासन निर्णयामधील मूळ तरतुदीबद्दल काही हरकत असेल तर त्याबाबतीत कंपनीने अगोदरच विचारावयास पाहिजे होते. कंपनीने शासन निर्णयामधील मधील मूळ तरतुदीला हरकत घेतलेली नाही. कंपनीने नाकबूल केले नाही. परंतु शुल्क जास्त होत असल्यामुळे कंपनीचे म्हणणे एकून ते कमी करण्यात यावेत असे कंपनीचे म्हणणे आहे तसेच शासन आता दर बदलू शकत नाही. यासंदर्भात कंपनीचे म्हणणे ऐकून घेऊन नाकबूल करता येईल. अशी माहिती विभागीय प्रतिनिधींनी समितीस दिली. Ultimately the revenue of the Government will be affected. असे महालेखाकारांनी सांगितले असता, विभागीय प्रतिनिधींनी we will hear their say and decide the matter as expeditiously as possible असे सांगितले.

**५) मेसर्स एस.एम.डायकेम, पुणे यांनी हस्तांतरीत केलेल्या जमिनीबाबत :-**

**३.६९** मेसर्स एस.एम.डायकेम, पुणे या कपंनीकडे किती जमीन आहे ? यासंदर्भात माहिती देताना विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, मौजे, भरे, तालुका मुळशी, जिल्हा पुणे येथील गट नं. ४०६ मधील ४० हेक्टर २१ आर क्षेत्र डायकेम कंपनीला औद्योगिक प्रयोजनासाठी मंजूर करण्यात आले आहे. सन १९९२ मध्ये ५ हेक्टर ४९ आर एवढी जमीन एम.एस.इ.बी.साठी आणि सन २००१ मध्ये रस्त्यासाठी २ हेक्टर ४४ आर अशी मिळून ७ हेक्टर ९३ आर जमीन कंपनीकडून काढून घेण्यात आलेली आहे. सध्या कंपनीकडे ३१ एकर ८ आर एवढे क्षेत्र शिल्लक आहे. वनीकरणाखालील क्षेत्र १० एकर असल्यामुळे हे क्षेत्र कंपनीने परत देण्याची इच्छा व्यक्त केली आहे. सध्या ३१ हेक्टर जमीन कंपनी वापरु इच्छिते. कंपनीला सुरुवातीला जमीन दिली होती त्यावेळी १ लाख प्रति हेक्टर कब्जेहक्काची रक्कम घ्यावयाची होती. ४० लाख रुपये कंपनीकडून वसूल करण्यात आले होते. कंपनीला ही जमीन औद्योगिक प्रयोजनासाठी देण्यात आली होती. कंपनीला या जमिनीवर केमिकल फॅक्टरी काढावयाची होती. परंतु, केमिकल फॅक्टरीसाठी विरोधी झाल्यामुळे कंपनीने या ठिकाणी औद्योगिक वसाहत स्थापन करण्याची परवानगी शासनाकडे मागितली. शासनाने कन्व्हरजन ऑफ युजची परवानगी कंपनीला दिली. त्यामध्ये सदर जमिनीची कब्जेहक्काची अंतिम किंमत निश्चित करुन तात्पुरती किंमत व कब्जेहक्काची अंतिम किंमत यामधील फरकाची रक्कम व्याजासह वसूल करणेबाबतची अट घालण्यात आली होती. त्यानंतर कंपनीने ३० हेक्टर २१ आर इतक्या जमिनीचा धारणाधिकार वर्ग-२ मधून वर्ग-१ मध्ये रुपांतरित करण्याची विंनती शासनाला केली होती. जमिनीचा धारणाधिकार वर्ग-२ मधून वर्ग-१ मध्ये रुपांतरित

करण्याबाबतचा प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयाने शासनाला सादर केलेला आहे. तथापि, महसूल व वन विभागाने समितीला जी माहिती सादर केली आहे त्यामध्ये "त्यानंतर सदर कंपनीने ३० हेक्टर २१ आर इतक्या जमिनीचा धारणाधिकार वर्ग-२ मधून वर्ग-१ मध्ये रुपांतरित करण्याची विनंती केली होती. त्यास अनुसरुन शासनाने दिनांक ९-२-१९९९ च्या शासन ज्ञापनान्वये जमिनीचा धारणाधिकार वर्ग-२ मधून वर्ग-१ मध्ये रुपांतरित करण्यास मान्यता दिली आहे." असे नमूद करण्यात आले आहे. यासंदर्भात नेमकी वस्तुस्थिती विषद करण्यास सांगितले असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, विभागाकडून माहिती देत असतांना चुक झाली आहे. शासनाने जमिनीचा धारणाधिकार वर्ग-२ मधून वर्ग-१ मध्ये रुपांतरित करण्याबाबतच्या प्रस्तावास मान्यता दिलेली आहे.

**३.७०** मधल्या कालावधीत वनसंरक्षक, पुणे यांनी त्यांच्या दिनांक ७-८-२००९ च्या पत्रान्वये असे कळविले आहे की, सदर जमीन ही वन विभागाकडील १ मार्च, १८७९ मधील अधिसूचनेनुसार "राखीव वन" संवर्गातील असून त्यास वन संवर्धन अधिनियम १९८० मधील तरतुदी लागू होतात. त्यामुळे सदर जमीन वन विभागाच्या ताब्यात देण्यात यावी. सद्य:स्थितीत कंपनीकडे ३१ हेक्टर एवढे क्षेत्र असून ते रिकामे आहे.

**३.७१** ३१ हेक्टर जमिनीबाबत सविस्तर माहिती समितीला देण्यात यावी. त्या जमिनीचे मूल्यांकन ठरवून तारीखनिहाय माहिती देण्यात यावी. असे निदेश समितीने विभागास दिले. विभागाने यासंदर्भात पुढीप्रमाणे खुलासा केला.

**३.७२** मे.एस.एम.डायकेम, पुणे या कंपनीस भाडेपट्टयाने देण्यात आलेल्या मौजे. भरे, ता.मुळशी जि.पुणे येथील ग.नं. ४०६ मधील ४० हे २१ आर जमीनीबाबत वनसंरक्षक पुणे यांनी दिनांक ७/८/२००९ रोजी सादर केलेल्या अहवालावरुन सदर जमीन ही वन विभागाकडील दिनांक १ मार्च, १९७९ मधील अधिसुचनेनुसार "राखीव वन" संवर्गातील असून त्यास वन संवर्धन अधिनियम १९८० मधील तरतूदी लागू होतात. त्यामुळे सदर जमीन वन विभागाच्या ताब्यात देण्याची विनंती केली असून त्यास अनुसरुन सदर जमीन कंपनीकडून काढून घेऊन वन विभागाच्या ताब्यात देण्याची कार्यवाही करण्याकरीता, प्रस्ताव शासनास सादर करण्याची कार्यवाही सुरु आहे. सदर जमिनीची सद्य:स्थिती अशी आहे की, सदर जागेवर कंपनीचे अंदाजे ४५X३५ चौ.फूट क्षेत्रावर बांधकाम उभारलेले आहे. कंपनीकडून विषयांकित जागेचा मंजूर प्रोजनासाठी वापर होत नाही. सदर जागेची चालू बाजारभावानुसार एकूण रु.२१,३२,०८,४००/- इतकी किंमत होत आहे.

**३.७३** जर ही जमीन वन विभागाची होती तर ती कंपनीला कशी वितरित करण्यात आली ? तसेच महसूल यंत्रणेकडे जमीनीच्या सर्व नोंदी असतात या जमिनीची नोंद महसूल विभागाकडे नव्हती काय, यावर मागिल वर्षी वन विभागाने सदरहू जमिनीबाबत कळविले होते परंतु तत्पूर्वीच ही जमीन कंपनीला देण्यात आली होती. व महसूल विभागाच्या नोंदीनुसार ही जमीन 'सरकारी गायरान' या सदरी होती अशी माहिती विभागीय प्रतिनिधींनी समितीस दिली.

**३.७४** केंद्र शासनाने १८७९ साली गॅझेट प्रसिध्द केले आहे व त्यानुसार ही जमीन वनक्षेत्र म्हणून घोषित करण्यात आलेली आहे. मग याबाबतची नोंद महसूल यंत्रणेकडे कशी झाली नाही ? यावर विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, सन १८७९ मध्ये जेवढ्या वन जमिनी आहेत त्याबाबत हे गॅझेट प्रसिध्द करण्यात आले होते. सन १९०२ मध्ये विखुरलेल्या स्वरुपात ज्या वन जमिनी आहेत त्या सरकारकडे द्याव्यात, असा निर्णय झाला होता. त्यामुळे सन १९०२ मध्ये या जमिनी सरकारकडे आल्या. त्यामुळे त्यावेळी 'सरकारी फॉरेस्ट' अशाप्रकरची नोंद झाली व या जमिनी महसूल विभागाकडे वर्ग झाल्या. ज्यावेळी वन अधिनियमानुसार मंजूर झाला त्यावेळी या जमिनीचा मागणी वन विभागाकडे होऊ लागली. या प्रक्रियेप्रमाणे त्यांनी प्रस्तुत जमिनीची मागणी केली आहे.

**३.७५** शासनाने धारणाधिकार बदलून दिलेला आहे. जमीन कंपनीच्या ताब्यात आहे. तथापि, ज्या प्रयोजनासाठी जमीन घेण्यात आलेली आहे त्या प्रयोजनासाठी जमिनीचा वापर कंपनीने केलेला नाही यावर कंपनीने जमिनीचा वापर केलेला नसल्यामुळे ॲग्रिकल्चर ॲसेसमेंट दरवर्षी कंपनीकडून वसूल करण्यात येत आहे. वन विभागाने मागणी केल्यानुसार सदर जमीन वन विभागाकडे हस्तांतरित करावी किंवा जर ही जमीन कंपनीकडे ठेवावयाची असेल तर ही जमीन बिगर वन करण्याचा प्रस्ताव पाठविण्यात यावा, अशा प्रकारचे दोन प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयाने शासनाकडे पाठविलेले आहेत अशी माहिती विभागीय प्रतिनिधींनी दिली असता, या प्रस्तावांबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे ? असे विभागास विचारले असता, सदरहू प्रस्ताव विभागाची साक्ष होण्यापूर्वी आठ दिवस अगोदर शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात आला आहे असे विभागाने समितीस सांगितले.

**३.७६** म्हणजेच यावरुन असे दिसून येते की, लोकलेखा समितीने हा मुद्दा उपस्थित केल्यानंतर जिल्हाधिकारी कार्यालयाने शासनाकडे प्रस्ताव पाठविलेला आहे असे समितीने विभागाचे निदर्शनास आणून दिले व नाराजी व्यक्त केली.

**३.७७** The land was allotted by the Revenue and Forest Department on the condition that 65% will be charged out of the value of the land. A G.R. to this effect was issued. So, what was the difficulty in getting that amount? अशी विचारणा महालेखाकारांनी विभागाला केली तसेच शासन निर्णयाप्रमाणे ६५ टक्के रक्कम भरणे आवश्यक होती यावर विभागाने सरकारकडून या जागेचे मुल्यांकन करुन द्यावयास पाहिजे होते असे सांगितले परंतु समितीने यासंदर्भात असे निदर्शनास आणले की, जिल्हाधिकाऱ्यांच्या पातळीवर कार्यवाही होणे आवश्यक होती तसेच ६५ टक्के रक्कम भरावी असा शासन निर्णय काढण्यात आलेला आहे. त्यानुसार सदर कंपनीने ६५ टक्के रक्कम भरावयास पाहिजे होती. त्यासंदर्भातील कागदपत्रे आपण द्यावयास पाहिजे होती. आता ती जमीन पडिक आहे. त्यामुळे ती जमीन कोणत्याच कामात आलेली नाही. एकूण जमीन ८२ एकर आहे. या जमिनीतील १० ते १५ एकर जमीन एम.एस.ई.बी. व

रस्त्यांसाठी दिली असेल, बाकीची जमीन कोणताही मोबदला न देता कंपनी वापरीत आहे. यावर विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, ही जमीन वर्ग-एक मधून वर्ग-दोन मध्ये करण्याचा प्रश्न होता. त्यामुळे त्याचे मुल्यांकन झाले नाही व कंपनीने यापूर्वी ४० लाख रुपये शासनाकडे भरले आहेत. सदर रक्कम ही कंपनीला सिद्धगणकाप्रमाणे भरावयाची होती.

**३.७८** जमिनीचे मुल्य ठरविण्याचे अंतिम अधिकार कोणाचे आहेत ? त्यावेळेच्या बाजारभावाप्रमाणे कंपनीने शासनाकडे पैसे भरावयास पाहिजे होते. परंतु जिल्हाधिकारी यांनी त्या जमिनीचे मुल्यांकन का केले नाही त्या जमिनीवर अतिक्रमण झाले नाही काय, याबाबत खुलासा करताना विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, सदर रक्कम ही सिद्धगणकाप्रमाणे भरावयाची होती. दिनांक ९ फेब्रुवारी, १९९९ च्या शासन आदेशानुसार विशिष्ट अटीच्या अधीन राहून शासनाने मान्यता दिली आहे त्यानंतर सदर जमिन बाजार भावाने देण्याबाबत सहाय्यक संचालक, नगरपालिका प्रशासन, पुणे यांच्याकडून ती निर्धारित करुन शासनाच्या मान्यतेसाठी सादर करावयास पाहिजे होती. दिनांक ९ फेब्रुवारी, १९९९ च्या शासन निर्णयानुसार सदर जमिनीचे मुल्यांकन करुन दिनांक ६ ऑगस्ट, २००९ रोजी शासनाकडे पाठविण्यात आले आहे. सदरहू जमीनीचे मुल्यांकनासंदर्भातील प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर पत्रव्यवहार करण्यात आलेला आहे. त्यामुळे संबंधित प्रकरणाची प्रक्रिया चालू झाली आहे.

**३.७९** या संदर्भात शासनाकडे पाठ पुरावा करण्यात आलेला आहे काय ? त्यासंदर्भातील अभिलेख आहे काय ? मूल्यांकन करुन पाठविण्यासंदर्भात काय पाठपुरावा केलेला आहे अशी विचारणा समितीने केली असता, मूल्यांकन करुन पाठविण्यासाठी पाठपुरावा करण्यात आलेला आहे. माननीय महसूल मंत्र्यांमार्फत माननीय मुख्यमंत्री महोदयांकडे प्रकरण सादर करण्यात आले नाही. सदर प्रकरण फेर सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. अशी माहिती विभागीय प्रतिनिधींनी समितीस दिली.

**३.८०** वन खात्याने सदरहू जमीन ही राखीव वनामध्ये आहे असे जिल्हाधिकारी कार्यालयास सन २००९ मध्ये कळविले आहे.

**३.८१** सदरहू जमिनीची सद्यःस्थिती काय आहे? असे समितीने विचारले असता, सद्यःस्थिती मेसर्स एस.एम.डायकेम या कंपनीच्या नावावर जमीन देण्यात आलेली आहे. एकूण ४० हेक्टर २१ आर इतकी जमीन देण्यात आली होती. त्यापैकी कंपनीकडे ३१ हेक्टर ०८ आर इतकी जमीन असून १ हेक्टर २० आर इतकी जमीन एम.एस.आी.बी.कडे आहे तर ७ हेक्टर ९३ आर इतकी जमीन शासनाकडे परत घेतली आहे. या कंपनीला देण्यात आलेल्या जमिनीची भोगवटा किंमत ठरवून दिली होती. त्याप्रमाणे त्यांनी तात्पुरती किंमत रुपये ४० लाख भरले होते असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले.

**३.८२** कंपनीकडे असलेली जमीन वन विभागाची आहे असे आता निदर्शनास आले असल्यामुळे या कंपनीला ही जमीन देता येणार नाही. त्यांच्याकडून ही जमीन काढून घ्यावी लागेल. असे विभागाने समितीस

सांगितले असता, सदरहू जमीन कंपनीकडून काढून घेण्याची कारवाई केली काय? व त्यासंबंधीची माहिती समितीस देण्यात यावी असे निदेश विभागास समितीने दिले.

**६) मेसर्स आय.पी.सी.एल.(शासकीय कंपनी) रायगड**

**३.८३** मे.आय.पी.सी.एल. ही कंपनी सरकारी आहे, याबाबत महालेखाकार कार्यालयाचे जे आक्षेप होते त्याबाबत त्यांचे समाधान झालेले असले तरी हा मुद्दा काय होता त्याची माहिती देण्यात यावी असे विभागीय सचिवांना समितीने सांगितले असता, विभागीय सचिवांनी अनर्जित उत्पन्नाची आकारणी न करणे याबाबत मूळ परिच्छेद महसूल विभागाच्या संदर्भातील होता. ती जागा महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ ने संपादित केली होती. आय.पी.सी.एल. या कंपनीला महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ ने टप्प्या-टप्प्याने जागा संपादन करुन दिलेली आहे. आय.पी.सी.एल ही केंद्र शासनाची कंपनी आहे. केंद्र सरकारने रिलायन्स पेट्रो केमिकल्स या कपंनीला शेअर्स विकले आहेत. एक टक्के शेअर्स त्यांनी त्यांच्याकडे ठेवले होते. सुरुवातीला ९९ टक्के शेअर्स त्यांनी दिले होते एक टक्का शेअर्स त्यांच्याकडे ठेवले होते. आता एक टक्का शेअर्स सुध्दा त्यांच्याकडे नसतील. सुरुवातीला एक टक्का शेअर्स सरकारकडे होते. शेअर्स होल्डर नियमाप्रमाणे ते शेअर्स हस्तांतरीत करु शकतो. त्यामुळे काही बदल होत नाही. त्यानंतर रिलायन्स इंडस्ट्री व रिलायन्स पेट्रो केमिकल्स यांचे एकत्रिकरण झाले. एकत्रिकरणाच्या संदर्भातील निर्णय मा.उच्च न्यायालयात झाला आहे. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या नियमानुसार जी रक्कम भरावयास पाहिजे होती त्या रकमेचा भरणा त्यांनी केला आहे. १५ रुपये प्रती चौरस मीटर प्रमाणे त्यांनी रकमेचा भरणा केलेला आहे. याबाबत महालेखाकार यांच्याकडे उद्योग विभाग व महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने स्वतंत्रपणे उत्तर सादर केले आहे. ते महालेखाकार यांनी मान्य केले आहे असा खुलासा केला.

**३.८४** औद्योगिक वसाहती उभारण्याकरीता महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने जमीन संपादन करुन दिली आहे. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने काही जमिनी मोठ्या उद्योगांना दिल्या आहेत. जमीन संपादन करण्याचे नियम शासनाने केले आहेत. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे नियम वेगळे आहेत. ही जमीन जर शासनाने दिली असती तर त्यांना ५० टक्के रक्कम द्यावी लागली असती असे मत समितीने व्यक्त केले असता, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ अधिनियम वेगळा आहे. या अधिनियमातील तरतुदीनुसार औद्योगिक वसाहती उभारण्यासाठी व उद्योगांच्या वाढीसाठी जमीन संपादन करण्यात आली. शासनाने जमीन संपादन केल्यानंतर यातील काही जागांचे वाटप करण्याचे अधिकार महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ कडे आहेत ते अधिकार, नियम व मार्गदर्शक तत्वाप्रमाणे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ अधिनियमातील तरतूदीनुसार कार्यवाही करण्यात आलेली आहे. हस्तांतरीत करण्याचे वेगवेगळे प्रकार आहेत. आज मे.आय.पी.सी.एल. व रिलायन्स इंडस्ट्री यांच्या एकत्रिकरणानंतर मे. आय.पी.सी.एल. यांचे नांवे असलेला भाडेपट्टा महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ ने रिलायन्स इंडस्ट्री यांच्या नावे केला

आहे. या हस्तांतरणाला काही पार्श्वभूमी आहे. या हस्तांतरणासाठी काही वेगळे नियम लागू आहेत. यासाठी काही ठराविक रक्कम द्यावी लागते त्यानुसार १५ रुपये प्रति चौ.मी. प्रमाणे त्यांनी पैसा भरला आहे. आता तेथील दर २० रुपये चौ.मी. इतका आहे. अशी माहिती विभागीय सचिवांनी समितीस दिली.

**३.८५** मे.आय.पी.सी.एल. ही कंपनी हस्तांतरीत झाली आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता, विभागीय सचिवांनी सांगितले की, दोन उद्योगांचे एकत्रिकरण झाले आहे, परंतु हस्तांतरीत झाले की विलिनिकरण झाले ? कारण हस्तांतरीत वा विलिनिकरण हे निरनिराळ्या प्रकारे केले जाऊ शकतात.. यामध्ये आठ ते दहा वेगवेगळे प्रकार आहेत. कशा प्रकारे हे झाले आहे ? असे समितीने विचारले असता, विभागीय सचिवांनी सांगितले की, मे.आय.पी.सी.एल. ही कंपनी केंद्र सरकारची आहे. केंद्र सरकारने त्यांचे कडील शेअर्स रिलायन्स इंडस्ट्री या खाजगी कंपनीला विकले आहेत. रिलायन्स इंडस्ट्रीने ते खरेदी केले आहे. म्हणजे त्यांचे एकत्रिकरण झाले आहे. दोन्ही कंपनीचे एकत्रिकरण झाल्यामुळे मे.आय.पी.सी.एल. या कंपनीचे नाव राहणार नाही. त्या कंपनीचे नाव रिलायन्स इंडस्ट्री असे झाले आहे. तसेच दोन्ही कंपन्यांचे एकत्रिकरण करण्याची कार्यवाही ही नियमाप्रमाणे झालेली आहे. त्यांनी हस्तांतरण फी भरली आहे.

**३.८६** एखाद्या व्यक्तीला हस्तांतरण करतांना जो टॅक्स भरावा लागला असता तो या ठिकाणी या कंपन्यांना भरावा लागला नाही. त्यांनी सिस्टीमध्ये बसवून ही प्रक्रिया केलेली आहे. एखादी जमीन खरेदी करावयाची असेल तर त्यांना स्टॅम्पड्युटी व इतर टॅक्स भरावे लागतात. शासनाने जमीन संपादन करुन कंपनीला दिलेली आहे. ही कार्यवाही महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून झालेली आहे. ही कार्यवाही शासनाकडून झाली असती तर त्यांना ५० टक्के रक्कम भरावी लागती असतो. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ व शासन यामध्ये तफावत आहे. एकाच राज्यात दोन विभागात हा फरक आहे. ही तफावत असल्यामुळे शासनाचा महसूल वाढत नाही. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे धोरण वेगळे आहे. तर शासनाचे धोरण वेगळे आहे. त्या धोरणातील हा फरक आहे त्याचा फायदा तिसरा माणूस घेत आहे. शासन आणि महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ हे दोन्ही विभाग शासनाचेच आहेत. या ठिकाणी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे नियम लागू होतात. यामध्ये बदल करण्याची आवश्यकता आहे. असे मत समितीने व्यक्त केले.

**३.८७** महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या नियमाप्रमाणे हस्तांतरण करण्यात आले आहे. ती बाब बरोबर आहे. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ ही विधीमंडळात पारीत करण्यात आलेल्या कायद्यानुसार स्थापन करण्यात आली आहे. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे नियम हे उचित आहेत. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या नियमाप्रमाणे सरकारने उद्योग वाढीसाठी उचित नियम करावे. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे हस्तांतरण नियम आहेत ते लघु उद्योगांना सुध्दा लागू आहेत. अशी माहिती विभागीय सचिवांनी दिली. याबाबत राज्याने नवीन धोरण तयार करण्याची आवश्यकता आहे. उद्योग वाढण्यास

समितीचा विरोध नाही. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचा कायदा सन १९६०-६२ मध्ये आला असावा. त्या अगोदर पासूनच मुंबईत उद्योगधंदे सुरु आहेत. शासनाने जमीन संपादन करुन मुंबईतील गिरण्यांना दिलेली आहे. त्याचप्रमाणे इतर कारखाने मुंबईत आले आहेत. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचा कायदा व शासन यांच्यामध्ये जी तफावत आढळून येते ती दूर केली पाहिजे. यामध्ये बदल करण्याची आवश्यकता आहे असे समितीने विभागास सांगितले असता, विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, यासंदर्भात वेगवेगळी मते आहेत. मागील काळात १५ रुपये प्रती चौ.मी. प्रमाणे फी आकारण्यात आलेली आहे. हस्तांतरणाचे प्रकार वेगवेगळे आहेत त्यानुसार ते शुल्क आकारण्यात येते. ३०% अधिमुल्य आकारुन हस्तांतरण केले जाते.

**३.८८** Today, we have come across two cases pertaining to two different departments. The first case is of Modern Food Industries, which was a Central Govt. Company, it was taken over by another Company. त्या प्रकरणामध्ये आपण त्यांना पैसे द्यावयास लावले परंतु मे. आय.पी.सी.एल. आणि रिलायन्स इंडस्ट्री या प्रकरणात वेगळे धोरण अवलंबिण्यात आले. त्यामुळे या दोन्ही प्रकारात तफावत आहे. याबाबत विभागाने सांगितले की, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ हा शासनाचा एक अंगीकृत भाग आहे. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ आणि शासन यांच्या नियमामध्ये समानता असणे आवश्यक आहे.

**अभिप्राय व शिफारशी :**

**३.८९** सन २००४-२००५ या वर्षाच्या महालेखाकारांच्या लेखापरीक्षण अहवालातील परिच्छेद क्रमांक ४.४.१० मध्ये "अनर्जित उत्पन्न न/कमी आकारणी" असे नमूद केले असून त्यामध्ये (१) मे.मॉडर्न फूड इंडस्ट्रीज, (२) मे.हॉटेल सेंटॉर, (३) मे.प्रसन्ना मेटालिक्स, (४) मे.कल्याणी स्टील्स, (५) मे.एस.एम.डायकेम, (६) मे,आय.पी.सी.एल.या सहा कंपन्यांचा उल्लेख केलेला आहे. सदर सहा कंपन्यांनी शासनाचा मोठ्या प्रमाणात महसूल बुडविला आहे. समितीने याप्रकरणी विभागीय सचिवांची साक्ष घेवून पुढीलप्रमाणे अभिप्राय देवून शिफारशी केलेल्या आहेत.

**३.९०** मेसर्स मॉडर्न फूड इंडस्ट्रिज (इंडिया) लि.व.मेसर्स मॉडर्न फूड न्युट्रीशिअन इंडस्ट्रीज लि. या दोन कंपन्याचे विलिनीकरण मे.हिंदुस्थान युनिलिव्हर या कंपनीबरोबर करण्यास दिल्ली उच्च न्यायालयाने दिनांक १५/०१/२००७ च्या आदेशान्वये मंजूरी दिली आहे. मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार मे.मॉडर्न फूड इंडस्ट्रीजच्या सर्व मिळकती व त्यावरील हक्क मे.हिंदुस्थान युनिलिव्हर या कंपनीकडे गेले आहेत. मे हिंदुस्थान युनिलिव्हर लि. यांनी दिनांक २२/०३/२०१० च्या अर्जान्वये मेसर्स मॉडर्न फूड इंडस्ट्रिज लि. यांना प्रदान केलेली जमीन मे.हिंदुस्थान युनिलिव्हर लि. यांच्या नावे करण्याची विनंती जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांना केली आहे. त्या अनुषंगाने जमीन प्रदानाच्या करारातील अट क्रमांक ६ नुसार रु. २७,२५,६०,५९६/- इतकी

अनर्जित उत्पन्नाची रक्कम मे.हिंदुस्थान युनिलिव्हर यांचेकडून वसूल करुन त्यानंतर महसूल अभिलेखात मे.हिंदुस्थान युनिलिव्हर यांचे नाव दाखल करण्याबाबतचा प्रस्ताव जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांनी विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचेमार्फत ऑगस्ट महिन्यात शासनास सादर केला आहे. **सन २००७ पासून व्यवहार सुरू आहे. सन २००७ पासून ते ऑगस्ट २०१० पर्यंत म्हणजे पावणेचार वर्षे शासनाकडून कोणतीही दखल का घेण्यात आली नाही यासंदर्भातील माहिती समितीस तीन महिन्यात सादर करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे. सन २००७-२०१० या कालावधीत रु. २७,२५,६०,५९६/- एवढी रक्कम शासनाकडे भरणे आवश्यक होते. तथापि अद्याप सदरहू रकमेचा भरणा शासनाकडे केलेला नाही. अशा प्रकारे शासनाचा महसूल मोठ्या प्रमाणावर बुडविण्यात आला आहे. त्यामुळे अप्राप्त अनर्जित उत्पन्नाच्या रकमेवर नियमाप्रमाणे व्याज आकारुन वसुलीची कार्यवाही करावी तसेच जोपर्यंत मे.हिंदुस्थान युनिलिव्हर कंपनी शासनाकडे व्याजासहीत रकमेचा भरणा करत नाही तोपर्यंत जमीन कंपनीच्या नावावर करण्यात येऊ नये अशीही समिती शिफारस करीत आहे.**

**३.९१** मॉडर्न फूड इंडस्ट्रिज ही शासनाची आणि मेसर्स हिंदुस्थान युनिलिव्हर ही लिमिटेड कंपनी आहे. सदरहू दोन कंपन्या विलिनीकरणाची प्रक्रीया पूर्ण करीत असतांना शासनाने याबाबत कोणतेच आक्षेप घेतले नाहीत. ही शासनाची मालमत्ता होती. शासनाने त्या कंपनीला भाडेपट्टयाने जागा दिलेली आहे. शासनाच्या परवानगीशिवाय कंपन्यांचे विलिनीकरण करावयास नको होते. खरेतर या कंपनीला टाळे लावावयाला पाहिजे, तो शासनाचा हक्क आहे. शासनास अंधारात ठेवून करोडो रुपयांचे व्यवहार होत असतील तर ही बाब अतिशय गंभीर आहे. **या सर्व परिस्थितीस जे अधिकारी जबाबदार असतील त्यांची चौकशी करुन त्यात दोषी आढळून आल्यास त्यांच्याविरुध्द केलेल्या कारवाईची माहिती समितीस तीन महिन्यांत देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**३.९२** लाभार्थींना शासनाची परवानगी घेतल्याशिवाय वाटप केलेल्या जमीनींची विल्हेवाट लावता येत नाही. शासनाच्या पूर्व परवानगीशिवाय विनापरवाना हस्तांतरण / वापरात बदल केल्यास अनर्जित उत्पन्न घेण्याची जमीन प्रदान करारनाम्याच्या अट क्र. ६ मध्ये आहे असे सांगितले होते. या कंपन्यांनी शासनाच्या परवानगी शिवाय असे व्यवहार केले ही अनियमीतता आहे. शिवाय, रक्कम वसूल करण्यासाठी सूचना पाठविणे आवश्यक होते तेही केले नाही. परंतु, आता २७ कोटी रुपये अनियमितते पोटी, अधिक व्याजाची रक्कम १२ कोटी अशा एकूण ३९ कोटी रुपयांच्या वसुलीबाबतची सूचना पाठविण्यात आलेली आहे. तसेच जमीन शासनाची आहे व शासनाच्या परवानगीशिवाय हा व्यवहार झाला आहे. ती जमीन अजूनही शासनाच्या नावावर आहे. रक्कम वसूलीबाबत विभागाने दिलेल्या नोटीशीच्या मुदतीत शासनास रक्कम आली नाही तर शासन जमीन परत घेणार असल्याचे समितीला आश्वासित करण्यात आले होते. **त्यानुसार विभागाने संबंधित**

**कंपनीविरुध्द कोणती कारवाई केलेली आहे व त्यांची सद्य:स्थिती समितीला कळविण्यात यावी अशी समिती शिफारस करीत आहे.**

**३.९३** हॉटेल कार्पोरेशन ऑफ इंडिया यांनी त्यांच्या खाजगी जागेसह त्यांच्याकडे असलेली भाडेपट्टयाची शासकीय जागा शासनाची पूर्वपरवानगी न घेता टुलीप हॉस्पिटॅलिटी सर्व्हीसेस यांना दि. ११-३-२००२ च्या करारान्वये विकली. या शर्त भंग प्रकरणी जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या सुनावणीच्या अनुषंगाने ७५ टक्के अनर्जित रक्कम ४,४८,०२,४५०/- रुपये वसूल करण्याबाबत शासनाने सूचना काढलेली आहे. तसेच, याबाबत माननीय महसूल मंत्री यांच्याकडे दिनांक २-२-२०१० रोजी सुनावणी झालेली असून या प्रकरणी निर्णय अपेक्षित आहे. शर्तभंग प्रकरणी जिल्हाधिकारी कार्यालयाने हॉटेल सेंटॉर यांना पाठविलेली सूचनाही विभागाने पुन्हा मुल्यांकन करुन पाठवावी कारण विभागाने बाजार मुल्यांकनापेक्षा कमी अनर्जित रक्कम हॉटेल सेंटॉर यांना आकारलेली आहे त्यामुळे शासनाचे २०० ते ३०० कोटी रुपयांचे नुकसान झालेले आहे. **याबाबतची माहिती समितीला देण्यात यावी तसेच महसूल मंत्री महोदयांकडे याप्रकरणी दिनांक २/२/२०१० रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी घेण्यात आलेल्या निर्णयाची प्रत समितीस सादर करण्यात यावी अशी शिफारस समिती करीत आहे.**

**३.९४** मे.प्रसन्ना मेटालिक्स ठाणे यांनी हस्तांतरीत केलेल्या जमिनीसंदर्भात १२,१३७.३७ इतक्या चौ.मी. जमिनीचा अनधिकृत व्यवहार झालेला नाही तर १०,४७०.६७ चौ.मी. इतक्या जमिनीचा व्यवहार शासनाच्या परवानगीने झालेला आहे. त्यानंतर १६६६ चौ.मी. इतकी जमीन अनधिकृतरित्या हस्तांतर झालेली आहे. **मधुरा सिंग या व्यक्तीबरोबर अनधिकृत व्यवहार झालेला आहे. मुळातच येथे असा प्रश्न उद्‌भवतो की, १६६४ चौ.मी. एवढा भूखंड अनधिकृतरित्या हस्तांतरीतच कसा झाला. ही जमीन शासनाची पूर्वपरवानगी न घेता विकण्यात आली आहे. हे या सर्व व्यवहारांस जबाबदार असणाऱ्या तत्कालीन अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कार्यवाही केली याबाबतची माहिती समितीस तीन महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**३.९५** मे.कल्याणी कारपेंटर्सला २५ एकर जमीन देण्यात आलेली आहे परंतु १९९९ सालापासून आता पर्यंत कंपनीने जमिनीची मोजणी केलेली नाही आणि एकही पैसा देण्यात आलेला नाही. त्यामुळे शासनास ३४ कोटी ६० लाख रुपये मे.कल्याणी कारपेंटर्स स्पेशल स्टील्स लि. कडून येणे बाकी आहेत. मे.कल्याणी कारपेंटर्स स्पेशल स्टील्स लि.कंपनीला ३४ कोटी ६० लाख रुपयाची नोटिस नुकतीच बजावली आहे.

**३.९६** मे.कल्याणी कारपेंटर्स ही मोठी कंपनी आहे. नफ्यामध्ये चालणारी कंपनी आहे. त्या कंपनीकडे ३४ कोटी ६० लाख रुपये थकबाकी असताना पैसे वसूल करण्यासाठी ११ वर्षे काहीच प्रयत्न का करण्यात आले नाही? यावर यासंदर्भात कंपनीने करार केल्यानंतर शासनाकडून पाठपुरावा व्हावयास पाहिजे होता तो झालेला नाही. **समितीने हा परिच्छेद विचारात घेतला नसता तर अजून दहा वर्षे काहीही झाले नसते तेव्हा यासंदर्भात संबंधितांची योग्य ती चौकशी करण्यात यावी व चौकशीत दोषी आढळून आलेल्या संबंधित**

**अधिकारी/कर्मचाऱ्यांवर कडक कारवाई करण्यात यावी व केलेल्या कारवाईची माहिती समितीला तीन महिन्यांत देण्यात यावी अशी शिफारस समिती करीत आहे.**

**३.९७** सन १९९९ च्या बाजारभावाप्रमाणे मे.कल्याणी कारपेंटर्स स्पेशल स्टील लि.कंपनीकडून येणाऱ्या रकमेचे मुल्यांकन विभागाने केले असून सदर रक्कम कंपनीने शासनास अदा केलेली नाही. ही कंपनीची चूक होती. शिवाय शासनाच्या सन १९९९ च्या शासन निर्णयानुसार मोजणी करुन घेण्याची जबाबदारी कंपनीची होती त्यामुळे समिती **अशी शिफारस करीत आहे की, आजच्या बाजारभावाप्रमाणे मे.कल्याणी कारपेंटर्स स्पेशल स्टील लि.या कपंनीकडून रक्कम शासनाने वसुल करावी. याप्रकरणी केलेल्या कार्यवाहीची माहिती तीन महिन्यांत समितीला देण्यात यावी.**

**३.९८** सन १९९९ मध्ये झालेल्या या व्यवहाराबाबतचे नेमके धोरण असे होते की, सदर जमिनीची चालू बाजारभावाने होणारी किंमत सहायक संचालक, नगर रचना, पुणे यांच्याकडून निर्धारित करून घ्यावी व त्यास शासनाची मान्यता घेण्यात यावी. तसेच, सदर किंमतीवर शासनाच्या प्रचलित धोरणानुसार भाडेपट्टयाची रक्कम निश्चित करावी व त्या रकमेच्या ९० टक्के रक्कम अधिमुल्य म्हणून मे. भारत फोर्ज लिमिटेड यां कंपनीकडून वसूल करण्यात यावी असे आदेश होते. परंतु, नंतर सहायक संचालक नगर रचना यांच्याकडून सदरहू जमिनीची बाजार भावानुसार किंमत ठरविण्यात आली नाही परंतु विभागाने याबाबत कळवूनही ती किंमत ठरवून देण्यात आली नाही. शासनाने भाडेपट्टी ठरवून देणे जसे आवश्यक होते. त्याचप्रमाणे संबंधित कंपन्यांनीही जमिनीची मोजणी करून घेणे ही त्यांची जबाबदारी होती.

**३.९९** संबंधित कंपन्यांनी मोजणी करून घेतली नाही तरी देखील हा व्यवहार झाला आहे. त्यावर तहसीलदाराच्या स्वाक्षऱ्या आहेत. ज्या वेळेस हा व्यवहार झाला त्यावेळेस शासनाचे प्रतिनिधी म्हणून तहसीलदार उपस्थित होते. आता त्या त्या वर्षाची भाडेपट्टी अधिक व्याज अशाप्रकारे परिगणनाकरून त्यांना ३४ कोटी रुपये भरण्यास सांगण्यात आले आहे. सदर रक्कम कंपनीने शासनास न भरल्यास शासन कोणती कारवाई करणार आहे. तसेच ज्या तहसिलदाराने हा व्यवहार केला आहे त्यांच्या विरुध्द काय कारवाई करण्यात आली आहे. **तहसिलदारा व्यतिरिक्त अन्य अधिकारी तत्कालीन व आता जे जबाबदार आहेत त्यांची चौकशी करुन चौकशीत दोषी आढळून आलेल्यांविरुध्द तीन महिन्यांत कारवाई करुन माहिती समितीला देण्यात यावी अशी शिफारस समिती करीत आहेत.**

**३.१००** मेसर्स एस.एम.डायकेम, पुणे या कंपनीस ४० हेक्टर २१ आर.क्षेत्र औद्योगिक प्रयोजनासाठी मंजूर करण्यात आले होते. सन १९९२ मध्ये ५ हेक्टर ४९ आर एवढी जमीन एम.एस.इ.बी.साठी आणि सन २००१ मध्ये रस्त्यासाठी २ हेक्टर ४४ आर अशी मिळून ७ हेक्टर ९३ आर जमीन कंपनीकडून काढून घेण्यात आलेली आहे. सध्या कंपनीकडे ३१ एकर ८ आर एवढे क्षेत्र शिल्लक आहे. कंपनीला सुरुवातीला जमीन दिली होती त्यावेळी १ लाख प्रति हेक्टर कब्जेहक्काची रक्कम घ्यावयाची होती. ४० लाख रुपये कंपनीकडून वसूल करण्यात आले होते.

**३.१०१** जमीन कंपनीच्या ताब्यात आहे. तथापि, ज्या प्रयोजनासाठी जमीन घेण्यात आलेली आहे त्या प्रयोजनासाठी जमिनीचा वापर कंपनीने केलेला नाही यावर कंपनीने जमिनीचा वापर केलेला नसल्यामुळे ॲग्रिकल्चर ॲसेसमेंट दरवर्षी कंपनीकडून वसूल करण्यात येत आहे. वनसंरक्षक, पुणे यांनी त्यांच्या दिनांक ७-८-२००९ च्या पत्रान्वये असे कळविले आहे की, सदर जमीन ही वन विभागाकडील १ मार्च, १८७९ मधील अधिसूचनेनुसार "राखीव वन" संवर्गातील असून त्यास वन संवर्धन अधिनियम १९८० मधील तरतुदी लागू होतात. **त्यानुसार सदर जमीन वन विभागाची असल्याचे सिद्ध झाले आहे त्यामुळे मे.एस.एम.डायकेम, पुणे यांच्या ताब्यात असलेली जमीन काढून घेण्यात यावी व सदर जमीन वन विभागाच्या ताब्यात देण्यात यावी. तसेच या प्रकरणी विलंब करणाऱ्या अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करुन याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यात देण्यात यावी अशी समिती शिफारस करीत आहे.**

**३.१०२ वन विभागाने मागणी केल्यानुसार सदर जमीन वन विभागाकडे हस्तांतरित करावी किंवा जर ही जमीन कंपनीकडे ठेवावयाची असेल तर ही जमीन बिगर वन करण्यात यावी अशा प्रकारचे दोन प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयाने शासनाकडे पाठविलेले आहेत. सदर प्रस्तावावर केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस सादर करण्यात यावी अशी शिफारस समिती करीत आहे.**

**३.१०३ मे.आय.पी.सी.एल.या कंपनीच्या मे.रिलायन्स इंडस्ट्रिज लि. या कंपनीमध्ये झालेल्या एकत्रिकरणामध्ये जमीन हस्तांतरणाच्या वेळी शासनास स्टॅम्प ड्युटी व इतर कर या माध्यमातून महसूल मिळू शकला असता, परंतु या एकत्रिकरणाची कार्यवाही ही महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या माध्यमातून झालेली आहे. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ व महाराष्ट्र शासन यांचे जमीन हस्तांतरण याबाबत वेगवेगळे नियम आहेत. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ हे शासनाचा एक अंगीकृत भाग असल्याने जमीन हस्तांतरण याबाबत शासनाचे व महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे नियम समान करण्याच्या दृष्टीने शासनाने आवश्यक ती कार्यवाही करावी. या प्रकरणी केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यात देण्यात यावी अशी शिफारस समिती करीत आहे.**

# नगरविकास विभाग

## चुकीच्या शुद्धीपत्रकामुळे विकासकर्त्यास अहेतुक लाभ

**४.१** भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २००४-२००५ या वर्षाच्या महसुली जमा अहवालामधील परिच्छेद क्र. ४.४.१४ -"चुकीच्या शुद्धीपत्रकामुळे विकासकर्त्यास अहेतुक लाभ" या संदर्भात महालेखापरीक्षकांनी खालील अभिप्राय व्यक्त केले.

ऑगस्ट, १९८६ च्या शासन निर्णयाप्रमाणे, नागरी जमीन (कमाल मर्यादा व विनियमन) अधिनियमांतर्गत शिल्लक म्हणून घोषित केलेली जमीन, जर भुधारक समाजाच्या आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांसाठी घरे बांधत असेल तर त्याला संपादनापासून सूट असते. शिवाय ऑक्टोबर, १९९२ च्या शासन निर्णयाप्रमाणे भुधारकाला अशा बांधलेल्या गाळयांपैकी १० टक्के गाळे शासनाच्या नामनिर्देशित व्यक्तिला वाटप करण्यासाठी शासनाच्या मा.सर्वोच्च न्यायालयाकडे प्रलंबित असलेल्या अपीलावरील अंतिम निर्णयाच्या अधीन राहून प्रत्यार्पित करणे आवश्यक आहे.

बृहन्मुंबई नागरी क्षेत्रामध्ये असे आढळले की, ऑक्टोबर, १९८९ मध्ये नागरी जमीन (कमाल मर्यादा व विनियमन) अधिनियम, १९७६ अनुसार सूट मिळालेल्या व भुधारकाला समाजाच्या आर्थिक दृष्टीने दुर्बल घटकांसाठी गाळे बांधण्यासाठी हस्तांतरीत केलेल्या जमिनीसंबंधी, प्रकल्पाच्या विकासाचे काम एप्रिल, २००४ मध्ये पूर्ण झाले आणि प्रकल्पाचे बांधलेले एकूण क्षेत्रफळ २,६०,२५५.४५ चौ.मी. इतके होते. पण मंत्रिमंडळाच्या उपसमितीने मार्च, १९९६ मध्ये घेतलेल्या निर्णयावर आधारलेल्या व

सप्टेंबर, १९९६ मध्ये निर्गमित करण्यात आलेल्या शुद्धीपत्रकानुसार गाळे प्रत्यार्पित करण्याची शर्त वगळल्यामुळे, बांधलेल्या अशा गाळ्यांपैकी १० टक्के गाळे शासनाला प्रत्यार्पित केले गेले नव्हते. तथापि छाननीमध्ये असे निष्पन्न झाले की, उपसमितीने असा कुठलाही निर्णय घेतला नव्हता. परिणामी भुधारकाला १० टक्के गाळयांच्या बाबतीत बाजार भाव आणि शासकीय भाव यातील फरकाएवढा रु. १३.६९ कोटी अहेतुक लाभ झाला.

शासनाचे प्रधान सचिव, महसूल यांनी ऑगस्ट, २००५ मध्ये असे नमूद केले की, ही बाब नगर विकास विभागाशी संबंधीत आहे आणि त्या विभागाकडे योग्य कार्यवाहीसाठी पाठविली जाईल.

**<u>ज्ञापन :</u>**

**४.२** बृहन्मुंबई नागरी समुहातील जमिनधारक श्री.ए.डब्लू. परेरा यांच्या सर्व्हे क्रमांक १६३ कांदिवली येथील अतिरिक्त जमिनीस नागरी जमीन कमाल धारणा अधिनियमाच्या कलम २० अन्वये दिनांक

२० ऑक्टोबर, १९८९ च्या आदेशान्वये सूट देण्यात आली होती. सदर सूटीच्या आदेशातील अटीनुसार जमिनधारकाने १० टक्के सदनिका शासनाला पूर्व निर्धारीत दराने शासन नामनिर्देशित व्यक्तींना वितरीत करण्यासाठी प्रत्यार्पित करणे बंधनकारक होते.

तथापि शासनाच्या प्रचलित धोरणानुसार जमिनधारकाने शासनाला विनामूल्य द्यावयाच्या क्षेत्रापेक्षा अधिकचे क्षेत्र पूर्वीच शासनाला प्रत्यार्पित केले असल्यामुळे शासन देय असलेल्या १० टक्के सदनिका प्रत्यार्पित करण्याबाबतची अट शिथील करावी असा प्रस्ताव शासनाकडे प्राप्त झाला होता. सदर प्रस्तावावर विचार करुन जमिनधारकाने बांधिलकी पेक्षा अधिक जमिन म्हाडाला हस्तांतरीत केली असल्यामुळे प्रस्तुत सूटीच्या आदेशातून शासन देय सदनिका प्रत्यार्पित करण्यासंदर्भात अट शिथील करण्यात यावी, अशा आशयाचा प्रस्ताव विभागाने नागरी जमीन कमाल धारणा अधिनियमाच्या सुलभ अंमलबजावणीसाठी नियुक्त करण्यात आलेल्या मंत्रिमंडळ उप समितीच्या दिनांक १५ मार्च, १९९६ च्या बैठकीत विचारार्थ सादर केला होता. मंत्रिमंडळ उपसमितीसमोर सादर केलेला प्रस्ताव थोडक्यात पुढीलप्रमाणे होता :-

अ) उर्वरीत १४ एकर जमिन म्हाडास देण्याच्या बंधनातून विकासकास मुक्त करावे.

ब) विकासकाने त्यांच्या बांधीलकीपेक्षा जास्त क्षेत्र म्हाडाच्या ताब्यात दिले असल्यामुळे योजनेमध्ये बांधल्या जाणाऱ्या सदनिकांच्या १० टक्के सदनिका देण्याच्या अटीतून विकासकास मुक्त करावे.

क) सर्व्हे क्रमांक १६३ मधील एकूण जमिनीपैकी २ एकर २८ गुंठे जमिनीच्या ताब्यासंबंधी श्री.बादल्या मालजी विलात या आदिवासींने वाद निर्माण केला आहे. तेवढ्या जमिनीवर विकासकाने सध्या तरी विकासाचे काम करु नये.

विभागाने सादर केलेल्या प्रस्तावास मंत्रिमंडळ उप समितीने दिनांक १५ मार्च, १९९६ रोजीच्या बैठकीत पुढील अटींच्या अधीन राहून मान्यता दिली आहे.

१) अर्जदार मागत असलेल्या १४ एकर जमिनीवर आदिवासींचे कोणतेही हितसंबंध नाहीत, अशाप्रकारचे हमी पत्र विकासकाकडून योग्य त्या स्टँप पेपरवर लिहून घ्यावे. म्हणजे शासनास भविष्यात कोणत्याही कायदेशीर अडचणीला तोंड द्यावे लागणार नाही.

२) असे हमी पत्र विधी व न्याय विभागाकडून तपासून घ्यावे.

३) श्री. बादल्या मालजी विलात हक्क सांगत असलेल्या २ एकर २८ गुंठे जमिनीवर सदर आदिवासी व विकासक यांचे दरम्यानचा वाद मिटेपर्यंत विकासकाने विकासाचे कोणतेही काम करु नये व त्या क्षेत्राचा चटई निर्देशांकही इतर ठिकाणी वापरु नये.

मंत्रिमंडळ उप समितीने घेतलेला प्रस्तुतचा निर्णय शासनाच्या प्रचलीत धोरणाशी सुसंगत असून त्यामध्ये कोणत्याही प्रकारची अनियमितता दिसून येत नाही. त्यामुळे मंत्रिमंडळ उपसमितीने १० टक्के सदनिका देण्याची अट वगळण्याचा कुठलाही निर्णय घेतला नव्हता, ही बाब वस्तुस्थितीला धरुन नाही.

ही बाब शासनाच्या पत्र क्र.यूएलसी - १०(२००५)/प्र.क्र.१२२/नाजकधा-१, दि. ६/७/२००६ च्या पत्रान्वये उप महालेखाकार (लेखा-२), नागपूर यांच्या निदर्शनास आणण्यात आली आहे.

**साक्ष :**

**४.३** उपरोक्त परिच्छेदाच्या संदर्भात लोकलेखा समितीने दिनांक ५ जानेवारी, २०११ रोजी नगर विकास विभागाचे प्रधान सचिव व अन्य विभागीय प्रतिनिधी यांची साक्ष घेतली. त्या साक्षीच्या वेळी सचिवांनी समितीस अशी माहिती दिली की, बृहन्मुंबई नागरी समुहातील कांदिवली येथील सर्व्हे क्रमांक १६३ असून तेथील ५७ एकर जागा म्हाडाने संपादित केली होती. या जमिनीवर सदनिका बांधण्याचे काम कॉनवूड एजन्सीला देण्यात आले होते. नागरी जमीन कमाल धारणा कायद्यातील कलम २० नुसार त्यांना सूट देण्यात आली होती. परंतु ती देत असतांना काही अटी टाकण्यात आल्या होत्या. ही जमीन म्हाडाने संपादीत केलेली असल्यामुळे ५७ एकर जागा योग्य ती किंमत आकारुन शासनाला दिली पाहिजे. त्याप्रमाणे दिनांक १४.१०.१९८० रोजी ५७ एकरापैकी ४३ एकर जागा शासनाला विकासकाने दिली व उरलेली १४ एकर जमीन त्यांनी दिलेली नाही. त्यानतर दिनांक २३.८.१९८८ रोजी शासनाने

अशा जमिनीच्या बाबतीत एक धोरण आखले होते त्याप्रमाणे एकूण जमिनीच्या ६० टक्के जागा त्यांनी विनामूल्य दिली पाहिजे आणि उरलेल्या ४० टक्के जमिनीवर त्यांनी ४० आणि ८० चौरस मिटर्सच्या निवासी सदनिका बांधल्या पाहिजेत आणि त्यातील दहा टक्के सदनिका शासनाला दिल्या पाहिजेत. पूर्वीच्या नियमाप्रमाणे त्यांनी १० टक्के सदनिका द्यावयाचे होते आता त्यात शासनाच्या सुधारीत नियमाप्रमाणे बदल करुन ५ टक्के सदनिका द्यावयाच्या आहेत. त्या धोरणानुसार विकासकाने विभागास कळविले की, शासनाला ६० टक्के जागा विनामुल्य द्यावयास पाहिजे परंतु त्यापेक्षा जास्त जागा दिलेली आहे. एकूण या प्लॉटचे क्षेत्रफळ ५७ एकर होते त्यापैकी ३४ एकर जागा त्यांनी द्यावयास पाहिजे होती, परंतु त्या ऐवजी त्यांनी ४३ एकर जागा दिलेली आहे, म्हणजेच ९ एकर जागा अधिक दिलेली आहे. अतिक्रमण वगळून ही जागा दिली आहे. त्यानंतर विभागाने मंत्रिमंडळ उपसमितीसमोर १० टक्के सदनिका देण्यासबंधीची अट वगळण्यात यावी असा प्रस्ताव पाठविला होता. मंत्रिमंडळ उपसमिती समोर विभागाने प्रस्ताव मांडत असतांना तीन अटी टाकल्या होत्या. त्यानुसार मंत्रिमंडळ उपसमितीने या प्रस्तावास मान्यता दिली होती. त्यातील पहिली अट अशी होती की, १४ एकर जमिनीवर आदिवासीचे कोणतेही हितसंबंध नाहीत अशा प्रकारचे हमी पत्र विकासकाने स्टॅम्प पेपरवर लिहून द्यावे. दुसरी अट अशी होती की, त्यांनी लिहून दिलेले हमी पत्र विधी व न्याय विभागाकडून तपासून घेण्यात यावे. व तिसरी अट अशी होती की, श्री. बादल्या मालजी विलात हक्क सांगत असलेल्या २ एकर २८ गुंठे जमिनीवर संबंधित आदिवासी आणि विकासक यांचा वाद मिटेपर्यंत विकासकाने विकासाचे कोणतेही काम करता कामा नये तसेच त्या क्षेत्राचा एफएसआय इतर ठिकाणी वापरता कामा नये. विभागाने जो प्रस्ताव सादर केला होता, त्या प्रस्तावाला दिनांक १५.३.१९९६ रोजी मंत्रिमंडळ उपसमितीने मान्यता दिली होती.

**४.४** विभागीय सचिवांनी समितीला माहिती देताना असे सांगितले की, या संदर्भात महालेखाकार यांनी असे आक्षेप घेतले होते की, १० टक्के सदनिकांच्या बाबतीत बाजार भाव आणि शासकीय भाव यातील फरकापोटी १३.६९ कोटी रुपयांचा भुधारकाला अहेतूक लाभ झाला होता. म्हणजेच तेवढे शासनाचे नुकसान झालेले आहे . ९ एकर जास्तीची जागा त्यांनी अगोदरच शासनाला दिली असल्यामुळे त्यांच्याकडून १० टक्के गाळे घेण्यात येऊ नयेत असा मंत्रिमंडळ उपसमितीने निर्णय घेतला होता, ही वस्तुस्थिती आहे. त्यांनी ज्या काही अटी ठरवून दिल्या होत्या, त्या अटींप्रमाणे सामंजस्य करार करण्यात आला होता. आदिवासींचे कोणतेही हितसबंध नाहीत असे हमी पत्र विकासकाकडून योग्य त्या स्टॅम्प पेपरवर लिहून घ्यावे आणि विधी व न्याय विभागाने ते तपासून घ्यावेत अशी अट होती परंतु अजून

विधी व न्याय विभागाकडून ते तपासून घेतले नाही. लवकरात लवकर हे हमी पत्र त्यांच्याकडून तपासून घेण्यात येईल.

**४.५** विभागीय सचिवांनी दिलेल्या माहितीवरुन समितीने अशी विचारणा केली की, मंत्रिमंडळ उपसमितीने निर्णय कधी घेतला होता, इतकी वर्षे होऊनही विधी व न्याय विभागाने हमी पत्राची तपासणी का केली नाही, यास उत्तर देताना विभागीय सचिवांनी असे सांगितले की, दिनांक १५.३.१९९६ रोजी निर्णय घेतला होता. हमी पत्राची तपासणी केली नाही ही वस्तुस्थिती आहे. २ एकर जमिनीवर आता बांधकाम झालेले आहे काय, अशी समितीने विचारणा केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, सांमजस्य करार झाल्यानंतर दोन एकर जमिनीवर विकास झालेला आहे. मंत्रिमंडळ उपसमितीचे सदस्य कोण कोण होते आणि सामंजस्य करार केव्हा करण्यात आला होता या समितीच्या प्रश्नावर माहिती देताना सचिवांनी असे सांगितले की, माननीय मुख्यमंत्री समितीचे प्रमुख होते. माननीय महसूल मंत्री, माननीय उद्योग मंत्री आणि माननीय नगरविकास राज्यमंत्री त्याचबरोबर नगर विकास विभागाचे प्रधान सचिव इत्यादी त्या समितीमध्ये होते. दिनांक ३.५.२००० रोजी सामंजस्य करार करण्यात आला होता. २ एकर २८ गुंठे जमिनीवर २००० सालानंतर विकास झालेला आहे. पूर्ण जागेवर बांधकाम झालेले आहे. त्याचबरोबर त्या ठिकाणी खेळाचे मैदान आणि मनोरंजन मैदान यासाठी आरक्षित असलेली जागा वगळून इतर जागेवर विकास झाला आहे. देखभाल करण्याकरीता ते देण्यात आलेले असून मागच्या वर्षी खेळाच्या मैदानाची जागा वगळण्यात आली होती, त्यासाठी मंत्रिमंडळाची मान्यता लागते. मुंबईमध्ये पाण्याचा तुटवडा जाणवत असल्यामुळे पंप हाऊस बांधण्याकरिता मुंबई महानगरपालिकेला जागा पाहिजे होती त्याकरता खेळाच्या मैदानाची जागा देण्यात आली होती. त्या व्यतिरिक्त गेल्या तीन वर्षात महाराष्ट्रात कोणत्याही ठिकाणची खेळण्याची जागा दुस-या प्रयोजनासाठी देण्यात आलेली नाही.

**४.६** या जागेवर आता विकास झालेला आहे. विकासकाने ९ एकर जादा जागा शासनाला दिली असल्यामुळे दहा टक्के सदनिका देण्याच्या बाबतीत त्यांना सूट देण्यात यावी असा मंत्रिमंडळ उपसमितीने निर्णय घेतल्याचे आता विभागाने सांगितले आहे. परंतु ज्यावेळी महालेखाकारांकडून आक्षेप, काढण्यात आले होते त्यावेळी यासबंधीचा खुलासा का करण्यात आला नाही अशी समितीने विचारणा केली असता सचिवांनी असे सांगितले की, विभागाने स्पष्टीकरणात्मक ज्ञापन पाठविले होते. हे स्पष्टीकरणात्मक ज्ञापन कधी पाठविण्यात आले, अशी समितीने विचारणा केल्यावर त्याबाबत विभागांकडून उत्तर मिळाले नाही. त्यावेळी महालेखाकारांनी The Cabinet Sub Committee had given approval subject to the fulfillment of conditions which have been laid down. Our Question is whether these conditions were fulfilled or not? असे विचारले असता,

सचिवांनी असे सांगितले की, the Undertaking is dated 4th April 1996. It is on stamp paper and it is available with me.The department failed to get it vetted by the department of Law and Judiciary. There was a MOU and that particular settlement deed was placed before the court and the court has approved it.

**४.७** साक्षीच्या बैठकीचे वेळी महालेखाकारांनी विचारणा केली की, The main condition was that the Developer should give the undertaking on stamp paper and this undertaking should be vetted by the Law and Judiciary department. त्यास उत्तर देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, The condition was to ensure that the rights of the advisasis are not infringed.This agreement says that the rights of the advisasis were not infringed

**४.८** पुढे समितीने अशी विचारणा केली की, याबाबतीत सर्व निर्णय घेऊन सुरुवातीला जेव्हा म्हाडाने जमिन ताब्यात घेण्याची कार्यवाही सुरु केली, तेव्हा या जागेची मालकी आदिवासींकडे होती काय ? तेव्हा विभागीय सचिवांनी आदिवासी मालक नव्हते असा खुलासा केला. कोयनेचा भुकंप झाला, तेव्हा त्यांना २००१ मध्ये शेती करण्यासाठी भाडेतत्वावर ही जागा देण्यात आली होती. त्यांचा तेथे मालकी हक्क नाही. शासनाच्या परवानगी शिवाय कोणालाही जागा विकता येत नाही. ते मालक नव्हते. सन २००१ मध्ये शेती करण्यासाठी भाडेतत्वावर जागा दिली होती, ती मालकी हक्काची जागा नाही. यासंबंधी विधीपूर्वक कार्यवाही पूर्ण करुन घ्यावी लागेल असे समितीने अभिप्राय दिले असता, विभागीय सचिवांनी सांगितले की, यासंबंधातील जे हमी पत्र आहे, ते विधी व न्याय विभागाकडून दहा दिवसांमध्ये तपासून घेऊ. तसेच विभागाकडे या जमिनीच्या विकासाच्या बाबतीत कोणाच्याही तक्रारी आलेल्या नाहीत. जर आदिवासी लोकांकडून यासंबंधात तक्रारी आल्या असत्या तर त्याबाबत जरुर दखल घेतली गेली असती.

**४.९** समितीने मागील १३ वर्षामध्ये हमी पत्र तपासून का घेण्यात आले नाही, तसेच सदरहू बाब विधी व न्याय विभागाकडे कधी पाठविण्यात आली ? असे विचारले असता सचिवांनी सांगितले की, ही बाब विधी व न्याय विभागाकडे पाठविण्यात आलेली नाही. समितीने ही बाब विधी व न्याय विभागाकडे पाठविण्यात यावी अशी मंत्रिमंडळ उपसमितीने सूचना केली असतानाही ती अद्याप पर्यंत विधी व न्याय विभागाकडे पाठविण्यात आलेली नसल्याने साक्षीचे वेळी नाराजी व्यक्त केली.

**४.१०** कोयना भुकंपामुळे विस्थापित झालेल्या आदिवासींना शेती करण्यासाठी भाडेपट्टयावर जागा देण्यात आली होती. त्यांना ही जागा शासनाने दिली आहे की संबंधित जमीन मालकाने दिलेली आहे? जर शासनाने आदिवासींना ही जागा दिली असेल तर मग या जागेचा ताबा घेण्याची कार्यवाही पूर्ण

करुन, ती जागा शासनाच्या ताब्यात आल्यावर मग आदिवासींना देण्यात आलेली आहे काय? याबाबतीत सर्वोच्च न्यायालयाचे आदेश आहेत की, "Once acquisition process is completed and possession is taken then nothing can be done." ही जागा खाजगी नाही. कोयना भूकंपाच्या वेळी विस्थापित झालेल्या लोकांना भाडेपट्टयावर जागा देण्यात आली, ताबा घेण्याचा निवाडा झालेला आहे. आता ती जागा आम्हाला द्या अशी मागणी करण्यात येईल अशी समितीने मत व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी असे सांगितले की, शासनाने जागा ताब्यात घेतल्यानंतर ती कोणालाही देऊ शकत नाही हे मान्य आहे. हा सर्वोच्च न्यायालयाचा निवाडा आहे.

**४.११** यासंदर्भात अधिक माहिती देताना विभागाने सांगितले की, नागरी जमीन कमाल धारणा खालील ही अतिरिक्त जागा आहे. त्याचा ताबा घेतल्यानंतर मग आदिवासींना ही जागा तात्पुरती देण्यात आली आहे. एखादी जागा नागरी जमीन कमाल धारणा अधिनियमांतर्गत शासनाच्या ताब्यात आल्यानंतर जागेचा ताबा घेतल्यावर मालकीचा अधिकार राहत नाही. जर ही जागा अतिरिक्त असेल तर कलम २० खाली सूट देण्यात आलेली आहे. शासनाने सन २००१ मध्ये आदिवासींना शेतीसाठी जागा दिलेली आहे आणि ते करारानुसार केलेले आहे.

**४.१२** मंत्रिमंडळाच्या उप समितीने जे निर्णय घेतलेले आहेत, ते समितीला सादर करण्यात यावे असे समितीने निदेश दिले होते. त्यानुसार विभागाकडून संपूर्ण नस्ती समितीला प्राप्त झाली, त्यामधील प्रकरणांच्या घटनाक्रमाबाबतची थोडक्यात माहिती खालील प्रमाणे आहे :-

१. **नागरी जमीन कमाल धारणा अधिनियम, १९७६ च्या कलम ६ (१) खाली दाखल केलेले विवरणपत्र :** बृहन्मुंबई नागरी समुहातील जमिनधारक जे.एस.परेरा यांनी नागरी जमीन कमाल धारणा अधिनियमाच्या कलम ६ (१) खाली दाखल केलेल्या विवरणपत्रामध्ये स.क्र.१६३ मौ.कांदिवली येथील एकूण ६,६०,३०७ चौ.मि. धारण क्षेत्र दाखविण्यात आले होते. त्यातील २४,७३१ चौ.मि. क्षेत्र श्रीमती नागपाल यांना अधिनियमाच्या प्रारंभ दिनांकापूर्वी जमिनधारक जे.एस.परेरा यांनी विक्री केले असल्यामुळे ते वगळून ६,३५,५७६ चौ.मि. क्षेत्र धारण क्षेत्र म्हणून गृहीत धरण्यात आले होते.

२. **कलम ८(४) चे आदेश व त्यास पारित शुध्दीपत्रके :** कलम ८(४) च्या दिनांक २२.३.१९८० च्या आदेशाने ६,३५,५७६ चौ.मि. क्षेत्रापैकी २,०८,८८५ चौ.मि. क्षेत्र विविध आरक्षणांनी बाधीत असल्यामुळे बिनमोकळे घोषित करण्यांत येऊन तसेच अर्जदाराच्या चार वारसदारांना प्रत्येकी ५०० चौ.मि. चे क्षेत्र अनुज्ञेय करुन ४,२४,६९०.४० चौ.मि. क्षेत्र अतिरिक्त घोषित करण्यात आले. या अतिरिक्त क्षेत्रामध्ये म्हाडास हस्तांतरीत करण्यात आलेले क्षेत्र अंतर्भूत आहे.

सदर प्रकरणी शेवटचे कलम ८(४) चे शुध्दीपत्रक दिनांक २८.१.२००५ रोजी सक्षम प्राधिकारी यांनी काढले आहे. सदर शुध्दीपत्रकानुसार अर्जदाराचे एकूण अतिरिक्त क्षेत्र १,९२,६१७.२० चौ.मि. ठरविण्यात आले आहे.

३. **दिनांक १७.१.१९७८ रोजी शासनाने सुट देण्याचा घेतलेला निर्णय :** सदर प्रकरणी ८(४) चे पहिले आदेश दिनांक २२.३.१९८० रोजी वर नमूद केल्याप्रमाणे काढण्यात आले आहेत. परंतु विषयांकित योजनेखाली क्षेत्रातील काही जमिनी या म्हाडाच्या संपादनाखाली असल्यामुळे दिनांक १७.१.१९७८ रोजी, योजनाधारकाच्या धारण क्षेत्राखालील व एकूण जमिनीच्या ५७ एकर जमिन नागरी जमीन कमाल धारणा अधिनियमान्वये होणाऱ्या किंमतीचा मोबदला देऊन म्हाडास हस्तांतरीत करण्याच्या अटींवर सूट देण्याचा तत्वतः निर्णय शासनाने घेतला होता. व त्यानंतर लगेच १९८० साली ४३ एकर जमिन जमिनधारकांनी म्हाडास हस्तांतरीत केली होती.

४. **कलम २० खालील सूटीचे आदेश :** त्यानंतर दिनांक २०.१०.१९८९ रोजी म्हाडास पूर्वी दिलेले ४३ एकर क्षेत्र वगळता आणखी १४ एकर जमिन म्हाडास देण्याच्या अटीवर जमिनधारकाच्या ६,३५,५७६ चौ.मि. जमिनीस कलम २० खाली सूट देण्यात आली होती. कलम ८(४) च्या शुद्धीपत्रकानुसार कलम २० खालील योजनेस शुद्धीपत्रक काढण्यात येऊन १,७५,६३६ चौ.मि. क्षेत्र हे योजनेखालील क्षेत्र ठरविण्यात आले आहे. या क्षेत्रामध्ये विकास योजना रस्त्याचा एफएसआय मिळवून (९२,४१३.८८ चौ.मि.) एकूण योजनेखाली बांधीव क्षेत्र २,६८,१५०.५६ चौ.मि. इतके ठरविण्यात आले आहे.

दिनांक २०.१०.१९८९ रोजी मंजूर करण्यात आलेल्या कलम २० खालील सुटीच्या आदेशातील महत्वाच्या अटी खालील प्रमाणे आहेत.

१. सूटीच्या आदेशानुसार जमिनधारकाने आणखी १४ एकर जमिन म्हाडास हस्तांतरीत करावी

२. बांधकाम केलेल्या क्षेत्रामधून १० टक्के सदनिका शासनास पूर्व निर्धारित दराने हस्तांतरीत कराव्यात.

५. **शासनाने दिनांक २३/८/१९८८ चे धोरण :** दरम्यानच्या काळात सदर सूटीचे आदेश निर्गमित करण्यापूर्वी दिनांक २३.८.१९८८ च्या परिपत्रकान्वये म्हाडासाठी संपादनाखाली असलेल्या जमिनीच्या ६० टक्के जमिन, जमिनधारकाने म्हाडास हस्तांतरीत केल्यास उर्वरित जमिनीवर दुर्बलघटकांसाठी गृहबांधणी योजना मंजूर करण्याचे धोरण शासनाने स्वीकारले होते.

सदर धोरणाचा अंमल मंजूर करण्यांत आलेल्या योजनांनादेखील लागू करण्याबाबत धोरणामध्ये उल्लेख करण्यात आलेला आहे.

६. **जमिनधारकाने शासनाकडे केलेली विनंती व त्याअनुषंगाने मंत्रिमंडळ उप समिती समोर सादर प्रस्ताव :** जमिनधारकाने शासनाकडे अशी विनंती केली की, म्हाडाच्या संपादनाखाली असलेल्या एकूण जमिनीच्या ६० टक्के पेक्षाही जास्त क्षेत्र जमिनधारकाने १९८० सालीच म्हाडाकडे हस्तांतरीत केले असल्यामुळे आणखी १४ एकर जमिन म्हाडास देण्याची अट रद्द करण्याची विनंती केली. तसेच, २३.८.१९८८ च्या धोरणानुसार म्हाडास जवळ जवळ ९ एकरपेक्षा जास्त क्षेत्र जास्त दिले असल्यामुळे १० टक्के सदनिका पूर्वनिर्धारित दराने शासनास प्रत्यार्पित करण्याची अट देखील रद्द करण्याची विनंती केली. त्याअनुषंगाने विभागाचा प्रस्ताव मंत्रिमंडळ उप समितीच्या दिनांक १५.३.१९९६ च्या बैठकीत विचारार्थ ठेवण्यांत आला होता. त्यास मंत्रिमंडळ उपसमितीने खालील अटीच्या अधिन राहून मान्यता दिली होती.

७. **मंत्रिमंडळ उप समितीने घेतलेला निर्णय :** योजनाधारकाने म्हाडास आणखी १४ एकर जमिन देण्याची व १० टक्के सदनिका प्रत्यार्पित करण्याची अट शिथील करण्याचा प्रस्ताव मंत्रिमंडळ उप समितीच्या दिनांक १५.३.१९९६ च्या बैठकीत विचारार्थ ठेवण्यात आला होता. त्यास मंत्रिमंडळ उपसमितीने खालील अटीच्या अधिन राहून मान्यता दिली होती.

    १. अर्जदार मागत असलेल्या १४ एकर जमिनीवर आदिवासींची कोणतेही हितसंबंध नाहीत. अशाप्रकारचे हमी पत्र विकासकाराकडून योग्य त्या स्टॅम्प पेपरवर लिहून घ्यावे. म्हणजे शासनास भविष्यात कोणत्याही कायदेशीर अडचणीला तोंड द्यावे लागणार नाही.

    २. असे हमी पत्र विधी व न्याय विभागाकडून तपासून घ्यावे.

    ३. श्री.बादल्या मालजी विलात हक्क सांगत असलेल्या २ एकर २८ गुंठे जमिनीवर सदर आदिवासी व विकासकार यांचे दरम्यानचा वाद मिटेपर्यंत विकासकाराने विकासाचे कोणतेही काम करु नये व त्या क्षेत्राचा चटई निर्देशांकही इतर ठिकाणी वापरु नये.

८. **मंत्रिमंडळ उप समितीच्या निर्णयानुसार शासनाने केलेली कार्यवाही :** मंत्रिमंडळ उप समितीच्या वरील निर्णयानुसार शासनाने दिनांक १३.९.१९९६ रोजी कलम २० खाली सूटीच्या आदेशास शुद्धी पत्रक काढून सूटीच्या आदेशातील अट क्रमांक १ (१४ एकर जमिन म्हाडास हस्तांतरीत करणेसंबंधात) व अट क्रमांक १८ (शासनास १० टक्के सदनिका प्रत्यार्पित करण्यासंबंधात)

वगळण्यात आली व अट क्रमांक ७ (ब) नव्याने अंतर्भूत करुन १४ एकर जमिन विकासकाने दिनांक ४.४.१९९६ व दिनांक ३०.७.१९९६ रोजी दिलेले हमी पत्र (Undertaking) लक्षात घेऊन विकसीत करण्यास मुक्त केली आहे.

९. **विकासकाराने ४.४.१९९६ व ३०.७.१९९६ रोजी दिलेले हमीपत्र :** मंत्रिमंडळ उपसमितीने घातलेल्या अटीनुसार हमीपत्र (Undertaking) दिलेले असून सदर जमिनीबाबत आजपर्यंत कोणतीही तक्रार/हक्क शासनाकडे अथवा सक्षम प्राधिकारी यांच्याकडे नोंदविण्यात आलेली नाही.

१०. **आदिवासी व विकासक यांच्यातील सामंजस्य करार :** श्री.बादल्या विलात या आदिवासीने मा.शहर दिवाणी न्यायालय, मुंबई येथे जमिनधारक व विकासकार यांच्या विरुद्ध दाखल केलेल्या लॉग कॉज सूट क्रमांक २७५१/१९९६ मध्ये दिनांक ३.५.२००० रोजी सामंजस्य करार दाखल करण्यात आला असून त्यास मा.न्यायालयाने मान्यता दिलेली आहे. त्यामुळे श्री.बादल्या विलात व जमिनधारकामधील वाद मिटलेला आहे.

११. **भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००५-२००५ या वर्षातील महसूली जमा अहवालातील परिच्छेद क्रमांक ४.४.१४ :** प्रस्तुत परिच्छेदामध्ये मंत्रिमंडळ उप समितीने १० टक्के सदनिका प्रत्यार्पित करण्यासंदर्भातील अट वगळण्याचा कोणताही निर्णय घेतला नव्हता असे नमूद करण्यात आले आहे. तथापि मंत्रिमंडळ उप समितीने दि. १५.३.१९९६ च्या बैठकीत अशा प्रकारे निर्णय घेतल्याचे व प्रस्तुत निर्णयातील अटींची त्यानंतर पुर्तता करण्यात आल्याचे दिसून येते.

## अभिप्राय व शिफारशी :

**४.१३** बृहन्मुंबई नागरी समुहातील कांदिवली येथील सर्व्हे नंबर १६३ असून तेथील ५७ एकर जागा म्हाडाने संपादित केली होती व या जमिनीवर निवासी सदनिका बांधण्याचे काम कॉनवूड एजन्सीला देण्यात आले होते. नागरी जमीन कमाल धारणा कायद्यातील कलम २० नुसार त्यांना सूट देण्यात आली होती, परंतु ती देत असतांना काही अटी टाकण्यात आल्या होत्या. ही जमीन म्हाडाने संपादित केलेली असल्यामुळे ५७ एकर जागा योग्य ती किंमत आकारुन शासनाला दिली पाहिजे. त्याप्रमाणे दिनांक १४.१०.१९८० रोजी ५७ एकरापैकी ४३ एकर जागा शासनाला विकासकाने दिली व उरलेली १४ एकर जमीन त्यांनी दिलेली नाही. त्यानंतर दिनांक २३.८.१९८८ रोजी शासनाने अशा जमिनीच्या बाबतीत एक धोरण आखले होते त्याप्रमाणे एकूण जमिनीच्या ६० टक्के जागा त्यांनी

विनामूल्य दिली पाहिजे आणि उरलेल्या ४० टक्के जमिनीवर त्यांनी ४० आणि ८० चौरस मिटर्सच्या सदनिका बांधल्या पाहिजेत आणि त्यातील दहा टक्के सदनिका शासनाला दिल्या पाहिजेत. पूर्वीच्या नियमाप्रमाणे त्यांनी १० टक्के सदनिका द्यावयाच्या होत्या. त्या धोरणानुसार विकासकाने शासनाला ६०% जागा विनामुल्य द्यावयास पाहिजे, पंरतु त्यापेक्षा जास्त जागा दिलेली होती. या भूखंडाचे एकूण क्षेत्रफळ ५७ एकर होते. त्यापैकी ३४ एकर जागा देण्याऐवजी ४३ एकर जागा शासनास दिली आहे. म्हणजेच ९ एकर जागा अधिक देण्यात आलेली आहे.

**४.१४** शासनाच्या प्रचलित धोरणानुसार जमिनधारकाने शासनाला विनामूल्य द्यावयाच्या क्षेत्रापेक्षा अधिकचे क्षेत्र पूर्वीच शासनाला प्रत्यार्पित केले असल्यामुळे शासन देय असलेल्या १० टक्के सदनिका प्रत्यार्पित करण्याबाबतची अट शिथील करावी असा प्रस्ताव शासनाकडे प्राप्त झाला होता. सदर प्रस्तावावर विचार करुन जमिनधारकाने बांधिलकीपेक्षा अधिक जमिन म्हाडाला हस्तांतरीत केली असल्यामुळे प्रस्तुत सुटीच्या आदेशातून शासन देय सदनिका प्रत्यार्पित करण्यासंदर्भात अट शिथील करण्यात यावी, अशा आशयाचा प्रस्ताव विभागाने नागरी जमीन कमाल धारणा अधिनियमाच्या सुलभ अंमलबजावणीसाठी नियुक्त करण्यात आलेल्या मंत्रिमंडळ उप समितीच्या दिनांक १५ मार्च, १९९६ च्या बैठकीत विचारार्थ सादर केला होता. मंत्रिमंडळ उपसमितीसमोर सादर केलेला प्रस्ताव थोडक्यात पुढीलप्रमाणे होता.

अ) उर्वरीत १४ एकर जमिन म्हाडास देण्याच्या बंधनातून विकासकास मुक्त करावे.

ब) विकासकाने त्यांच्या बांधीलकीपेक्षा जास्त क्षेत्र म्हाडाच्या ताब्यात दिले असल्यामुळे योजनेमध्ये बांधल्या जाणाऱ्या सदनिकांच्या १० टक्के सदनिका देण्याच्या अटीतून विकासकास मुक्त करावे.

क) सर्व्हे क्रमांक १६३ मधील जमिनीपैकी २ एकर २८ गुंठे जमिनीच्या ताब्यांसंबंधी श्री.बादल्या मालजी विलात या आदिवासींने वाद निर्माण केला आहे. तेवढ्या जमिनीवर विकासकाने सध्या तरी विकासाचे काम करु नये.

**४.१५** विभागाने सादर केलेल्या प्रस्तावास मंत्रिमंडळ उप समितीने दिनांक १५ मार्च, १९९६ रोजीच्या बैठकीत पुढील अटींच्या अधिन राहून मान्यता दिली आहे.

१) अर्जदार मागत असलेल्या १४ एकर जमिनीवर आदिवासींचे कोणतेही हितसंबंध नाहीत, अशाप्रकारचे हमी पत्र विकासकाराकडून योग्य त्या स्टँप पेपरवर लिहून घ्यावे. म्हणजे शासनास भविष्यात कोणत्याही कायदेशीर अडचणीला तोंड द्यावे लागणार नाही.

२) असे हमी पत्र विधी व न्याय विभागाकडून तपासून घ्यावे.

३) श्री. बादल्या मालजी विलात हक्क सांगत असलेल्या २ एकर २८ गुंठे जमिनीवर सदर आदिवासी व विकासकार यांचे दरम्यानचा वाद मिटेपर्यंत विकासकाराने विकासाचे कोणतेही काम करु नये व त्या क्षेत्राचा चटई निर्देशांकही इतर ठिकाणी वापरु नये.

**४.१६** महालेखापाल कार्यालयाने १०% सदनिकांच्या बाबतीत बाजारभाव आणि शासकीय भाव यातील फरक रू.१३.६९ कोटी एवढा भूधारकाला अहेतूक लाभ झाला असल्याचा आक्षेप घेतला होता. **विभागाच्या म्हणण्याप्रमाणे मंत्रिमंडळ उपसमितीने ज्या अटी ठरवून दिल्या होत्या त्या अटीप्रमाणे सामंजस्य करार करण्यात आला आहे. आदिवासींचे कोणतेही हितसंबंध नाहीत असे हमीपत्र विकासकाकडून योग्य त्या स्टँप पेपरवर लिहून घ्यावे जेणेकरून शासनास भविष्यात कोणत्याही कायदेशीर अडचणीला तोंड द्यावे लागणार नाही तसेच हे हमीपत्र विधी व न्याय विभागाकडून तपासून घ्यावे अशी अट होती. परंतु दिनांक ४ एप्रिल, १९९६ व ३० जुलै, १९९६ रोजी हमी पत्र देवूनही ते अद्यापर्यंत म्हणजे तब्बल १५ वर्षांनंतर देखिल विधी व न्याय विभागाकडून तपासून घेण्यात आलेले नाही. याबाबत समितीने नाराजी व्यक्त केली. मंत्रिमंडळ उप समितीने वरील अटींच्या अधीन राहूनच योजनाधारकाने म्हाडास आपली १४ एकर जमीन देण्याची व १०% सदनिका प्रत्यार्पित करण्याची अट शिथील करण्यास मान्यता दिली होती. त्यामुळे विकासकाने दिनांक ४ एप्रिल, १९९६ व दिनांक ३० जुलै, १९९६ रोजी दिलेले हमीपत्र लक्षात घेऊन १४ एकर जमीन विकसित करण्यास मुक्त केली आहे परंतु सदर हमीपत्र विधी व न्याय विभागाकडून तपासून घेण्यामागे शासनास भविष्यात कोणत्याही कायदेशीर अडचण येऊ नये असा होता त्यासच छेद दिला गेला आहे. या हमीपत्रामध्ये काही विधी विषयक त्रुटी राहून गेल्या असल्यास त्यापूर्ण करुन घेणे विभागाची जबाबदारी होती त्यामुळे सदर हमीपत्र हे त्याच काळात विधी व न्याय विभागाकडून कोणत्या कारणामुळे तपासून घेण्यात आले नाही व विभागीय सचिवांची दिनांक ५ जानेवारी, २०११ रोजीच्या साक्षीत आश्वासित केल्यानुसार विधी व न्याय विभागाकडून तपासून घेतलेल्या सदरहू हमी पत्राची प्रत विधी व न्याय विभागाच्या संपूर्ण अभिप्रायासह समितीस सादर करावी अशी समिती शिफारस करीत आहे.**

# ऊर्जा विभाग

## व्याजाची आकारणी न करणे

**५.१** भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांनी त्यांच्या सन २००४-२००५ च्या महसूली जमा रक्कमांच्या अहवालामधील परिच्छेद क्रमांक ५.१०-"व्याजाची आकारणी न करणे" यासंदर्भात खालील अभिप्राय व्यक्त केले आहेत.

मुंबई विद्युत शुल्क अधिनियम, १९५८ च्या उपबंधानुसार उपभोक्त्याला वीज पुरवठा करणाऱ्या प्रत्येक अनुज्ञप्तिधारकाने उपभोक्त्याकडून स्वतःच्या आकारासह विद्युत शुल्क वसुल करणे आणि विहीत तारखेपर्यंत ते शासनास प्रदान करणे आवश्यक आहे. विहीत तारखेपर्यंत जमा केलेले शुल्क प्रदान करण्यास कसूर केल्यास भरणा न केलेल्या शुल्कावर पहिल्या तीन महिन्यांकरिता प्रतिवर्षी १८ टक्के दराने आणि त्यानंतर प्रतिवर्षी २४ टक्के दराने भरणा करण्याच्या दिनांकापर्यंत व्याज आकारणीय आहे.

महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाने मार्च, २००४ ते जानेवारी, २००५ पर्यंतच्या काळात उपभोक्त्यांकडून एकूण रु. ६६२.९५ कोटी विद्युत शुल्क जमा केले, परंतु ती रक्कम शासकीय खात्यात भरली नाही. महामंडळाला अनुज्ञेय असलेल्या अनुदानातून शासनाने दिनांक १४ मार्च, २००५ रोजीच्या अधिसूचनेनुसार म.रा.वि.मं कंपनीकडून येणे असलेले रु.४४८.४० कोटी विद्युत शुल्क समायोजित केले. उर्वरित रु.२१४.५५ कोटी रक्कमेच्या वसुलीचा अहवाल प्राप्त झाला नाही. तसेच रु.७१.०८ लाख व्याज आकारले गेले नाही आणि विभागानेही त्याची मागणी केली नाही.

ही बाब मे, २००५ मध्ये विभागाला आणि शासनाला कळविण्यांत आली, त्यांचे उत्तर अद्याप प्राप्त झाले नाही (डिसेंबर, २००५).

**ज्ञापन :**

**५.२** यासंदर्भात विभागाने पाठविलेल्या लेखी स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये असे नमूद करण्यात आले आहे की, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीने सन २००४-२००५ या वर्षात ग्राहकांकडून लेखापरीक्षणात नमूद

केल्याप्रमाणे रु.६६२.९५ कोटी विद्युत शुल्कापोटी जमा केलेले नसून रु.६६३.४० कोटी एवढे जमा केलेले आहेत. त्यापैकी रु.५८८.९७ कोटी महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीस अनुज्ञेय असलेल्या अनुदानांपोटी शासन स्तरावर समायोजित करण्यात आलेले असून रु.७४.४३ कोटी अद्याप विद्युत शुल्कापोटी येणे आहे. सदर विद्युत शुल्काची रक्कम महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीकडून वसूल करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

## साक्ष :

**५.३** उपरोक्त परिच्छेदाच्या संदर्भात दिनांक ७ सप्टेंबर, २०१० व दिनांक ४ जानेवारी, २०११ रोजी ऊर्जा विभागाच्या सचिवांची लोकलेखा समितीपुढे साक्ष घेण्यात आली. त्या वेळी सचिवांनी समितीस अशी माहिती दिली की, मुंबई विद्युत शुल्क अधिनियम, १९५८ च्या उपबंधानुसार वीज पुरवठा करणाऱ्या प्रत्येक अनुज्ञप्तिधारकाने उपभोक्त्याकडून स्वत:च्या मालकीच्या आकारासह विद्युत शुल्क वसूल करणे आणि विहीत तारखे पर्यंत ते शासनास प्रदान करणे आवश्यक आहे. विहीत तारखेपर्यंत जमा केलेले शुल्क प्रदान करण्यास कसूर केल्यास भरणा न केलेल्या शुल्कावर पहिल्या तीन महिन्यांकरिता १८ टक्के दराने आणि त्यानंतर प्रतिवर्षी २४ टक्के दराने भरणा करण्याच्या दिनांका पर्यंत व्याज आकारले पाहिजे व त्या रक्कमेचा शासनाकडे भरणा केला पाहिजे.

**५.४** त्यावेळी महालेखाकारांनी अशी विचारणा केली की, परिच्छेद क्र. ५.१० मध्ये विद्युत करापोटी समायोजित केलेली रु. ४४८.४० कोटी रक्कम महाराष्ट्र राज्य वीज मंडळाकडून येणे बाकी आहे, जी रक्कम अनुदानापोटी (सबसिडी) मंडळाला देय आहे रु. २१४.५५ कोटी शिल्लक रक्कमेचा अहवाल प्राप्त झाला नाही. पुढील रुपये ७१.०८ कोटी रक्कमेचे व्याज आकारले गेले नाही वा विभागाने त्या रक्कमेची मागणी देखील केली नाही. शिल्लक रक्कम रुपये ७३.४३ कोटी विभागाला अद्याप मिळणे बाकी आहे. ही रक्कम वसुल करणेबाबत विभागाने काहीही कारवाई केलेली नाही असे महालेखापालांनी साक्षीचे वेळी सांगितले.

**५.५** याबाबत सचिवांनी खुलासा करताना असे सांगितले की, शासनाकडून महावितरण कंपनीला शेतकऱ्यांकडून शेती पंपासाठी लागणाऱ्या वीजेच्या वापरापोटी येणाऱ्या देयकाकरिता अनुदान (सबसिडी) दिले जाते. कलम ६५ नुसार शासनाला कोणत्याही वर्गाच्या ग्राहकाला अनुदान (सबसिडी) द्यावयाचे झाल्यास ते सरासरी विजेच्या दरात दिले जाते. शेतकऱ्यांना द्यावयाच्या विजेचा दर रुपये १.५० प्रति युनिट असा ठरविला आहे. शेतकऱ्यांकडे वेगवेगळ्या अश्व शक्तीचे शेती पंप असतात, परंतु महावितरण कंपनी त्यांना २० पैसे दराने वीज देते व उरलेल्या रु.१.३० रक्कमेचा फरक आहे, तो शासनाकडून महावितरण कंपनीला अनुदानाच्या (सबसिडीच्या) रुपाने परत केला जातो. हे पैसे महावितरण कंपनीला आगाऊ प्राप्त होत नाहीत. अर्थात

शासनाच्याही काही अडचणी असतात, कर वसुली वेळेत होत नाही, इतरही खर्च असतात. त्यामुळे हे पैसे शासनाकडून कधी कधी २-३ महिने उलटल्यानंतर प्राप्त होतात. शासनाला महावितरणकडून काही रक्कम देय असते व महावितरणलाही शासनाकडून अनुदान (सबसिडी) देय असते. कधी महावितरण कडून वसुलीला विलंब होतो तर कधी शासनाला अनुदान (सबसिडी) वेळेत द्यायला विलंब होतो. त्यामुळे याठिकाणी एकमेकांना व्याज आकारले जात नाही.

**५.६** या समायोजनेचे स्वरुप कसे असते अशी समितीने विचारणा केली असता, यावर सचिवांनी खुलासा केला की, जसजशी वसुली होते, तसतसे विभागाकडून शासनाला पैसे परत केले जातात. ज्यावेळेस वसुली वेळेत होत नाही, त्यावेळेस शासनाला पैसे परत करण्यास विलंब होतो. यासंबंधात महालेखाकारांचे म्हणणे असे आहे की, त्या रक्कमेवर वीज मंडळाने शासनाला व्याज दिले पाहिजे. परंतु, येथे ही गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की, कलम ६५ प्रमाणे शासनाकडून महावितरणला अनुदान (सबसिडी) पुढच्या महिन्यात द्यावयाचे असेल तर, त्याच्या अगोदरच्या महिन्यात त्याचा धनादेश दिला पाहिजे, तरच महावितरण कंपनी ग्राहकांना विद्युत देयकामध्ये सवलत देऊ शकते. शासनाकडून जर हे अनुदान (सबसिडी) वेळेत आले नाही तर महावितरण शासनाला त्याचे व्याज आकारत नाही त्याचप्रमाणे शासनही महावितरणकडून वेळेवर रक्कम अदा केली नाही तर व्याज आकारत नाही.

**५.७** शासन व महावितरण कंपनी एकमेकांना रक्कम भरणा करण्यास वा ती देण्यात होणाऱ्या विलंबासाठी व्याज आकारत नाही, मग यात जास्त नुकसान कोणाचे होते, असे समितीने विचारले असता समितीला सांगण्यात आले की, शासनाकडून महावितरणला जर वेळेत अनुदान (सबसिडी) मिळाले नाही, तर महावितरणला बँकेकडून खेळते भांडवल घ्यावे लागते. त्यामुळे कंपनीवर जो जादा खर्चाचा बोजा पडतो, तो शेवटी ग्राहकांवरच पडण्याची शक्यता असते.

**५.८** त्यावर समितीने अशी विचारणा केली की, महावितरणच्या गैरव्यवस्थापनामुळे त्यांना जर बँकाकडून खेळते भांडवल घ्यावे लागत असेल तर त्यात ग्राहकांची काय चूक आहे, अशाप्रकारे ग्राहकांना त्यांची चूक नसताना नाहक दरवाढीचा भुर्दंड सोसावा लागणे हे निकष व नियमाला धरून नाही. काही व्यवहारांमध्ये कंपनीला शासनाकडून येणे असते आणि काही व्यवहारांमध्ये शासनाला कंपनीकडून येणे असते. या व्यवहारांमध्ये तुम्ही आपआपसात समायोजन केले व व्याजाची रक्कम यामध्ये लोप पावल्यामुळे कंपनी तोटयात जाते. तसेच, कंपनी तोटयात जाते म्हणून त्याचा भुर्दंड जनतेवरच मासिक विजेच्या देयाकांमार्फत लादला जातो. याबाबत माहिती देताना सचिवांनी असा खुलासा केला की, शासनाकडून जी यंत्रमाग आणि कृषी पंपांवर अनुदानाची (सबसिडीची) रक्कम येणे असते, त्याकरिता विलंब होतो. कधी कधी कंपनीकडून शासनाकडे जे विद्युतकर भरणे अपेक्षित असते, ती कॅश फ्लो उपलब्ध नसल्यामुळे त्यामध्ये विलंब होतो.

**५.९** कंपनीकडून शासनाला एका वर्षासाठी साधारणत: किती विद्युत कर येणे अपेक्षित असतो, या समितीच्या प्रश्नाला उत्तर देताना सचिवांनी असा खुलासा केला की, कंपनीकडून शासनाकडे विद्युत कर आणि त्याच्या डयूटीवरील करापोटी साधारणत: १६०० कोटी रुपये येणे अपेक्षित असते. शासनाकडून अनुदान (सबसिडी) सन २००९-२०१० या वर्षाचे देण्यात आलेले आहे. आता कंपनीकडून शासनाला जी रक्कम येणे अपेक्षित आहे, त्या रक्कमेबाबतची कंपनीकडून विभागाकडे एक समायोजनाच्या प्रस्तावाची नस्ती आलेली आहे. त्यामध्ये एकूण १४६५ कोटी रुपयांचे समायोजन करण्यात यावे, असा प्रस्ताव कंपनीने विभागाला सादर केलेला आहे.

**५.१०** कंपनी आणि शासन या दोघांचाही कारभार पारदर्शक आहे. त्यामध्ये काहीही अडचणी नाहीत. परंतु सरकार ज्या ज्या गोष्टींवर अनुदान (सबसिडी) देते, ते अनुदान (सबसिडी) कंपनीकडे आणि कंपनीमार्फत लोकांकडे लवकरात लवकर पोहोचणे आवश्यक आहे. तुम्ही याप्रमाणे जर आपापसातच व्याजाची व विलंबाच्या आकाराचे समायोजन केले तर यामुळे कंपनी तोटयात जाते आणि पर्यायाने कंपनीचा तोटा ग्राहकांकडून वसुल केला जातो, हे न्याय्य नाही. जनहित याचिकेच्या माध्यमातून कोणी सामान्य ग्राहक जर उद्या कोर्टात गेला तर नोंद झालेले अनुदान (सबसिडी) आणि विद्युत कराला लागलेला विलंब आणि त्यानुसार व्याज आकारणीची वसुली नियमित नसेल तर हे प्रकरण गंभीर थराला जाऊ शकते. कायद्याप्रमाणे महावितरण आता कंपनी झालेली आहे. आता शासनाचा घटक म्हणून शासनाचे महावितरणावर कोणत्याही प्रकारचे बंधन नाही. कंपनीप्रमाणे वाणिज्यिक दृष्टीकोन ठेवून त्यांनी काम केले पाहिजे. शासनाच्या विभागाशी संलग्न राहून सरकारप्रमाणे कारभार न करता कंपनीप्रमाणे कारभार करावा म्हणून महावितरणाला कंपनी कायद्याप्रमाणे स्वतंत्र अस्तित्व देण्यात आलेले आहे. तरीदेखील जर त्यांचा हाच दृष्टीकोन राहत असेल तर मग कंपनी म्हणून महावितरणला स्वतंत्र अस्तित्व देण्याचा काहीही उपयोग झालेला नाही, असेच समितीला म्हणावे लागेल असे अभिप्राय समितीने साक्षीच्या वेळी व्यक्त केले.

**५.११** यावर सचिवांनी असा खुलासा केला की, कंपनी वीज ग्राहकांकडून वीज बिलाच्या माध्यमातून जो कर वसुल करते, तोच कर विद्युत आकाराच्या स्वरुपामध्ये शासनाकडे सुपूर्द करते. जसजसे कंपनीकडे ही विद्युत कराची देय रक्कम जमा होत जाते, तसतशी कंपनी शासनाला ही रक्कम सुपूर्द करते. जर कंपनीच्या सर्व मुलभूत गरजा भागवून एखाद्या वेळी कंपनीकडे रोख रक्कम उपलब्ध नसेल त्यावेळी शासनाकडे भरणा असलेली अपेक्षित रक्कम कंपनीला देण्यामध्ये विलंब होतो.

**५.१२** कंपनी सध्या किती तोटयामध्ये चालू आहे अशी समितीने विचारणा केली असता, सचिवांनी त्यावर मागिल वर्षाच्या अंदाज पत्रकानुसार एकंदर ११०० कोटी रुपयांनी तोट्यात चालू असल्याचे सांगितले. शासनाचा घटक म्हणून महावितरणला कंपनी म्हणून वेगळे अस्तित्व दिल्यानंतरही जर कंपनी वाणिज्य दृष्टीकोन ठेवून गतिमान निर्णय, ऑनलाईन व्यवहार करुन कंपनी फायद्यामध्ये आणण्याकरिता वेगळे संशोधन

व विशेष असे प्रयत्न करीत नसेल तर वीज ग्राहकांनी, कंपनी तोटयात चालली आहे म्हणून त्याचा भुर्दंड का सोसावा ? अशा प्रकारे वसुली आणि व्याज आकारणीच्या संदर्भात कंपनी आणि शासन एकमेकांमध्ये समायोजनाचे प्रस्ताव मान्य करायला लागली तर ही सामान्य ग्राहकांची लूट चाललेली आहे असे समजावे लागेल, असे समितीने साक्षीचे वेळी अभिप्राय व्यक्त केले.

**५.१३** कायद्याप्रमाणे आता महावितरण कंपनी शासनाचा विभाग नसून ही एक कंपनी आहे. महावितरण कंपनीला इतरांपेक्षा निर्णय घेण्याचे व त्यावर अंमलबजावणी करण्याचे स्वातंत्र्य अधिक असते. असे जर असेल तर लोकप्रतिनिधी या नात्याने ज्यावेळी महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग आम्हाला सुनावणीसाठी बोलावेल, त्यावेळी आम्ही जाऊन यासंदर्भात बाजू मांडू. शासन आणि महावितरण कंपनी एकमेकांमध्ये व्याजाच्या आकारणीचे आणि प्रलंबित देयकांचे समायोजन करणार आणि लोकप्रतिनिधींना सुनावणीला बोलाविण्याचे महाराष्ट्र वीज नियामक आयोग नाटक करणार आणि कंपनीच्या तोटयाची वसूली मात्र ग्राहकांकडून वीज बिलाच्या माध्यमातून करणार असे मत व्यक्त करुन समितीने पुढे अशी विचारणा केली की, महावितरण कंपनी कोणकोणत्या माध्यमातून एकूण ११०० कोटी रुपयांनी तोटयात आहे ?

**५.१४** यावर सचिवांनी असा खुलासा केला की, महावितरण आणि महाजनको या दोन्ही कंपन्यांची मक्तेदारी आहे. परंतु वीज दर हे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग ठरविते. उदाहरण द्यावयाचे झाले तर असे उदाहरण देता येईल की, एक युनिट वीज निर्माण करण्याकरिता अमुक किलो ग्रॅम कोळसा जाळणे अपेक्षित असते. परंतु तेवढा विशिष्ट कि.ग्रॅ.कोळसा जाळल्यानंतरही एक युनिट वीज निर्माण होत नसेल आणि त्यामध्ये आणखी कोळसा जमा करावा लागत असेल तर त्यामुळे वीज वितरण कंपनी व वीज निर्मिती कंपनी तोटयात जाते. याकरिता अपिलिएटही अंतिम करण्यात आले होते. अपिलिएटने यासंदर्भातील कारणांचा अभ्यास करण्याकरिता तज्ज्ञांची नेमणूक करण्यास सांगितले असता, त्यामध्ये असे आढळून आले की, वीज निर्मिती करणारी यंत्रसामुग्री ३५ ते ४० वर्ष जुनी झाली असल्यामुळे, त्यांची वीज निर्मितीची क्षमता कमी होत चालली आहे.

**५.१५** त्यावर समितीने अशी विचारणा केली की, जुनी यंत्रसामुग्री झाल्यामुळे कोळसा जास्त जाळावा लागतो. हा काही त्या कोळशाचा किंवा यंत्राचा दोष नाही. तसेच, हा ग्राहकांचा तर मुळीच दोष नाही. इतक्या वर्षांमध्ये महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाला नवीन यंत्रसामुग्री खरेदी करुन वीज उत्पादन वाढवावे, असे नियमित होणा-या सुनावणी दरम्यान सुचले नाही का ?

**५.१६** त्यासंबंधात सचिवांनी खुलासा करताना अशी माहिती दिली की, शासनाकडून यंत्रमाग आणि कृषी पंपाकरिता एकूण ४७०.४९ कोटी रुपये अनुदान (सबसिडी) कंपनीला दिनांक १ एप्रिल,२००८ रोजी येणे अपेक्षित असतांना ते सुमारे ८७ दिवसांनंतर दिनांक २७ जून,२००८ रोजी प्राप्त झाले. एकूण ८७ दिवसांनंतर त्यावर एकूण २५ कोटी रुपये व्याज अपेक्षित आहे. अशा प्रकारे मार्च,२०१० पर्यंत हे व्याज एकूण ८७७ कोटी

रुपये येणे बाकी आहे. त्यानंतर महागड्या दरात कंपनीस वीज खरेदी करावी लागल्याने त्याकरिताही शासनाकडून अनुदान वितरीत होणे अद्याप बाकी आहे. केंद्र शासनाच्या ज्या संस्थेकडून वितरण कंपनी कोळसा खरेदी करते, तसेच वीज खरेदी करते, त्यांना पहिले पैसे मिळाल्यानंतरच ते कोळसा किंवा वीज महाराष्ट्राला देतात. एखाद्या वेळी जर कंपनीकडून पैसे मिळाले नाहीत तर ते कोळसा आणि वीज पुरवठा ताबडतोब बंद करतात. तसेच महावितरण कंपनीमध्ये काम करणा-या अधिकारी व कर्मचा-यांच्या वेतनावर जो पैसा खर्च होतो, या तीनही गरजांमुळे विद्युत कराची रक्कम कॅश फ्लोच्या अनुपलब्धततेमुळे कंपनी शासनाला विलंबाने देते.

**५.१७** समितीने पुढे अशी विचारणा केली की, शासन आणि कंपनी यांच्यामध्ये परस्पर सामंजस्याने जे पुस्तकी समायोजन होते, त्याकरिता महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाची परवानगी असते का ? त्यावर सचिवांनी असा खुलासा केला की, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाला कंपनी आणि शासन यांच्या पुस्तकी समायोजनेबाबत शपथपत्राच्या माध्यमातून माहिती सादर करावी लागते.

**५.१८** महाराष्ट्र राज्य वीज मंडळ हे राज्यातील अति महत्वाच्या व संवेदनशील विषयाशी म्हणजे वीज निर्मिती आणि वीज वितरणाशी निगडीत आहे. कंपनी कायद्यानुसार महावितरण कंपनीला 'कंपनी' म्हणून स्वतंत्र अस्तित्व देण्यात आले. परंतु या स्वतंत्र अस्तित्वाचा फायदा महावितरण कंपनी जलद निर्णय घेऊन करीत नाही. शासन आणि कंपनी यांच्यामध्ये अशा प्रकारे नेहमी जर पुस्तकी समायोजन होत गेले तर कंपनी म्हणून महावितरण कंपनीला स्वतंत्र अस्तित्व देण्याचे फायदे काय आहेत या समितीच्या प्रश्नाला उत्तर देताना सचिवांनी असे सांगितले की, महावितरण कंपनीला शासनाने कंपनी कायद्यानुसार स्वतंत्र कंपनी म्हणून जे अस्तित्व दिले, त्यामुळे शासनाला वीज निर्मिती आणि वीज वितरणाच्या संदर्भात अनेक फायदे झालेले आहेत. वीज वितरण कंपनीला बाजारामधून निविदा मागविण्याचे स्वातंत्र्य लाभले तसेच, बँकांकडून कर्ज मागण्याचे स्वातंत्र्य मिळाले. बाजारामध्ये इतर कंपन्यांकडून वीज निर्मितीचे कंत्राट देण्याकरिता संधी मिळाली. तसेच बाजारामधून शासनापेक्षा किफायतशीर दराने वीज खरेदी करण्याची कंपनी म्हणून स्वातंत्र्य मिळाले. तसेच, कच्चा माल खरेदी, ऊर्जा शक्ति खरेदी, निविदा प्रक्रिया यामध्ये लवचिकता आल्यामुळे वीज निर्मितीमध्ये मोठया प्रमाणामध्ये फायदा झालेला आहे. वीज कंपनी म्हणून महावितरणला पाच ते सहा हजार मेगावॅट वीज स्वस्त दराने उपलब्ध होते. हे सर्व व्यवहार करीत असतांना प्रत्येक वेळी शासनाकडून कंपनीला परवानगी घेण्याची गरज कायद्यानुसार भासत नसल्यामुळे जलद निर्णय प्रक्रिया आपोआपच घडून येते. तसेच, कंपनी आणि शासन यांच्यामध्ये रक्कम अदा करण्यातील विलंब व अनुदान (सबसिडी) देण्यात होणारा विलंब असे जे प्रश्न पुस्तक समायोजनेद्वारे निर्माण होतात, तेही येत्या काही महिन्यांमध्ये सोडविण्याचा विचार कंपनी करीत आहे.

**५.१९** साधारणतः मुंबईमध्ये एकूण किती ऊर्जा शक्ती प्रकल्प चालू आहेत. तसेच, विधीमंडळाच्या सभागृहामध्ये लोकप्रतिनिधी जे मुंबईकरांना विजेचा समदर पुरविण्यात यावा, म्हणून सतत बोलत असतात, महाराष्ट्र वीज नियामक आयोग तसेच संबंधित खात्याच्या मंत्रिमहोदयांना जाऊन भेटत असतात, त्याबाबत विभागाकडे काही माहिती असेल तर ती समितीसमोर सादर करावी. असे समितीने सांगितले असता, त्याबाबत सचिवांनी असा खुलासा केला की, महाराष्ट्राची आजची विजेची गरज १७,००० मेगावॅट प्रतिवर्ष एवढी आहे व पुढील वर्षी ती गरज २३,८९७ मेगा वॅट पर्यंत वाढणार आहे.

**५.२०** दर वर्षी मुंबईसह महाराष्ट्राची विजेची गरज ८.ड्ड % ते ९.ड्ड % नी वाढते, हे आता एक गृहीतक बनलेले आहे. महाराष्ट्रातील फक्त मुंबईची विजेची मागणी ३,००० मेगावॅट एवढी आहे. महाराष्ट्र आणि मुंबईची विजेची मागणी पूर्ण करण्याकरिता आपल्याकडे तीनच मार्ग आहेत. महाराष्ट्र शासनाचे वीज निर्मिती केंद्र, केंद्र शासनाची वीज निर्मिती केंद्र, सार्वजनिक क्षेत्रांमधील वीजनिर्मिती केंद्र हे ते तीन मार्ग आहेत. परळी आणि पार येथून आपल्याला सन २००९-२०१० मध्ये २५० मेगा वॅट वीज मिळत होती. दाभोळ आर.जी.पी.एल. या प्रकल्पातून आपल्या राज्याला ९७० मेगावॅट इतकी वीज मिळते. या कंपनीला गॅस मिळाल्यानंतर या प्रकल्पाच्या माध्यमातून आपल्याला एकूण १६०० ते १९०० मेगावॅट इतकी वीज प्राप्त होणार आहे. वर्धा ऊर्जा प्रकल्पाच्या माध्यमातून आपल्याला ३०० मेगावॅट वीज प्राप्त होणार आहे. सन २०१० -२०११ मध्ये खापरखेडा आणि भुसावळ ऊर्जा प्रकल्पाच्या माध्यमातून ५०० मेगावॅट इतकी वीज महाराष्ट्राला प्राप्त होईल. सिपथ येथे एन.टी.पी.सी.चे विद्युत प्रकल्प आहेत, त्यातून आपल्याला ५०० मेगावॅट वीज प्राप्त होणार आहे. जे.एस.डब्ल्यू, जयगड आणि रत्नागिरी येथील जिंदाल या प्रकल्पामधून १७० ते ३०० मेगावॅट वीज प्राप्त होणार आहे. तसेच धोपावे, आरजीपीपीएल, रिलायन्स व टाटा या कंपन्यांच्या ऊर्जा प्रकल्पाच्या माध्यमातूनही महाराष्ट्राला वीज प्राप्त होणार आहे. सन २०११ -२०१२ मध्ये परळी,उरण या ऊर्जा प्रकल्पामधून १७३० मेगावॅट वीज प्राप्त होणार आहे. मुंद्रा, सिपथ, मौदा या भारत सरकारच्या प्रकल्पामधूनही ब-याच चांगल्या प्रमाणात येत्या वर्षांमध्ये महाराष्ट्राला वीज प्राप्त होणार आहे. अदाणी ग्रुप ऑफ पॉवर प्रोजेक्टमधून एकूण १३० मेगावॅट वीज महाराष्ट्राला प्राप्त होणार आहे. सन २०१२ मध्ये १८,६९८ म्हणजे जवळ जवळ १९,००० मेगावॅट वीज महाराष्ट्राला उपलब्ध होणार आहे. हे तर फक्त कागदोपत्री नोंद झालेले विजेचे प्रमाण आहे. त्या व्यतिरिक्त महावितरण कंपनीने जे मोठमोठे कार्यक्रम हाती घेतलेले आहेत. त्या माध्यमातूनही मोठया प्रमाणावर विजेची बचत होऊन विजेची निर्मिती होणार आहे. गावठाण आणि पंप यांचे फिडर सेपरेशन करुन ग्रामीण भागातील विजेच्या वितरणाला मोठया प्रमाणावर फायदा मिळणार आहे. महाराष्ट्रातील काही दुर्गम भागांमध्ये अपारंपारिक ऊर्जेचा वापर करुन विजेची बचत करण्यात येणार आहे. बायोगॅस, इंडस्ट्रीयल वेस्ट पॉवर प्रोजेक्ट, मिथेन गॅस पॉवर प्रोजेक्ट, विंड पॉवर प्रोजेक्ट या माध्यमातून एकूण २७७५ मेगावॅट वीज प्राप्त

होण्याची चिन्हे दिसत आहेत. को - जनको या माध्यमातून महाराष्ट्राला ७५० मेगावॅट वीज प्राप्त होणार आहे, अशी माहिती साक्षीचे वेळी समितीला देण्यात आली.

**५.२१** फिनोलेक्सच्या संदर्भात मध्यंतरीच्या काळात वर्तमानपत्रामधील बातम्यांमध्ये असा उल्लेख आलेला होता की, कोळशापासून विजेची निर्मिती केल्यानंतर जी राख उरते, तिचे काय केले जाते, याबाबत शासनाच्या विरोधी संशयास्पद भुमिका या वर्तमानपत्राच्या माध्यमातून मांडली जात होती. याबाबत काही माहिती आपल्या माध्यमातून समितीला सादर झाली तर योग्य होईल, अशी समितीने सुचना केली असता सचिवांनी असा खुलासा केला की, राखेची अडचण देशात मोठ्या प्रमाणावर आहे. डब्ल्यू.सी.एल. चा कोळसा विदर्भाच्या खाणीतून निघतो. त्यामध्ये जवळजवळ ३५ टक्के राख निघते. परंतु हळूहळू तो कोळसा संपुष्टात येत असून १० वर्षांनी तर तो कोळसा मिळणार सुध्दा नाही अशी परिस्थिती आहे. आता ओरिसा राज्यातून कोळसा आणला जाणार आहे. त्या कोळशामध्ये ४५ टक्के राख असणार आहे. पूर्वी राखेचा वापर केला जात नव्हता. परंतु आता राख सिमेंटमध्ये मोठ्या प्रमाणावर वापरली जाते. पुढील चार-पाच वर्षांत १०० टक्के राख, सिमेंट उद्योगामध्ये वापरली जाईल. आतापर्यंत सिमेंट उद्योगाला राख विना मोबदला दिली जात होती, परंतु आता लिलाव करुन सिमेंट उद्योगांना राख दिली जाते.

**५.२२** त्यावर समितीने अशी विचारणा केली की, राख विकत घेण्यासाठी सिमेंट कंपन्या पुढे आल्या तर त्यांना राख देणार काय ? तसेच राखेच्या वापराबाबत संशोधन करण्यात आले आहे काय ? यावर सचिवांनी त्यास होकारार्थी उत्तर दिले व असा खुलासा केला की, 'पोझोक्रीट' अशा प्रकारचा उल्लेख सिमेंटच्या बॅगेवर असतो. त्या सिमेंटमध्ये राखेचे प्रमाण २०-२५ टक्के असते. एवढेच नव्हे तर घाटघर धरण राखेच्या सिमेंटवर तयार झालेले आहे. शिवाय केंद्र सरकारने आदेश दिलेले आहेत की, कोळसा खाणीतून कोळसा काढला जात असल्यामुळे, त्या ठिकाणी राखेचा भराव टाकून व त्यावर माती टाकून तो भाग भरुन काढावा.

**५.२३** राज्यामध्ये ज्या भागात वीज प्रकल्प असेल त्या प्रकल्पाच्या ५ कि.मी.परिसरात भारनियमन केले जाणार नाही. याबाबतची वस्तुस्थिती काय आहे, अशी समितीने विचारणा केली असता, सचिवांनी असा खुलासा केला की, वीज प्रकल्पापासून ५ कि.मी. पर्यंतच्या परिसरात पूर्णत: वीज मिळावी हे केंद्र सरकारने जाहीर केले असून, त्या धोरणानुसार केंद्र सरकारने काही मार्गदर्शक तत्वे जाहीर केली आहेत. त्या मार्गदर्शक सूचना डोळ्यासमोर ठेवून ऊर्जा विभाग काम करीत आहे. वीज प्रकल्पाच्या नजीकच्या ५ कि.मी. च्या परिसरातील सर्व गावांना भारनियमनमुक्त करण्याबाबतचे सरकारचे धोरण आहे.

**५.२४** समुद्राच्या लाटांपासून वीजनिर्मिती करण्याचे कंपनीच्या विचाराधीन आहे की नाही, या समितीच्या प्रश्नावर माहिती देताना सचिवांनी असे उत्तर दिले की, समुद्राच्या लाटांपासून वीजनिर्मिती करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे व याबाबतची माहिती समितीला नंतर उपलब्ध करुन देण्याबाबत सचिवांनी साक्षीचे वेळी आश्वासन दिले. कोणकोणत्या जिल्ह्यात वीज प्रकल्प प्रस्तावित आहेत आणि सन २०१२ पर्यंत किती ऊर्जा

प्रकल्प पूर्ण होणार आहेत, तसेच त्या प्रकल्पामधून किती वीज निर्माण होणार आहे, याबाबतची सविस्तर टिप्पणी समितीला पाठविणेबाबत साक्षीचे वेळी सांगूनही समितीला त्याबाबतची माहिती प्राप्त झाली नाही. महाराष्ट्र वीज नियामक आयोगाने ग्राहकांना १२ हजार कोटी रुपये परत करण्याच्या दिलेल्या निर्णयाबाबत सचिवांनी असा खुलासा केला की, ती रक्कम १२ हजार कोटी रुपये नसून, ३०० कोटी रुपये आहे. या रक्कमेबाबत महाराष्ट्र वीज नियामक आयोग आणि महावितरण कंपनीमध्ये वाद आहे. हा विषय किचकट असून, त्याबाबतचा तपशील विभाग समितीला नंतर देईल. असे समितीस आश्वासित करण्यात आले होते, परंतु ती माहिती देखील समितीला प्राप्त होऊ शकली नाही.

**५.२५** या चर्चेच्या वेळी समितीने असे मत व्यक्त केले की, दिवसेंदिवस विजेची मागणी वाढतच आहे. जळगाव येथे तर एका इसमाने आपल्या घराच्या छतावर सौर ऊर्जेच्या माध्यमातून वीज निर्माण करण्याचे ठरविले. अशाच प्रकारे वीज निर्मिती करण्याबाबत राज्याने किंवा देशाने काही तरी प्रयत्न केले पाहिजेत. कारण आजच्या घडीला जी अपारंपरिक ऊर्जा निर्माण केली जाते, ती मागणीच्या तुलनेत कमी पडते. त्यामुळे या बाबतीत संशोधन करणे आवश्यक आहे. शालेय शिक्षण स्तरापासूनच या विषयाचा अभ्यासक्रमात अंतर्भाव करण्यात यावा. विद्यार्थ्यांना विजेचा वापर काटकसरीने करण्याबाबत विद्यार्थीदशेपासूनच शिकविले तर त्याचा भविष्यात देशाला फायदाच होईल. परंतु या संदर्भात वीज कंपनी आणि शासन हे दोन्हीही उदासीन असल्याचे दिसते.

**५.२६** याबाबत सचिवांनी साक्षीचे वेळी असे भाष्य केले की, राज्यातील २० टक्के वीज शेती पंपावर खर्च होत आहे. तज्ज्ञांचे म्हणणे आहे की, या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर कार्यक्षमता आहे. आता बाजारात नवीन तंत्रज्ञानावर आधारीत कृषि पंप आले आहेत. त्या पंपांना आता लागत असलेल्या विजेपैकी जवळजवळ २० ते ३० टक्के वीज कमी लागते. आपल्या राज्यात अशी स्थिती आहे की, नवीन तंत्रज्ञानाचा वापर अनुदान (सबसिडी) दिल्याशिवाय केला जात नाही. साध्या बल्बची किंमत २० ते ३० रुपये आहे. परंतु सी.एल.एफ.बल्बची किंमत २०० ते ३०० रुपयांच्या आसपास आहे. परंतु या सी.एल.एफ. बल्बमुळे विजेची बरीचशी बचत होते. त्यामुळे या बल्बचे महत्त्व आता लोकांना समजल्यामुळे सी.एल.एफ. बल्ब महाग असले तरी त्याचा वापर सर्रास होत आहे.

**५.२७** विजेच्या विषयाबाबत विशेष संशोधन होत नाही. विजेची वाढती मागणी व उपलब्ध असलेली वीज लक्षात घेता या दृष्टीकोनातून अधिक संशोधन होणे आवश्यक आहे असे समितीने मत व्यक्त केले असता याबाबत सचिवांनी असा खुलासा केला की, केवळ देशातच नव्हे तर संपूर्ण जगात विजेच्या बाबतीत संशोधन सुरु आहे. ग्रीन बिल्डींग इफेक्टच्या माध्यमातून कमीत कमी प्रमाणात ए.सी., लायटींग वापरण्याचे ठरविले जात आहे.

**५.२८** संपूर्ण राज्यभरातील गावांमध्ये वीज देण्याच्या दृष्टीने शासनाचे धोरण काय आहे, तसेच त्यानुसार आतापर्यंत किती गावांना वीज पुरवठा करण्यात आला व त्या योजनेकरिता शासनाने निधी दिला आहे काय, असल्यास किती आणि नसल्यास अशाप्रकारची योजना राबविण्याबाबत शासनाने काय प्रयत्न केले आहेत ? तसेच राजीव गांधी विद्युतीकरण योजनेबाबत माहिती द्यावी. या समितीने विचारलेल्या मुद्यांच्या अनुषंगाने माहिती देताना सचिवांनी असा खुलासा केला की, राजीव गांधी विद्युतीकरण योजनेंतर्गत वीज पुरवठा करावयाची एकूण ४१,०९५ गावे आहेत. सन २००१ च्या जनगणनेप्रमाणे विद्युतीकरण झालेल्या गावांची व्याख्या करताना, एका गावात केवळ एक बल्ब लावला म्हणजे ते विद्युतीकरण झालेले गाव होत नाही. तर एखादी दलित वस्ती असेल तेथे संपूर्ण विजेचे पॉईंटस, एक लाईट, एक प्लग दिला पाहिजे. तेथे असलेल्या आरोग्य केंद्र वगैरे सारख्या इमारतीच्या ठिकाणी वीज दिली गेली पाहिजे, असे त्या व्याख्येत नमूद केले आहे. त्यानुसार आज जवळपास ३६००० गावे विद्युतीकरण झाल्याची घोषित केली आहेत. ५०९५ गावे अशी आहेत की, ज्यांच्यामध्ये संपूर्ण वीज देणे आवश्यक आहे. त्यापैकी ३७६ गावे ही अतिदुर्गम परिसरातील आहेत. तेथे महावितरण कंपनी अपारंपारिक ऊर्जास्त्रोताच्या जसे की, सौर ऊर्जा वगैरेंच्या माध्यमातून वीज पुरविण्याचा प्रयत्न करीत आहे. ४७१९ गावे विद्युतीकरण करावयाची राहिली आहेत, त्यापैकी ७६६ गावे मार्च अखरेपर्यंत संपूर्ण विद्युतीकरण झाल्याची घोषित केलेली आहेत आणि उरलेल्या ३९५३ गावांपैकी जवळपास ५० टक्के गावांमध्ये वीज देण्याचे काम पूर्ण झालेले आहे. परंतु केंद्र शासनाने त्या गावांमध्ये निकषाप्रमाणे वीज पुरवठा झाला आहे की नाही, याची पाहणी केल्याशिवाय विभागाला तसे अधिकृतरित्या घोषित करता येत नाही. अशाप्रकारे ३९४३ गावांपैकी उरलेल्या जवळपास २००० गावांमध्ये वीज देण्याचे काम डिसेंबर अखेर पर्यंत पूर्ण होईल आणि खऱ्या अर्थाने केंद्र शासनाच्या निकषाप्रमाणे सन २००१ च्या जनगणनेप्रमाणे महाराष्ट्रातील सर्व गावांमध्ये पूर्ण विद्युतीकरण होईल अशी माहिती समितीला देण्यात आली.

**५.२९** महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीकडून येणे असलेल्या रुपये ७४.४३ कोटी एवढी विद्युत शुल्काची रक्कम वसूल करण्याबाबत काय कार्यवाही करण्यात आली आहे व त्या कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे, या समितीच्या प्रश्नाला सचिवांनी वसुली झालेली आहे असे उत्तर दिले परंतु यावर महालेखाकार यांनी असे सांगितले की, त्यांना या संबंधातील निश्चित माहिती विभागाकडून मिळालेली नाही. यावर सचिवांनी खुलासा करताना असे सांगितले की, महालेखाकार कार्यालयाचे असे म्हणणे आहे की, आपण जी वसुली करता तिचा भरणा ताबडतोब शासनाकडे करणे आवश्यक आहे. परंतु त्यास उशीर झालेला आहे. ७१ कोटी रुपये ही व्याजाची रक्कम आहे. शासनाकडून शेतकऱ्यांना विजेमध्ये अनुदान (सबसिडी) दिले जाते. त्यापोटी शासनाकडून महावितरणास येणे असते. परंतु शासनाकडून वेळेवेर निधी प्राप्त होत नाही. शासनाकडून वेळेवर निधी प्राप्त झाला नाही तरी महावितरण कंपनी शासनाला व्याजाची आकारणी करीत नाही. यामध्ये समायोजन केले जाते व या संदर्भात वित्त विभागाने निर्णय घ्यावयाचा आहे.

**५.३०** मुंबईत समान दराने वीज पुरवठा करणे बाबतची वस्तुस्थिती जाणुन घेण्याचा समितीने प्रयत्न केला असता, त्याबाबत विभागाने अशी माहिती दिली की, मुंबई शहराला बेस्ट, टाटा, रिलायन्स आणि मुलुंड-भांडूप या भागात एम.एस.ई.डी.सी. अशा चार कंपन्याकडून वीज पुरवठा करण्यात येतो. या चार कंपन्यांचे वीज दर निश्चित करण्याचे कायदेशीर अधिकार महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोगाला आहेत. प्रत्येक कंपनीचे निवासी व वाणिज्य असे दोन प्रकारचे ग्राहक आहेत. ३०० युनिट पेक्षा कमी वापर करणारे ग्राहक, ३०० युनिटपेक्षा जास्त वापर करणारे ग्राहक यांच्यासाठी वेगवेगळे दर आकारले जातात. रिलायन्स कंपनी स्वत: ५०० मेगावॅट वीज निर्मिती करते. टाटा कंपनी स्वत: १७०० मेगावॅट वीज निर्मिती करते. या कंपन्यांचे विजेचे दर वेगवेगळे आहेत. मध्यंतरी टाटा आणि रिलायन्स कंपनीमध्ये वाद निर्माण झाला. टाटा कंपनी रिलायन्स कंपनीस ७०० मेगावॅट विजेचा पुरवठा करायची. नंतर त्यांच्यामध्ये करार झाला नाही. तेव्हा ते प्रकरण सर्वोच्च न्यायालयात गेले. तेथे सांगितले गेले की, विद्युत कायद्याप्रमाणे रिलायन्स कंपनीसोबत करार झाला नसेल तर टाटा कंपनी वीज देऊ शकत नाही तर टाटा कंपनीचे म्हणणे असे आहे की, ते महाराष्ट्राबाहेर वीज विकू शकते. तेव्हा शासनाने यामध्ये हस्तक्षेप केला. कारण रिलायन्स कंपनीचे अनेक वीज ग्राहक आहेत व त्यांना वीज पुरविणे आवश्यक आहे. या प्रकरणात महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोगाने असा सल्ला दिला की, ही गुंतागुंतीचे प्रकरण निर्माण झालेले आहे. टाटा कंपनी उत्पादक आहे. विद्युत कायद्यानुसार ती कोणालाही वीज विकू शकते. रिलायन्स कंपनीस वीज पुरवठा केला नाही तर रिलायन्स कंपनीला बाहेरुन वीज खरेदी करावी लागेल. त्यामुळे वीज दर वाढण्याची शक्यता आहे. तेव्हा दोन-तीन मुद्यांचा विचार करण्यात आला. क्रॉस सबसिडी देत असतील तर त्यावर अधिभार लावण्याचा विचार करावा. विद्युत कायद्यानुसार टाटा कंपनीस कोठेही वीज विकण्याचा अधिकार असला तरी सामाजिक बांधिलकी म्हणून टाटा कंपनीने स्वत:च्या ग्राहकांना वीज पुरविल्यानंतर राहिलेली उर्वरित वीज बाहेर न विकता ती रिलायन्स कंपनीस द्यावी. या संदर्भात महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोगाकडे सुनावणी झालेली आहे. पण अजून त्याबाबत निर्णय झालेला नाही.

**५.३१** आपल्याकडे एकसमान वीज दर आकारावयाचे झाल्यास त्यासाठी प्रथम चारही कंपन्यांकडून शासनाला वीज खरेदी करावी लागेल. त्यानंतर शासनाला एकसमान दर लागू करता येतील. दिल्ली शहरामध्ये तीन वीज कंपन्या आहेत. त्याठिकाणी एकसमान दर लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला त्यावेळी दिल्ली शासनाने प्रथम तीन वीज कंपन्याकडून वीज खरेदी केली व त्यानंतर एक समान दराने वीज उपलब्ध करुन दिली. अशी समितीला माहिती देण्यात आली. त्यावर समितीने असे विचार मांडले की, रिलायन्स कंपनीपेक्षा टाटा कंपनीची वीज स्वस्त असल्यामुळे अनेक ग्राहक टाटा कंपनीची वीज घेत आहेत. तेव्हा यामध्ये एकसमानता आणणे आवश्यक आहे. तसेच विद्युत कायद्याप्रमाणे वीज उत्पादकास कोठेही वीज विकण्याची परवानगी आहे. ज्या ठिकाणी वीज निर्मिती केंद्र आहेत, त्याठिकाणी पर्यावरणाचे कोणतेही नियम पाळले जात नाहीत व त्या भागात मोठ्या प्रमाणावर कर्करोगाचे रोगी आढळतात. तेव्हा वीज कंपन्यांनी याचा देखील विचार

केला पाहिजे. विजेचे समान वितरण करुन सर्वांना सारखा दर आकारण्याच्या संदर्भात प्रयत्न करणे आवश्यक आहे. मुंबईतील झोपडपट्टीमध्ये राहणाऱ्यांना जास्त दराने वीज दिली जाते, तर उच्चभ्रू सोसायट्यांमध्ये राहणाऱ्या लोकांना कमी दराने वीज पुरवठा केला जातो. या बाबत शासनाने विचार केला पाहिजे व समान वीज दर आकारणी केली पाहिजे.

**५.३२** याबाबत सचिवांनी खुलासा करताना असे सांगितले की, महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोगाने पूर्वी अशी भूमिका स्वीकारली होती की, मुंबईतील ग्राहकांची विजेची मागणी पूर्ण केल्यानंतर जी वीज शिल्लक राहील, ती वीज खाजगी वीज कंपन्यांना बाहेर विकता येईल. मुंबईतील ग्राहकांची मागणी पूर्ण झाल्याशिवाय त्यांना आपली वीज बाहेर विकता येणार नाही.

**५.३३** इतर खाजगी कंपनींच्या तुलनेत रिलायन्स वीज कंपनीची वीज महाग आहे, याबाबत सचिवांनी असे सांगितले की, रिलायन्स कंपनी स्वत: जी वीज निर्माण करते, ती वीज स्वस्त आहे, मात्र बाहेरून जी वीज खरेदी करुन पुरविली जाते, ती महाग आहे. रिलायन्स वीज कंपनीकडे १५०० मेगावॅट विजेची मागणी आहे. ही कंपनी ५०० मेगावॅट विजेची निर्मिती करते आणि उर्वरित १ हजार मेगावॅट पैकी ५०० मेगावॅट वीज बाहेरुन आणली जाते व ५०० मेगावॅट वीज टाटा वीज कंपनीकडून खरेदी केली जाते. बाहेरुन चांगल्या दराने मागणी आल्यास त्याप्रमाणे वीज देऊ व त्यामुळे रिलायन्स वीज कंपनीला वीज देता येणार नाही, असे टाटा वीज कंपनीने सांगितले आहे. मात्र आता सध्या विजेचे मार्केट कोसळले आहे. त्यामुळे आम्ही रिलायन्स वीज कंपनीला वीज देण्यास तयार आहोत, असे टाटा कपंनीने सांगितले आहे. अशीही माहिती समितीला साक्षीचे वेळी देण्यात आली.

## अभिप्राय व शिफारशी :

**५.३४** विद्युत करापोटी समायोजित केलेली रुपये ४४८.४० कोटी रक्कम शासनाला महाराष्ट्र राज्य वीज मंडळाकडून येणे बाकी होती. जी रक्कम अनुदानापोटी शासनाकडून मंडळाला देय होती. त्यासंबंधात रु.२१४.५५ कोटी शिल्लक रक्कमेचा अहवाल प्राप्त झाला नाही. रुपये ७१.०८ कोटी रक्कमेचे व्याज आकारले गेले नाही वा विभागाने त्या रक्कमेची मागणी देखील केली नाही. शिल्लक रक्कम रुपये ७३.४३ कोटी विभागाला अद्याप मिळणे बाकी असून, ही रक्कम वसुल करणेबाबत विभागाने काहीही कारवाई केली नाही असे महालेखापालांनी समितीच्या बैठकीतील साक्षीचे वेळी भाष्य केले.

**५.३५** शासनाला महावितरण कंपनीकडून काही रक्कम देय असते व महावितरण कंपनीला शासनाकडून अनुदानाची (सबसिडी) रक्कम देय असते. कधी महावितरण कंपनीकडून वसुलीला विलंब होतो तर कधी शासनाला अनुदान (सबसिडी) द्यायला विलंब होतो. त्यावेळी होणाऱ्या विलंबासाठी एकमेकांना व्याज आकारले जात नाही. अशी माहिती विभागीय प्रतिनिधींनी समितीला दिली. शासनाकडून महावितरणला जर वेळेत अनुदान (सबसिडी) दिले गेले नाही तर बँकांकडून खेळते भांडवलाची रक्कम कर्जास घ्यावी लागते व

त्यामुळे जो जादा खर्चाचा बोजा पडतो, तो शेवटी ग्राहकांकडूनच वसुल केला जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. अशाप्रकारे वीज ग्राहकांना त्याची चूक नसताना नाहक दरवाढीचा भुर्दंड सोसावा लागणे हे नियमांना धरुन नाही असे समितीला वाटते. महावितरण कंपनी आणि शासन या दोघांचाही कारभार पारदर्शक असून त्यामध्ये काहीही अडचणी नाहीत. परंतु शासन ज्या ज्या गोष्टींवर अनुदान (सबसिडी) देते ते कंपनीकडे आणि कंपनीमार्फत लोकांपर्यंत लवकरात लवकर पोहोचणे आवश्यक आहे. कंपनी व शासन यांनी आपापसातच व्याजाची व विलंबाच्या आकाराचे परस्पर समायोजन (ॲडजस्टमेंट) केले तर त्यामुळे कंपनी तोटयात जाते व पर्यायाने कंपनीचा तोटा ग्राहकांकडून वसुल केला जातो, हे न्याय नाही. महावितरण कंपनीवर आता शासनाचा घटक म्हणून शासनाचे कुठल्याही प्रकारचे बंधन नाही. तेव्हा महावितरणने वाणिज्यिक दृष्टीकोन ठेवून काम केले पाहिजे. कंपनी कायद्यानुसार महावितरण कंपनीला स्वतंत्र अस्तित्व प्राप्त झाले असल्यामुळे शासनाच्या विभागाशी संलग्न राहून सरकारप्रमाणे कारभार न करता कंपनी अधिनियमानुसार कारभार करावा असे समितीचे स्पष्ट मत आहे. तरीही महावितरणचा जर पूर्वीचाच दृष्टीकोन राहत असेल तर मग कंपनी म्हणून महावितरणला स्वतंत्र अस्तित्व देण्याचा काहीही उपयोग झालेला नाही, असे समितीला म्हणावे लागेल.

**५.३६ महावितरण कंपनीने शासनाचा सार्वजनिक उपक्रम म्हणून कंपनी अधिनियमानुसार त्यांना जे स्वतंत्र अस्तित्व त्यांना प्राप्त झाले आहे, त्यांचा योग्य तो वापर करुन तसेच वाणिज्यिक दृष्टीकोन ठेवून व आवश्यक तेथे गतिमान निर्णय घेऊन कंपनी जास्तीत जास्त फायद्यात आणण्यासाठी उपाययोजना करण्यासाठी विशेष प्रयत्न करावेत. वीज ग्राहकांना कंपनी तोटयात चालल्यामुळे नाहक भुर्दंड सोसावा लागू नये यादृष्टीने योग्य ती दक्षता घ्यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**५.३७** समुद्राच्या लाटांपासून वीजनिर्मिती करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन असल्याचे समितीला साक्षीचे वेळी सांगण्यात आले व याबाबतची माहिती नंतर देण्यात येईल असे समितीला सांगण्यात आले, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने ग्राहकांना १२ हजार कोटी रुपये परत करणेबाबतच्या निर्णयाबाबत सचिवांनी साक्षीचे वेळी सांगितले की, ही रक्कम १२ हजार कोटी नसून ३०० कोटी रुपये आहे. **या रक्कमेबाबत महाराष्ट्र वीज नियामक आयोग व महावितरण कंपनीत वाद असून त्याबाबतचा तपशील नंतर देण्यात येईल. तसेच राज्यात कोणकोणत्या जिल्ह्यात वीज प्रकल्प प्रस्तावित आहेत व सन २०१२ पर्यंत किती ऊर्जा प्रकल्प पूर्ण होणार आहेत आणि या प्रकल्पांमधून किती ऊर्जा निर्माण होणार आहे, याबाबतची सविस्तर लेखी माहिती समितीला नंतर पाठविण्यात येईल असे सांगूनही, ही माहिती समितीला अद्याप मिळू शकली नाही याबाबत समिती असमाधान व्यक्त करीत आहे व ही माहिती समितीला तीन महिन्यात पाठविण्यात यावी अशी समिती शिफारस करीत आहे.**

**५.३८** दिवसेंदिवस राज्यात विजेची मागणी वाढत आहे. परंतु त्याप्रमाणात वीज निर्मिती होत नाही ती मागणी पूर्ण करण्याच्या दृष्टीने अपारंपारिक ऊर्जा, सौर ऊर्जा या सारख्या विविध स्त्रोतांमधून वीज निर्माण

करण्याबाबत राज्याने प्रयत्न केले पाहिजेत. आजच्या काळात अपारंपारिक ऊर्जा निर्माण केली जाते, परंतु ती मागणीच्या तुलनेत कमी पडते. याबाबतीत खास संशोधन होणे आवश्यक आहे. असे समितीला वाटते. शालेय शिक्षणस्तरापासूनच या विषयाचा अभ्यासक्रमात अंतर्भाव करण्यात यावा. **विद्यार्थ्यांना विजेचा वापर काटकसरीने करणेबाबत विद्यार्थीदशेपासून शिकविले गेले तर त्याचा भविष्यात देशाला फायदाच होईल. परंतु याबाबतीत वीज कंपनी व शासन हे दोन्हीही उदासीन असल्याचे दिसून येते. विजेच्या निर्मितीबाबत व वापराबाबत विशेष संशोधन होत नाही. विजेची वाढती मागणी व उपलब्धता लक्षात घेता या दृष्टीकोनातून अधिकाधिक संशोधन व्हावे व वीज वापराबाबत विशेष उपाययोजना शासनाने करावी अशी समितीची आग्रहाची शिफारस आहे.**

**५.३९** मुंबई शहरात समान दराने वीज पुरवठा करणेबाबतची वस्तुस्थिती विशद करताना समितीला सांगण्यात आले की, मुंबई शहराला बेस्ट, टाटा, रिलायन्स आणि भांडूप-मुलूंड परिसरात महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी या चार कंपन्यांकडून वीज पुरवठा केला जातो. या चारही वीज कंपन्यांचे वीजेचे दर निश्चित करण्याचे अधिकार महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोगाला आहेत. या कंपन्यांचे वीजेचे दर वेगवेगळे आहेत. मध्यंतरी टाटा व रिलायन्स कंपनीमध्ये वाद निर्माण झाला. टाटा कंपनी वीज उत्पादन करते व विद्युत कायद्यानुसार ती कुणालाही वीज विकू शकते. रिलायन्स कंपनीला वीज पुरवठा केला न गेल्यामुळे रिलायन्स कंपनीला बाहेरुन वीज खरेदी करावी लागली. त्याचा परिणाम वीजदर वाढीत झाला. **विद्युत कायद्यानुसार टाटा वीज कंपनीला कुठेही वीज विकण्याचा अधिकार असला तरी सामाजिक बांधीलकी म्हणून टाटा कंपनीने स्वत:च्या ग्राहकांची वीजेची गरज भागविल्यानंतर उर्वरित वीज राज्याबाहेर न विकता ती मुंबईतील वीज ग्राहकांसाठी द्यावी तसेच मुंबईतील वीज ग्राहकांची मागणी पूर्ण झाल्याशिवाय कोणत्याही वीज कंपनीला आपली वीज राज्याबाहेर विकता येणार नाही असे शासनाने बंधन घालावे व तशी कायद्यात तरतूद करावी अशी समितीची शिफारस आहे.**

**५.४०** मुंबईत एक समान वीज दर आकारणी करण्यासाठी प्रथम चारही कंपन्यांकडून शासनाला वीज खरेदी करावी लागेल तरच शासनाला एक समान वीज दर लागू करता येईल. **दिल्लीमध्ये तेथील शासनाने तीन वीज कंपन्यांकडून वीज खरेदी केली व त्यानंतर ग्राहकांना एक समान दराने वीज उपलब्ध करुन दिली. त्याच धर्तीवर महाराष्ट्र शासनाने देखील मुंबई शहरात वीज पुरवठा करणाऱ्या चारही कंपन्यांकडून वीज खरेदी करुन ती एकसमान दराने सर्व ग्राहकांना पुरविण्याच्या दृष्टीने ठोस निर्णय घ्यावा अशी समिती शिफारस करीत आहे.**

# परिशिष्ट - अ

विवरणपत्र १

## विक्रीकर उपआयुक्त (अपिले) कार्यालयातील प्रलंबित प्रकरणांची वर्षनिहाय माहिती.

### स्थिती दि. ३१.०३.२०१०.

| वर्ष कालावधी निहाय प्रकरणांची संख्या | | | | |
|---|---|---|---|---|
| २००९-१० | २००८-०९ | २००७-०८ | २००६-०७ | एकूण प्रकरणे |
| ४९४७ | १९४२ | १२६३ | ४१११ | १२,२६३ |

विवरणपत्र २

# Pendency of JC appeals as on 31/3/2010

| Sr. No. | CATEGORY | NO OF PENDING APPEALS |
|---|---|---|
| 1. | ABOVE 3 YEARS | 563 |
| 2. | FROM ONE YEAR TO THEREE YEAR | 2565 |
| 3. | BELOW ONE YEAR | 2826 |
| | **TOTAL** | **5954** |

विवरणपत्र ३

## महाराष्ट्र विक्रीकर न्यायाधिकरण, मुंबई

### वर्षनिहाय प्रलंबित अपिल

दि. ३१.०३.१० अखेर

| वर्ष | अपिल | द्वितीय अपिल | प्राप्त | पुनर्जिवित अपिल | प्राप्त अपिल | संकीर्ण अर्ज | संदर्भ अर्ज | व्हॅट अपिल | व्हॅट द्वितीय अपिल | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १९८९ | २ | ३ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ५ |
| १९९० | ० | १२ | ० | ० | ० | ४ | ० | ० | ० | १६ |
| १९९१ | ७ | ३१ | १ | ० | ० | ४ | ० | ० | ० | ४३ |
| १९९२ | ७ | ३३ | ० | १ | २ | १४ | ० | ० | ० | ५७ |
| १९९३ | १९ | ३३ | ० | १ | १ | २१ | ० | ० | ० | ७५ |
